
# माणूस


शनिवार । २ ऑक्टोबर १९७६ । साठ पैसे



साहित्य, विज्ञान, मानवसेवा

या क्षेत्रांतील उत्तुंग शिखरांचे दर्शन

माणूस दिवाळी अंक



गेल्या एक-दीड वर्षात मृत्यूनंतरच्या जगताविषयीचे कुतुहल, निदान भारतात तरी कमालीचे वाढलेले दिसते. कलकत्त्याच्या अमृतबझार पत्रिका गटाने चालवलेल्या Sunday या साप्ताहिकाने जगप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ अरनॉल्ड टॉयन्बी यांनी लिहिलेली, 'Is there life after death' ही लेखमालाच प्रसिद्ध केली आहे. सत्यजित रे यांचा या विषयावरील एक चित्रपट नुकताच प्रकाशित झाला आहे. देशातील मानसशास्त्र संशोधन संस्थांत 'पुनर्जन्म' या विषयावरील संशोधन खूप पुढे गेलेले आहे. जागतिक कीर्तीचे मानसशास्त्रज्ञ यासाठी भारतात येऊन राहिलेले आहेत. येथील प्रयोगात महत्त्वाचा वाटा उचलीत आहेत. पाश्चात्य देशांत तर संशोधनाने खूपच मजल मारली आहे. आपल्याकडे उथळ बुद्धिवादी 'हे थोतांड आहे' म्हणून हा विषय उडवून लावतात व बहुजनसमाज मात्र अगदी अंधविश्वासाने या गोष्टींना कवटाळून बसतो.

वास्तविक गरज आहे या विषयाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची.

अशा अभ्यासाला उपकारक ठरावी या दृष्टिकोनातून लिहिलेली, सत्यघटनेवर पूर्ण आधारित असलेली

# एक प्रदीर्घ गूढकथा

लेखक : रत्नाकर मतकरी

'स्पिरिच्युअल हीलींग' किंवा परलोकवासी आत्म्यांनी येऊन केलेल्या रोगमुक्तीचे एक साधार कथन

# माणूस

## दिवाळी अंक

याशिवाय....

....याशिवाय

साहित्य, विज्ञान, मानवसेवा या क्षेत्रांतील उत्तुंग शिखरांचे दर्शन घडवणारे वेचक आणि वेधक लिखाण.

## श्वाएत्झरची अखेर

आफ्रिकन जनतेशी-मातीशी एकरूप झालेल्या अल्बर्ट श्वाएत्झरच्या लॅम्बरीन जंगलातील अखेरच्या करुणोदात्त पर्वाचे अस्वस्थकारी चित्रण

लेखिका : सुमती देवस्थळे

□

## गुस्ताव फ्लॉबर्ट आणि मदाम बोव्हारी एक रसग्रहण

लेखक : सॉमरसेट मॉम

अनुवाद : माधव मनोहर

□

## खास विज्ञान पुरवणी

सादरकर्ते : डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

□

नाट्यविभाग, चित्रपटविभाग, एखाददुसरी निवडक लघुकथा आणि एक महत्त्वपूर्ण कादंबरी

□

प्रसिद्धी : १८ ऑक्टोबर

किंमत : ६ रुपये

विक्रेत्यांनी मागणी वेळेवर नोंदवावी. वर्गणीदारांनी रजि. पोस्टाने अंक हवा असल्यास, दोन रुपये त्वरित पाठवून द्यावेत. सोबत नाव, पत्ता, वर्गणीदार क्रमांक कळवावा.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष सोळावे – अंक अठरावा

२ ऑक्टोबर १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□

# स्वीडन

## लोकशाही समाजवादास हादरा

वा. दा. रानडे

स्वीडनमध्ये गेली ४४ वर्षे अधिकारावर असलेल्या सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाचा नुकत्याच झालेल्या निवडणुकांत पराभव होऊन उजव्या पक्षाच्या हाती सत्ता गेली; स्वीडन हा युरोपातील एक शांत, अलिप्त देश. जागतिक राजकारणाच्या बातम्यात तेथील बातमी क्वचितच येई; पण लोकशाही समाजवादाच्या प्रयोगाचा आदर्श म्हणून या छोट्या देशाकडे पाहिले जावे. सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने ४४ वर्षांच्या आपल्या प्रदीर्घ राजवटीत सामाजिक विम्याची योजना सुरू केली, सहकारी संस्थांचे जाळे वाढविले. रेल्वे, हवाईवाहतूक, बसवहातूक, पाणी व वीज-पुरवठ्यासारख्या सार्वजनिक सेवा यांचे नियंत्रण, तसेच अशुद्ध लोखंड, साखर, अल्कोहोल तेल शुद्धीकरण यांसारख्या काही उद्योगांचे नियंत्रण सरकारने स्वतःकडे घेतले. शेतीव्यवसायात फक्त दहा टक्के लोक गुंतलेले असले तरी, देशाच्या गरजेच्या ९० टक्के अन्नधान्य स्वीडनमध्येच उत्पादन होते. राहणीचा उंचावलेला दर्जा, उद्योगधंद्यातील कार्यक्षमता, सहकार्याचे कामगार संबंध, समाजकल्याणाच्या मोठ्या योजना, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळणारी समता आणि कार्यक्षम कारभार हे सोशल डेमॉक्रॅटिक राजवटीचे विशेष विरोधी पक्षांनाही अमान्य करता येणार नाहीत. आर्थिक मंदीतून देशाचे तारू या पक्षाच्या राज्यकर्त्यांनी यशस्वीपणे हाकारले. बेकारीचे प्रमाण दुर्लक्ष करण्याइतके थोडे आहे. चलनवाढ आठ टक्क्यांच्यावर होऊ दिलेली नाही.

ओलॅफ पाय यांच्या नेतृत्वाखाली सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने एवढा चांगला कारभार केला असता, निवडणुकीत त्यांचा पराभव का झाला ? विरोधी पक्षांपैकी सेंटर पार्टीने अणुशक्तीच्या प्रश्नावर सरकारच्या धोरणाविरुद्ध जोरदार प्रचारमोहिम केली; त्यामुळे आमचा पराभव झाला, असे पाय यांनी सांगितले; पण पराभवाचा पुरेसा उलगडा त्यातून होत नाही. सेंटर पार्टीचे नेते व नियोजित पंतप्रधान फाल्डिन यांनी आपल्या प्रचार मोहिमेत सरकारच्या अणुशक्तीविषयक धोरणावर जोरदार हल्ला केला होता. 'मी सत्तेवर आलो तर, १९८५ पर्यंत सर्व अणुशक्तिकेंद्रे बंद करीन,' अशी घोषणा एका भाषणात त्यांनी केली. अणुशक्तीच्या निर्मितीबरोबर जी किरणोत्सर्गी धूळ निर्माण होते तिची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न शास्त्रज्ञ कधी समाधानकारक सोडवू शकतील असे त्यांना वाटत नाही. मानवजातीने अणुयुगात प्रवेशच करायला नको होता. अणुयुगातील अनर्थांच्या खाईत आपल्या मुलांना लोटण्याचा आपणास काहीही अधिकार नाही असे त्यांचे मत आहे. अणुशक्तीच्याऐवजी सूर्यशक्ती, वायुशक्ती आणि औष्णिकवीज यांचा विकास करण्याच्या मोठ्या योजना त्यांच्या शास्त्रीय सल्लागारांनी आखल्या आहेत. सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेते पाय यांना ही भूमिका मान्य नाही. स्वीडनमधील ऊर्जेचा व रोजगाराचा प्रश्न अणुशक्तीच सोडवू शकेल असे त्यांना वाटते. अणुशक्तीच्या धोक्याविरुद्ध उपाय शोधताच येणार नाहीत हे त्यांना मान्य नाही. सत्तेवर आल्यावर फाल्डिन यांना आपली भूमिका अंमलात आणणे सोपे नाही. कारण लिबरल व कॉन्झर्वेटिव्ह हे दुसरे उजवे पक्ष या प्रश्नावर त्यांच्याशी सहमत नाहीत, उलट सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या भूमिकेलाच त्यांनी या पूर्वी पाठिंबा दिलेला आहे; पण मतदारांवर, विशेषतः नव्यानेच मताचा हक्क प्राप्त झालेल्या १८ ते २१ वयाच्या तरुणांवर या मताचा प्रभाव पडला असण्याची शक्यता आहे.

स्वीडनमधील लोकशाही समाजवादाच्या प्रयोगात वाढत्या नोकरशाहीमुळे स्वातंत्र्याचा संकोच होत आहे. असे लोकांना वाटत असून पर्यायी उजवेपक्ष यातून काही मार्ग काढतात काय हे त्यांना पाहावयाचे आहे. म्हणून या वेळी मतदारांनी त्यांना संधी दिली असाही निवडणूक निकालांचा एक अर्थ लावला जात आहे. हा प्रश्न केवळ स्वीडनच्याच नव्हे, तर सर्व समाजवादी व कम्युनिस्ट चळवळींच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. लोकशाही समाजवाद्यांना त्यावर मार्ग सापडला नाही तसाच रशियन व चिनी कम्युनिस्टांनाही सापडलेला नाही. केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण यांचा योग्य तोल साधणे हाच त्यावर परिणामकारक उपाय आहे. हा तोल न जमल्याने उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाला किंवा सामाजीकरणाला प्रत्यक्षात नोकरशाहीकरणाचे स्वरूप आले आहे. समाजवादाबद्दल लोकमत प्रतिकूल व्हायला नको असेल तर, आता पर्यंतच्या प्रयोगांचे कठोर आत्मपरीक्षण करून त्यावर योग्य तोड काढायला हवी. भारतातही सत्तारूढ काँग्रेस पक्षाने लोकशाही समाजवादाचे ध्येय स्वीकारले आहे. घटनेच्या उद्दिष्टातही त्याचा अंतर्भाव करण्यात येत आहे. तेव्हा पाश्चात्य लोकशाही समाजवाद्यांच्या चुका टाळण्यासाठी आपण आतापासूनच योग्य खबरदारी घ्यायला हवी.

गेल्या तीन निवडणुकांचा तुलनात्मक विचार केला तर स्वीडनमधील यावेळचा निकाल तितकासा अनपेक्षित म्हणता येणार नाही.

स्वीडनमधील निवडणुका

| पक्ष | जागा | | |
|---|---|---|---|
| | १९७० | १९७३ | १९७६ |
| सोशल-डेमॉक्रॅटिक पक्ष | १७३ | १५६ | १५२ |
| कम्युनिस्ट | १७ | ११ | १७ |
| लिबरल | ५८ | ३४ | ३९ |
| कॉन्झर्व्हेटिव्ह | ४१ | ५० | ५५ |
| सेंटरपार्टी | ७१ | ९० | ८६ |

सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या जागा तिन्ही निवडणुकात घटत गेल्या असल्या तरी तोच अजून पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहे. कम्युनिस्टांनी या पक्षाशी आघाडी केली पण त्यांच्या बळात वाढ किंवा घट विशेष झालेली नाही. उजव्या पक्षांमध्ये सेंटर पार्टीने दुसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविले पण त्या पक्षास गेल्या निवडणुकीपेक्षा चार जागा कमी मिळाल्या आहेत. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे बळ तिन्ही निवडणुकात वाढत गेले असून लिबरल पक्षाला त्याने मागे टाकले आहे,

उजव्या पक्षांनी आघाडी केली असली तरी, त्यांच्यात कार्यक्रमाबाबत मतभेद आहेत. दीर्घकाळ सत्तेवर देण्याची संधी न मिळाल्याने राज्यकारभाराचा त्यांना अनुभव नाही. तेव्हा सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने गेल्या ४४ वर्षांत जी घडी बसविली तिला फारसे निराळे वळण देणे त्यांना शक्य होईल असे वाटत नाही. □

# टेम्सच्या लाल लहरी

## ललित ग्रंथनिर्मितीचा एक अनुभव

उषा परांडे

एका मोठ्या प्रकाशकाकडे जाण्याचा परवा योग आला. त्याची कचेरी स्वतःच्या मालकीच्या इमारतीत आहे. यावरून या व्यवसायातलं त्याचं स्थान किती उंच आहे हे सहज समजलं. साहेब वरच्या मजल्यावरच्या चेंबरमध्ये होते. मी बाहेर थांबलो. आत कुणीतरी पाहुणा तावातावानं भांडत असावा. ' साहेब ' शांतपणे उत्तर देत होते–

गेल्या वर्षाखेर साडेतीनशे प्रती संपल्या त्याचे पैसे मागेच दिले. या वर्षात पंचेचाळीस प्रती गेल्या, त्याच्या रॉयल्टीचा हा चेक ! '

' या वर्षात फक्त पचेचाळीस प्रतीच खपल्या ? '

' होय ? '

' असं कसं ? गेल्या वर्षी तीनशे आणि यावर्षी फक्त पंचेचाळीस ? '

' असंच असतं ? तुम्ही अजून अनुभव घेतलेला नाही–नवोदित आहात. पुस्तकांचा क्विक् सेल होत नाही ! पहिल्या वर्षी जास्त जातात मग हळूहळू ! '

' पण अभिप्राय तर किती चांगले आलेत ! महाराष्ट्र टाईम्स्, तरुण भारत, किर्लोस्कर—'

' कबूल ! मी कुठे नाही म्हणतो ? तुमची कादंबरी चांगली म्हणूनच. मी घेतली ना ? पण अभिप्रायांनी पुस्तकांची विक्री फारशी वाढतेच असं नाही ! पुस्तकांचा धंदाच असा आहे ! '

पाहुणा थोडा स्पष्ट असावा,

' धंदा असा म्हणता अन् मग लोकं इमारती कशा उठवतात ?

' व्हीनस्, तुम्ही, ठोकळ–'

साहेब हसले असावेत.

' इमारती उभ्या झाल्या त्या टेक्स्ट बुक्स् आणि गाईडांवर; ललित वाङमयावर नाही. तुमचा माझ्यावर विश्वास नसेल तर माझं स्टॉक बुक पहा, गोडाऊनमध्ये प्रती पहा. मी परवानगी देईन. पण आपले सबंध चांगले राहू द्यात ! गैरसमजामधून संबंध बिघडू देऊ नका !

तो पाहुणा बाहेर आला; हातात चेक असूनही त्याच्या चेहऱ्यावर प्रकाशकाबद्दल पूर्ण अविश्वास होता, आपल्याला यानं फसवलं अशीच त्याची भावना दिसली ! कुणास ठाऊक–जास्त प्रती छापून आपल्याला फक्त हजाराची आवृत्ती म्हटलं की काय ? असेच खोटारडे असतात हे प्रकाशक ?

आत जाताना माझ्या चेहऱ्यावर हसू तरळलं.

वास्तविक ललित ग्रंथ निर्मितीची प्रक्रिया अगदी सोपी आहे. लेखक लिहितो, प्रकाशकाला देतो ( आवृत्तीचे हक्काबाबत ठराव करून ) प्रकाशक ते स्वीकारतो, छापतो, विकतो, पैसे मिळवतो. ठरावाप्रमाणे एका मुठीनं किंवा विक्री होईल तशी रॉयल्टी देतो !

साधी रहाटी

पण नवोदितांचं प्रकाशकाशी भांडण होण्याची शक्यताच या व्यवहारात उभी राहते ! लेखकाला वाटतं आपण ' चांगला माल ' दिला, पण आपण नवोदित आहोत असं पाहून या प्रकाशकानं आपल्याला फसवलं आहे !

या व्यवसायाशी परिचय नसताना प्रथम प्रथम अशा कहाण्या ऐकल्या की मलाही असंच वाटायचं. पण आता आता या धंद्यातील अनेक व्यक्तींशी संबंध आला. थोडीफार ऊठबस वाढली. काही तज्ज्ञांच्या संगतीत यातले बारकावे अनुभवले, खाचाखोचा पहिल्या; थोडे फार ओरखाडेही सोसले.

आणि मग आता माझ्या लक्षात आलंय्, की ललित साहित्याबाबत बोलायचं तर–

ग्रंथनिर्मिती हा व्यापार खरा, पण त्याची एक वेगळी यंत्रणा आहे, त्याचं वेगळं तंत्र आहे.

या तंत्रातल्या भयानकतेचा परिचय मला झाला माझ्या एका मित्रामुळे–त्यानं या व्यवसायात एक गटांगळी खाल्ली, भाग्यवशात् तो तरला पण होरपळून निघाला. मानसिक दृष्टया विद्ध झाला !

त्याच्या या व्यवसायिक उपदव्यापातला मी एक जिव्हाळ्याचा साक्षीदार आहे. काही अंशी भागीदारही. त्याची कहाणी बोलकी आहे–

फार फार बोलकी.

तो मित्र लेखक आहे. फार मोठा नाही, पण बऱ्यापैकी. स्वतःच्या आनंदासाठी लिहिणारा. त्यानं चार पाच मासिक जोडून ठेवली आहेत. आतापर्यंत त्यानं लिहिलेल्या कथांची संख्या दोन अडीचशे झाली असेल.

कोणे एके काळी इंग्लंडचा इतिहास चाळताना त्याला एक नाटयपूर्ण कथानक आढळलं.

दुसरा एडवर्ड आणि राणी इसाबेला यांमध्ये वितुष्ट आलं. राणीनं फ्रान्स्मध्ये जाऊन एका प्रियकराच्या सहाय्यानं बंडाचं शिंग फुंकलं आणि लंडनचं तख्त काबीज केलं–नवऱ्याला तुरुंगात ठेवलं. तिथे त्याचा खून झाला. दुसरा एडवर्ड आणि इसाबेला यांचा. मुलगा

पुढे कालांतरानं तिसरा एडवर्ड म्हणून गादीवर आल्यावर त्यानं सर्व प्रकारणाची चौकशी केली आणि आईच्या प्रियकराला खुनी म्हणून फाशी दिलं; शेवटी राणी एकटीच राहिली ! -अगदी एकटी !!

ही कथा माझ्या लेखक मित्राला आवडली म्हणून त्यानं विविध ग्रंथालयांमधून मूळ सविस्तर कथा मिळवून सात आठ महिने अभ्यास केला, तीन चार महिने खर्चून कादंबरी लिहून काढली आणि विचार करून हस्तलिखितावर जाड सुबक अक्षरांत कोरून नाव लिहिलं.

## टेम्सच्या लाल लहरी

या वर्षसव्वावर्षाच्या लेखनकाळात त्याला निरतिशय आनंद मिळाला. पात्रं पुढे उभी राहत, त्यांच्याशी संवाद सुरू होई–इतकंच नव्हे, तर शेवटचं प्रकरण त्यानं हातावेगळं केलं त्या दिवशी प्रियजनांचा वियोग व्हावा तसा तो अस्वस्थ होता. या साऱ्या आनंदाचा त्यानं मुक्त अनुभव घेतला आणि मग व्यावहारिक जगातली एक महत्त्वाची प्रक्रिया एक समस्या म्हणून त्याच्या पुढे उभी राहिली 'या हस्तलिखिताचं छापील पुस्तकात रूपांतर ! म्हणजेच–ग्रंथनिर्मिती !

येथपर्यंत या मित्राला छपाईचा किंवा प्रकाशनाचा फारसा अनुभव नव्हता तेव्हा त्यानं ते आपल्या ओळखीच्या संपादकांकडे दिलं; त्यांनी सवडीनं वाचून पसंती कळविली,

'नवी कल्पना आहे–तुमचा हा प्रयत्न मला आवडला. लवकरच मासिकात छापतो.

मासिकांत ? म्हणजे एवढे श्रम घेतलेलं लिखाण कायम स्वरूपात कुठेच राहणार नाही ? मित्र अवस्थ झाला; भाबड्या भावुक स्वरात त्यानं विचारलं,

'पुस्तक ?'

'पुस्तकरूपांत मी स्वतः प्रकाशित करू शकणार नाही ! म्हणाल तर ऑफप्रिंट्स्वरून छापून देईन ! मग मी स्वतः मात्र–'

'तुम्हीच का प्रकाशित करीत नाही ?'

'केली असती' संपादकांनो म्हटलं, 'पण माझ्याकडे तशी चांगली वितरण व्यवस्था नाही; आणि सेल्स् ऑर्गनायझेशन् नसेल तर चांगली पुस्तकं पडून राहतात–माझ्या काही चांगल्या प्रकाशनांची अशीच गत झालीय् !'

मित्राचा भांबावलेला चेहरा संपादकांनी न्याहाळला, अन् दिलासा दिला, 'असं करा–तुम्ही इतरांना दाखवा ! कुणी नाहीच तयार झालं तर काहीतरी मार्ग काढू या !'

दुसऱ्या प्रकाशकानं वाचून समाधान व्यक्त केलं.

'तुमची कादंबरी सुंदर आहे. एका बैठकीत मी वाचून संपवली. केसरीच्या वाळिंब्यांना दाखवली, त्यांनाही आवडली ! सवडीनं छापतो—सध्या छोटी आठ पुस्तकं छापतोय्–ती झाली की तुमची कादंबरी !'

आपली कादंबरी कुणी तरी सन्मानाने छापणार या समाधानात मित्रानं आठ नऊ महिने वाट पाहिली; अखेर एक दिवस प्रकाशकानं खिन्न मुद्रेनं हस्तलिखित परत देताना म्हटलं.

'सॉरी! मी प्रॉमिस दिलं खरं! पण स्नेही म्हणून सांगतो–मध्यंतरी मी जी आठ पुस्तकं प्रसिद्ध केली त्यापैकी कागदाचा खर्चही मेजून भरून आलेला नाही. चूक लेखकांची नाही. त्यांची पुस्तकं चांगलीच आहेत पण विक्री व्यवस्थेचे अंदाज चुकले– ! सॉरी !'

श्री. अनंतराव कुलकर्णी म्हणाले,

'कादंबरी चांगली आहे. अशा आटोपशीर एतिहासिक कादंबऱ्या आपल्याकडे व्हायला हव्यात ! पण ही कादंबरी ब्रिटिश इतिहासावरची आहे ! आपले मराठी वाचक कितपत स्वीकारतील याची शंका वाटते !

माझा मित्र अनंतरावांना भेटून आला त्याच दिवशी मला भेटला होता, सारं ऐकून मलाच त्यांच्यापेक्षा अधिक आश्चर्य वाटलं. कादंबरी चांगली म्हणतात मग प्रकाशनाची तयारी का नाही ? विक्रीव्यवस्थेचं एवढं स्तोम का ? ठिकठिकाणच्या पुस्तक विक्रेत्यांना गाठलं की झालं काम !

योगायोगानं डेक्कन जिमखान्यावरच्या एका पुस्तक विक्रेत्याची अन् माझ्या मित्राची गाठ पडली. सहज विषय निघाला त्यावेळी तो विक्रेता धीर देत म्हणाला,

'तुम्ही प्रकाशित करा; वितरण मी स्वीकारतो ! एका वर्षात भांडवल सुटेल ! मग पुढे फायदा.'

कादंबरी हातावेगळी केल्यानंतर दीडवर्षात हिंमतदारीचं अन् धीराचं आश्वासन मित्राला मिळालं ते इथे. त्यामुळे त्यांची दबलेली हिम्मत पुन्हा पालवली. ओळखीच्या छापखान्यात चौकशी केली, साडेबावीस फॉर्म्स झाले. कव्हर, वगैरे धरून पाच हजाराचा अंदाज धरला–थोडं कर्ज, थोडी उधारी धरून छपाई सुरू केली. एप्रिल '७१ अखेर त्याचं 'पाहिलं प्रकाशन' छापून झालं–हजार प्रती झाल्या. या तयारीनिशी ५०–६० परिचितीच्या साक्षीनं श्री. ग. ल. ठोकळ यांच्या अध्यक्षतेखाली पुस्तक प्रकाशन समारंभ साजरा झाला. श्री. श्री. ज. जोशी, सौ. भावना भार्गवेही उत्तेजनदर बोलल्या. मोगऱ्याचे गजरे आणि फँटा घेऊन मित्र घरोघरे गेले आणि मित्रानं समाधानानं स्वतःशीच म्हटलं.

'चलो यार ! कादंबरी प्रकाशित तर केली ! पुढचं काम वितरकानं !

त्याचा चेहरा फुलला होता !

छापखान्यानं गठ्ठे डेक्कन जिमखान्यावरच्या विक्रेत्याकडे पोहोचवले–वितरणाचं काम त्याचं ! सहज कसं काय जमलंय ते पहायला मला सोबतीला घेऊन तो 'लेखक प्रकाशक' मित्र या वितरकाकडे आला.

'पुस्तकं मिळाली–गोडाऊनमध्ये ठेवलीयत !'

'कां ?'

'सध्या सीझन नाही. मार्चनंतर ललित वाङ्मयाला कुणीही विक्रेते विचारत नाहीत. तुम्हीही आता जाहिरात, वगैरे करू नका ! आता एप्रिल ते जुलै हा टेक्स्टबुक्स, गाइड्सचा सीझन; तो संपला की ऑगस्ट ते ऑक्टोबर आपला सीझन. नंतर नोव्हेंबर डिसेंबर दिवाळी अंक. मग जानेवारी ते मार्चचा दुसरा सीझन !'

'म्हणणं खरं होतं. पण मित्राचा चेहरा उतरला. कारण याचाच अर्थ डिसेंबरपर्यंत एक पैसादेखील मिळणार नव्हता आणि त्यानं

छापखान्याला निश्चित मुदत दिली होती ऑक्टोबर अखेरची, अन् मला डिसेंबर ७१ ची! ओशाळल्या चेहऱ्यानं त्यानं माझ्याकडे पाहिलं–मला अर्थ सहज उमगला अन् मीच स्वतःहून त्याला आश्वासन दिलं.

'डोंट वरी! माझी रक्कम तू सर्वांत शेवटी दे!'

तेव्हापासून त्याच्या या उपक्रमाची मी एक स्नेहाची अन् जवळची साथीदार अन् साक्षीदार व्यक्ती असं समीकरण बनलं खरं.

जुलैमध्ये मात्र वितरकानं जाहिराती दिल्या (खर्च मित्राचाच!) एक महिन्याची 'सी अँड बाय' कन्सेशन योजना सुरु केली. मॅजेस्टिक आणि बाँबे बुक डेपो यांच्याशी संधान जोडलं आणि नोव्हेंबर अखेर वितरकानं माझ्या मित्राला कळवलं,

'तुमच्या कादंबरीच्या तीनशे प्रती गेल्या आहेत!'

मित्र परगावी होता, वारंवार येणं त्याला शक्य नव्हतं; तो बिचारा चेक्स्‌ची वाट पाहत राहिला. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, होऊन गेला; स्मरणपत्रं, रजिस्टर्ड विनंती, तार (आणि स्थानिक प्रतिनिधी म्हणून माझे समक्ष तगादे) एवढं झाल्यावर वितरकाचा पोस्टडेटेड चेक मित्राला मिळाला. पैसे मिळाले जूनमध्ये आणि छापखान्याचं बरचसं बिल भागलं!

या संबंधात श्री. आनंद अंतरकर म्हणाले ते पुष्कळदा पटतं! काही विक्रेते खरोखरीच सज्जन भेटतात, पण अॅव्हरेज ७५% विक्रेते प्रकाशकाचेच पैसे वापरत असतात. दारी जाऊन दार ठोठावल्याशिवाय प्रामाणिकपणे पैसे देणार नाहीत; मुद्दाम वसुलीसाठी दौरे काढत बसावे लागतात आणि त्यावेळी त्यांची उत्तरं ठरलेली असतात.

'कालच बँकेत चेक भरला आहे; वटला की ड्राफ्ट पाठवतो. काळजी करू नका (कशाला थांबता इथे?) निश्चितपणे परत जा, तुम्ही पोहोचेपर्यंत ड्राफ्ट तुमच्या टेबलावर दिसेल!'

विश्वासानं प्रकाशक परत येतो; ड्राफ्ट मात्र येत नाही. महिनाभरानं फारतर पोस्टडेटेड चेक येईल, तो कॅश झाल्याविना आपला नाही. विक्रेत्यांनी आणि वितरकांनी दिलेले तीनशे चारशे, अशा क्षुल्लक रकमांचे चेकसुद्धा बँक बॅलन्स् अभावी परत करतात, ह्यावर कुणाचा विश्वास बसेल कां?

पण प्रकाशकांना विक्रेत्याविना पुढे जाणंच शक्य नसतं; त्यात पुन्हा नवोदितांची पंचाईत. मुरब्बी प्रकाशकांना आजपर्यंतच्या अनुभवानं ठरीव सूत्रबद्धता सापडलेली असते. 'हवी तर २० टक्के कॅशनं न्या!' (म्हणजे किरकोळ विक्रेत्यांनी रोख रक्कम भरायची अन् मग प्रती न्यायच्या, त्यावर त्याला २० टक्के कमिशन मिळणार) अशी भाषा या मुरब्बींना ठणकावून वापरता येते. नवोदित बिचाराच असतो, वर्षभरात त्याच्या ३०० प्रती गेल्यानंतर पुढे प्रगती शून्य असते. कुणी आशा दाखवली की म्हणेल त्या अटीवर तो प्रती विक्रीला ठेवण्यास तयार होतो, आणि मग पैशासाठी खेटे घालत बसतो. अखेरीला तर तो असा घायकुतीला येतो की, जिव्हाळ्यानं प्रसिद्ध केलेल्या ज्या पुस्तकाचा स्पर्श त्याला एकेकाळी स्वप्नील भासलेला असतो त्याबाबत 'हे गठ्ठे कसे हलणार?' असा रुक्ष प्रश्न तो स्वतःला विचारत बसतो.

अशा नवोदितांची गांजणूक किती व्हावी? एका पुस्तक विक्रेत्याला माझ्या मित्राच्या वतीनं मी भेटल्यावर त्या विक्रेत्यानं डोकं तापवणारं उत्तर दिलं–'तुमचे मित्र ५० टक्के कमिशन देत असतील तर 'ऑन सेल' प्रती ठेवू! (म्हणजे–आम्ही आमच्या खर्चानं गठ्ठे त्यांच्याकडे पोहोचवायचे आणि जर आणि जेव्हा प्रती विकल्या जातील तेव्हा ते पैसे देतील! प्रती खपल्या नाहीत तर परत घेऊन जा! या सर्व्हिससाठी त्यांना ५० टक्के कमिशन द्यायचं! विक्रीचं आश्वासन शून्य!) गरजू व्यक्तीला पिळून काढायचं तरी किती?

दरम्यान मित्राने नागपूर विभागात प्रयत्न केले, त्यातून पैसे आले. त्याने दुसरा देणेकरी भागवला; नागपूरच्या एका विक्रेत्याने ८० प्रती ठेऊन वर्ष सव्वा वर्षात सर्व खपवण्याचं आश्वासन दिलं होतं. (त्यांपैकी दोन वर्षांनी ७५ प्रती खराब अवस्थेत मित्राला परत मिळाल्या आणि पांच प्रतीच्या किंमतीसाठी पांच वेळा खेटे घालून एक पोस्टडेटेड चेक मिळाला–हे वेगळं!) पण एकंदर परिस्थितीने थोडा धीर आला होता खरा.

पण या धीराला सहा महिन्यात सुरुंग लागला!!

मित्राच्या आणि इतर अनुभवावरून मी एक पाहिलं आहे.

ग्रंथविक्रीची एक मौज असते! पुस्तकांचं प्रमुख गिऱ्हाईक म्हणजे ग्रंथालये. त्यातही चोखंदळपणे नीट पारखून गुणवत्तेवर निवड करणारे ग्रंथपाल थोडे. आपलं अनुदान मिळाले की, जास्तीत जास्त कमिशन देणारा दुकानदार गाठायचा, त्याला अनुदानाची रक्कम सांगायची, आणि तो देईल ती पुस्तकं घ्यायची, हाच बऱ्याच ग्रंथालयांचा रिवाज.'

नव्या प्रकाशनांची दखल घेऊन खरेदी करणारे ग्रंथपाल बहुतेक चांगल्या पुस्तकांची निवड पहिल्या (प्रकाशनांच्या) वर्षीच करतात. पहिल्या तीन चारशे प्रती जातात त्या अशा. पुढच्या वर्षी त्यांना या 'जुन्या' पुस्तकांचं नावही नकोसं होतं. मग पुढे अशा 'जुन्या' पुस्तकांची गिऱ्हाइकं म्हणजे वर उल्लेखलेली दुकानदार देईल ती पुस्तकं घेणारी आणि जास्तीत जास्त कमिशनकडे डोळा ठेवणारी ग्रंथालये. म्हणजेच मध्यस्थ किरकोळ विक्रेत्यांचं महत्त्व कमालीबाहेर वाढतं. किंबहुना त्यांच्याविना दहा प्रती ढकलणंही अशक्य ठरतं.

आमच्या विक्रेत्याची/वितरकाची अवस्था वेगळी नव्हती. पहिल्या वर्षी बाँबे बुक डेपो अन् मॅजेस्टिक यांच्या साहाय्याने त्याने काही प्रती 'ढकलल्या'–नागपूरकडे खपलेल्या प्रती धरून साडेतीन चारशेचा आकडा झाला. पुढे? उरलेल्या सहाशे?

दुसऱ्या वर्षाखेरची विक्री पंचेचाळीस समजली, तेव्हा मित्राचा चेहरा उतरला. अजून त्यांचं ऋणही फिटलं नव्हतं. मी तगादा कधीच केला नाही पण त्यालाच लाज होती. उरलेल्या सहाशेपैकी निदान तीनशे प्रती खपल्याविना माझी रक्कम देणं त्याला अशक्य होतं. मी परिस्थिती ओळखली आणि मित्रकार्य म्हणून त्याला घेऊन वितरकाकडे गेलो. त्याने आमचे दीनवाणे चेहरे पाहिले अन् सुचवलं.

'आपण पुन्हा एक पुश् देऊ या!'

'म्हणजे?'

'तुम्ही एक आकर्षक लीफलेट् काढा. 'इंद्रायणी काठी' पहा. त्याने जाहिरात कशी केलीय! लीफलेट्स इतकी आकर्षक काढली की आता दुसरी आवृत्ती निघतेय!

मी मित्राला हिम्मत दिली. दुसरी आवृत्ती नाही तरी या लीफलेट्सनी उरलेल्या सहाशे प्रती जाणारच !

आतापर्यंत सकाळ, माणूस, वाङ्मयशोभा, राजस वगैरेमध्ये अनुकूल अभिप्राय आले होते. श्री. वेहरे, श्री. ठोकळ, श्री. वाळिंबे, श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी व्यक्तिशः अभिप्राय दिले होते; महाराष्ट्र टाइम्स व किर्लोस्कर दोहोतही चांगले अभिप्राय तयार होते. (ते पुढे जागेअभावी प्रसिद्ध झाले नाहीत हे वेगळं ! आणि एरवीदेखील अभिप्राय आणायचा म्हणजे, नाही म्हटलं तरी, जरा वशिला लागतोच !) असे सर्व अभिप्राय गोळा करून आम्ही आकर्षक लीफलेट् तयार केलं, मागे कादंबरीच्या कव्हरचा ब्लॉक टाकला आणि 'एका महत्त्वाकांक्षी महाराणीची कहाणी' या बोल्ड हेडलाइनची एक हजार लीफलेट्स् वितरकाकडे आणून ठेवली. (पैकी नऊशे पुढे मित्रानंच वापरली) आणि–

चेक्ची प्रतीक्षा सुरू केली.

पुढचा म्हणजे ७३ चा एप्रिल आला. 'विक्री तीस प्रती' हा रिपोर्ट, एक छोटासा (पोस्टडेटेड) चेक (तोही पुढे बँकेने परतच केला) ही कमाई पाहून मात्र मित्राला परिस्थितीचं गांभीर्य जाणवलं. वितरकाच्या दुसऱ्या पुश्ची अशी वाट लागली होती. आतापर्यंत फारतर पांचशे प्रती गेल्या होत्या; म्हणजेच आणखी पाचशे गिऱ्हाइकं हवी होती.

उपवर कन्येच्या पित्याची मन:स्थिती मित्राच्या वाट्याला आली होती. प्रथम इंजिनियर, डॉक्टर, आर्मी अधिकारी अशी यादी धुंडाळणारा पिता अखेर टेंपररी 'प्राध्यापक'ही स्वीकारतो. (शिक्षण क्षेत्र म्हणजे शुद्ध–! पुन्हा यू. जी. सी. चे रेट्सही चांगले आहेत ! प्रोफेसर म्हणजे अब्रूदार असतो, हे आर्मी अधिकारी म्हणजे बाई अन् वाटली.) प्रथम तीस टक्के कमिशनवर अडणारा हा नवोदित प्रकाशक ! आता पस्तीस टक्यावर आला होता. 'उधारी, ऑनसेल' अशा अटी मान्य करीत. तरी पांचशे एकावं गिऱ्हाइक भेटलं नव्हतं.

मलाही अस्वस्थता आली. प्रश्न पैशाचा नव्हता, किंबहुना माझे पैसे मिळाले नसते तरी, मित्राचे आणि माझे संबंध दुरावले नसते, पण माझ्या ऋणात राहणं त्यालाच अवमानाचं वाटलं असतं हे मला पूर्णपणे ठाऊक होतं ! माझ्याशी या विषयावर बोले तेव्हा ती कळकळ आणि तळमळ मला जाणवायची.

यावेळी ही कादंबरी वितरण व्यवस्थेअभावी नाकारणाऱ्या पहिल्या दोन प्रकाशकांची आठवण झाली. त्यांपैकी एकाच्या आठ पुस्तकांची भुतं त्याला कशी छळत असतील याची कल्पना आली· दुसऱ्यानं म्हणे पूर्वी एकदा नऊ मण रद्दी विकली होती. काय झालं असेल त्यांना ? सेल्स ऑर्गनायझेशनविना प्रकाशन व्यवसायात पडणं अव्यवहार्य आहे आहे हेच खरं ! त्या दोघांच्या तोट्याची कल्पना मला आली आणि छाती हबकली. माझ्या मित्राचा तोटा कितीतरी लहान होता. लोकांची दुःखं पाहिली की आपली दुःखं सह्य वाटतात !

हे खरं. पण हा काही दुःखातून किंवा संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग नव्हे ! मित्राचा तोटा त्याच्या चिमुकल्या खिशाच्या दृष्टीनं मोठा होता, म्हणूनच त्यांतून बाहेर पडणं निकडीचं होतं ! ती निकड मला सहज समजत होती म्हणूनच एक सुहृद म्हणून भावनिक दृष्टीनं मी मित्राच्या अडचणीत गुंतून जाणं, गुरफटणं आणि मित्रा इतकंच गुदमरणं नैसर्गिक होतं.

योगायोगानं याच वेळी मित्राला कोल्हापूरला जाण्यासारखं काम निघाल अन् त्याचक्षणी माझ्या डोक्यात शक्कल निघाली ! मी सुचवलं,

'या प्रवासात तूं समक्षच वेगवेगळ्या संस्थांना कां भेटत नाहीस ?'

'आणि ?'

'आणि पुस्तकं दाखव–समक्ष भेटण्याचा जास्त फायदा होईल ! नाहीतरी हे विक्रेते असंच काहीतरी करत असणार ! ते तूच कर! !'

मित्राची आशा उजळली. त्या अवस्थेतच मी त्याला वितरकाकडे नेलं अन तिथे कल्पना सांगितली पण वितरकाचा चेहरा उजळला नाही.

'मला नाही वाटत, शाळा कॉलेजांमधून तुमचं पुस्तक जाईल कारण त्याला तशी एज्युकेशनल व्हॅल्यू नाही !'

'निदान टीचर्स लायब्ररीसाठी तरी ? सांगली, सातारा, कोल्हापूर सोलापूर एवढ्या प्रवासात निदान साठ सत्तर प्रती तरी ?'

वितरक उपहासानं हसला, 'तुम्ही सत्तर प्रती दौऱ्यात विकल्यात तर मी तुमचा शनिवारवाड्यापुढे सत्कार करीन !'

परत येताना माझी चर्या किंचित उदास होती पण मित्र जिद्दीला पेटला होता.

'मी हे आव्हान स्वीकारणार आहे ! मी पंधरा दिवसांत परत येईन तोपर्यंत त्याला हारतुरे, प्लॅटफॉर्म, लाऊड स्पीकर यांची जोडणी करून ठेवायला सांग !'

आणि मग तो उद्योगाला लागला; वाटेवरची मोठी शहरं गाठायची या दृष्टिकोनातून सातारा, कऱ्हाड, सांगली, मिरज, इचलकरंजी, कोल्हापूर, पंढरपूर, आणि सोलापूर इथल्या शाळांची यादी मिळवली; कॉलेजेस व ग्रंथालयांची नांवं प्रकाशन डायरीत होतीच ! या सर्वांना त्यानं लीफलेटची एक एक प्रत रवाना केली आणि सोबत लवकरच भेटीला येण्याचं पत्रही पाठवलं ! सर्व संस्थांना वेळेवर पत्रं रवाना केली आणि सुमुहूर्तावर प्रस्थान ठेवलं. प्रथम पुण्याहू सातारा !

काही दिवसांनी त्याचं कोल्हापूरहून पत्र आलं; त्यानं आणखी प्रती मागवल्या होत्या ! मी मनांत म्हटलं 'तंत्र वरं जमलेलं दिसतंय.' तो पंधरा दिवसांनी परत आला तो विलक्षण प्रसन्न चेहऱ्यानं सवडीनं त्यानं सारा वृत्तान्त सांगितला, त्याचीही विजयगाथा !

माझ्या मित्रानं साताऱ्यात प्रथम भेट दिलेली संस्था मुलींची एक शाळा होती. मित्रानं नम्रपणे मुख्याध्यापकांच्या खोलीत प्रवेश केला, नांव सांगितलं; ते एकदम दिलखुलास हसले,

'या; या ! आजच सकाळी तुमची ओळख झाली !'

'अं ?'

'आजच तुमचं ते कादंबरीचं माहितीपत्रक पोस्टानं आलं ! बसा !

लगेच त्यांनी बेल दाबून चपराशाला बोलावलं.

पृष्ठ २६ वर

# सोलकढी

## □ कोका कोला : आपले राष्ट्रीय पेय

**१९५०–५२** सालातली गोष्ट आहे. त्यावेळी मी उच्च माध्यमिक शाळेत होतो; यावरून माझ्या वयाचा नेमका अंदाज वर्तवण्याचा रिकामा उद्योग प्रिय वाचक नक्कीच करतील, हे मी जाणून आहे. त्या उद्योगात अनंतराव तसे तरुणच तर आहेत, किंवा, 'सोलकढी'त तरीच एवढी मॅच्युरिटी दिसते बरे का, असे काही-तरी निष्कर्ष निघणार हेही मी जाणून आहे. जाऊ द्या हो. माध्यमिक शाळेचे सांगत होतो ना काहीतरी ? हां. माध्यमिक शाळेतली एक आठवण मला पक्की आहे. त्या एकदोन वर्षांत मधूनमधून आम्हाला कोका कोला प्यायला मिळाला होता. आम्हाला त्यावेळी वाटायचे हे शाळेचेच औदार्य. ते औदार्य कोका कोला कंपनीचे होते, हे खूप उशीरा कळले. तोपर्यंत आणि त्यानंतर आम्ही प्यालेल्या कोका कोलानी कंपनीच्या त्या औदार्याची कितीतरी पटींनी परतफेड झाली असावी.

कोका कोलाने जिभेला एक आगळाच संतोष दिला. त्या वेळी, सोडा, लेमन, गुलाब एवढी तीनच बंद बाटल्यातली पेयें प्रतिष्ठा पावलेली होती. सोडयाची बाटली उघडताना चुई ऽऽऽऽ फट् फसफस असा जो अद्‌भुत आवाज व्हायचा त्याने हटकून हसायला यायचे. 'गुलाब'च्या रंगाने काहीतरी बरे प्यायल्यासारखे वाटायचे. लेमन एकूण समजुतदारपणे वागायचे. पण ही पेयेसुद्धा वडील-मंडळींच्या हिशेबी डोक्यात कधी काळी जिवाची मुंबई करायच्या झिणझिण्या आल्या तर, आमच्या बाळजिभांना लागायची. एरवी, चहा-कॉफी-दूध-ताक ही रोजची, खीर–लापशी ही उपवासाची आणि मोसंबीचा रस, लिंबू सरबत, काढे ही आजारपणाची, एवढीच पेये खात्रीची होती. कोका कोलाने या सगळ्या खात्रीच्या पेयांना, तात्पुरते तरी, अपेय करून टाकले.

कोका कोलात एक तरतरीत गंमत होती. ते नाव उच्चारताना जिभेला हळुवार आंदोलन घडायचे. कोका कोलाची बाटली एखाद्या यथास्थित मुलीसारखी (ही समज उच्च माध्यमिक शाळा सुटल्यानंतरची आहे, हे कृपया लक्षात घ्यावे. नाहीतर मुलींबद्दल गैरसमज होतील. ते बरे नव्हे.) सुबक, वळसेदार दिसायची. कोका कोल्याच्या इंग्रजी नामाक्षरांनासुद्धा एक तंग वळण होते. कोका कोलाच्या बिलोरी, पिकपिकल्या तुतीच्या रंगामुळे तो पिताना चोरून काहीतरी प्यायल्यासारखे उत्कट वाटायचे. आम्हाला कोका कोलाची चटक कधी लागली ते समजलेसुद्धा नाही. पुढे ती सवय झाली. दरम्यान कोका कोलाला आधुनिकतेच्या प्रतीकाची योग्यता प्राप्त झाली होती. त्यामुळे जुनी पिढीसुद्धा सोसासोसाने कोका कोला प्यायची.

कोका कोला असा प्रियप्रिय झालेला पाहून त्याच्यासारखी रसायने बनवण्याचे प्रयत्न झाले. उदाहरणार्थ, सॉस्यो, फँटा, गोल्ड स्पॉट, रिमझिम अशी वेगळीही पेये बाजारात आली. पण कोका कोलाने सगळ्यांना बुडवले. एकूण स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही समाजवाद हे जसे आपले राष्ट्रीय ध्येय तसे कोका कोला हे राष्ट्रीय पेय होऊन बसले !

वास्तविक कोका कोला ही परदेशी कंपनी आहे. कोका कोलाच्या मिटक्या मारत संपवलेल्या प्रत्येक बाटलीमागे आपल्याला त्या अमेरिकन कंपनीला पैसे टिकवावे लागतात. १९६९–७० साली कोका कोला पिण्यासाठी आपण त्या कंपनीला दीड कोटी रुपये मोजले. पैशाची बात सोडा. कोका कोला प्रकृतीला अपायकारक आहे, असेही म्हणतात.

हे फारच झाले म्हणून आता मैसूरच्या एका खाद्य पेय संशोधन संस्थेने म्हणे झटून कोका कोलाला शह देणारे जुळे पेय सिद्ध केले आहे. हे मैसूरमे बना हुवा शरबत कोका कोलाचे साम्राज्य खालसा करील असे त्या संशोधकांना निरवालसनक्की वाटत असले, आणि तसे ते धो धो सांगत असले, तरी ज्याची जीभच नव्हे तर, पडजीभसुद्धा कायमची कोका कोलाच्या रंगाची झाली आहे अशा अनंतरावांचे सांगणे असे आहे की, ते होणे नाही. कोका कोलाचे रासायनिक सूत्र अत्यंत गुप्त आहे. इतके की माझ्या अगदी जिभेवर ते असले तरी मला ते सांगता येणार नाही.

अशा परिस्थितीत प्रति-पेय सिद्ध करण्यापेक्षा मूळ पेय नाहीसे करावे, असे बाल-भारतीच्या पहिल्या पुस्तकात स्वच्छ म्हटले आहे.

--अनंतराव



पॅरिस, आय लव्ह यू । लेखांक सात–आठ

# विथ लव्ह टू वन फ्रॉम ओरिएंट

शांताराम पारपिल्लेवार

झोपेतून उठतो तेव्हाही आळस अंगात भरून राहिला असतो. अकरा वाजलेत. फादर डिलाहूथ निघून गेलेयत. जाताना माझ्यासाठी त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवलीय्. कॉटशेजारच्या स्टूलवर फुलदाणीखाली. मग नजर खिडकीकडे वळते. मुलायम कोवळं उन्ह डोळ्यात उतरतं. अन् उतरतो भगवा रंग. कौलारू छतांचा. त्रिकोणी, उंच तर कुठे उंचावर तरंगता क्रेन दिसतो. दूरवर दिसते पॅरिसमधली सगळ्यात उंच बिल्डिंग. मोपार्नास टॉवरची. छप्पन माळ्याची

रात्री पाहिलेलं मोमात्र आठवणीत अजून ताजं आहे. माझाच तळवा मी दाबतो. मारी थेरेस रिपर्टनं निरोप घेताना जरा जास्त जोरात दाबला असता. तिच्या एकूण वागणुकीतच पौरुषी आवेश होता. की उगीच आपल्याला तसं वाटतं ?

मी चिठ्ठी वाचतो,–'एका लेक्चरसाठी मी युनिव्हर्सिटीत जातोय. रात्री दहाच्या आधी माझे येणे होणार नाही. मॅडमाझेल मारी थेरेसचा फोन आला होता. नऊच्या सुमाराला. तू मस्त झोपेत होतास. उठवावसं वाटलं नाही. अकरा बाराच्या दरम्यान ती परत फोन करणार आहे–मिचेल डिलाहूथ.'

फादर डिलाहूथ ग्रेट आहेत. किती काळजी वाहतात ?—तू मस्त झोपेत होतास. उठवावसं वाटलं नाही ! शब्दात किती जवळीक आहे ? आत्मीयता आहे ?

मी इंडिअन स्टाईलचा चहा करतो. चक्क बशीत टाकून घोट घोट पितो. इथे आल्यापासून नुसताच पाणचट चहा प्यावा लागत आहे. उकळत्या पाण्यात दोराला बांधलेली सिलोन चहाची पुडी दोन चारदा हालवायची, एक शुगर क्युब. थोडं दूध टाकायचं. पाण्यासारखा चहा ! उबगलोय मी. वाटायच, आपल्या इकडच्यासारखा शंकरविलासचा बादशाही पाणी-कम चाय मिळाला तर काय बहार होईल ? फादर डिलाहूथकडे मला तशी बंधनं नाहीत. माझी हौस मी पुरवून घेतो.

तेवढ्यात फोनची मंजुळ रिंग येते. 'फोन खणखणतो' हे शब्द इथं नाहीत. कुणी मदालसा मृदु मंदमंद हंसल्यासारखी ही रिंग. मी रिसिव्हर कानाला लावतो.

'शांताराम हीयर'

पलीकडून पोटभर खळखळून हसल्याचा आवाज येतो.

'बोन्स्वा ! डिड यू गेट गुड स्लीप ?' ती मारी थेरेस–मारी नंबर एक असते.

'मेर्सी ! हाऊ अबाऊट यू ?'

'नॉट सो गुड ! मला क्लासला जायचं ना ? लौकर उठावे लागले. लक्षात आहे ना ? आज मिस् रिपर्ट डिनर देणाराय.'

'माहीताय ? तिचा फ्लॅट कुठाय ?'

'त्याची तू काळजी करू नकोस ! सरळ माझ्याकडे ये. सातच्या सुमाराला.'

तिच्याकडे मी एकदाच गेलोय. कारण. तेही अंधारून आल्यानंतर. ती पुन: विचारते, 'येता येईल की मी घ्यायला येवू ?'

'नाही नाही. मी एकटाच येईन ! कसं यायचं तेवढं सांग.'

'तुझ्याकडे मेट्रोचा नकाशा आहे का ?'

मेट्रोचा नकाशा फादर डिलाहूथनं पहिल्याच दिवशी माझ्या स्वाधीन केला असतो. घरापासून मेट्रोचं स्टेशन 'अनातोले फ्रान्स' पर्यंत पायी फिरवून आणलं असतं. मी म्हणतो, 'आहे की !'

'मग नजरेपुढं ठेव !' मी नकाशा डोळ्यापुढं धरतो. ती बोलत असते, 'तू राहतोस ते उपनगर, लेवालुई पेरे. तुझं मेट्रोचं स्टेशन आहे अनातोले फ्रान्स. अन् तुला यायचे आहे ते मिचेल बिझो ह्या मेट्रोच्या स्टेशनात. अनातोले फ्रान्सहून तू गॅलीनीच्या डायरेक्शनची मेट्रो घ्यायची, 'मी नजर गॅलीनीच्या डायरेक्शनकडे टाकतो, 'मधेच एक स्टेशन आहे–रिपब्लिक. तिथं तुला गाडी बदलावी लागेल. क्रीटेल डायरेक्शनकरिता रिपब्लिक नंतरचं दहावं स्टेशन आहे मिचेल बिझो. कुड यू स्पॉट इट आऊट ?'

'येस. येस. पुढं सांग.'

'मेट्रोच्या बाहेर यायचं. तिथं कुणालाही हॉस्पिटल ट्रूसो विचारायचं. हॉस्पिटलच्या अलीकडेच रू रँबरविली आहे. त्या सडकेवरच्या सहाव्या बिल्डिंगमधे आलास की तुला सारं आठवेल. येऊ शकतील ना ?'

तिच्याकडे जायचं म्हणजे अख्ख्या पॅरिसला नॉर्थवेस्ट टू साऊथवेस्ट असा छेद द्यायचा. मी एका टोकाला राहतो; तर ती दुसऱ्या. तिच्याकडे एकटं जायचं म्हणजे अॅडव्हेंचर आहे. मला ते आव्हानासारखं वाटतं. तसं एक आहे. हातात मेट्रोचा नकाशा असेल, तर प्रवासी नवाडा असला तरी पॅरिसमध्ये हरवू शकत नाही. संपूर्ण शहराखाली अंडरग्राऊंड रेल्वेचं–मेट्रोचं–जाळं आहे. मेट्रोनं शहराला उभे आडवे एकूण चौदा छेद दिलेले आहेत. नऊ ठिकाणी तर ती थेट सेन नदीखालून तिला विभागून जाते. एका स्टेशनाचं दुसऱ्यापासूनचं अंतर अर्धा किलोमिटर आहे. पॅरिसमध्ये प्रवासी वर कुठेही असला तरी, त्याच्या अवतीभोवती मेट्रोची स्टेशन्स असतात. फक्त थोडं अंतर चालावं लागतं. पॅरिसची मेट्रो शहात्तर वर्षांची झालीय. चालताचालताच पेव्हमेंटवर एक कटधारा दृष्टिक्षेपात येतो. तिथं मेट्रो ही अक्षरं लिहिली असतात. त्याखाली स्टेशनचं नाव. पॅरिसच्या एकूण जनसंख्येच्या (९५ लाख लोकसंख्या) चाळीस टक्के लोक मेट्रोनं प्रवास करतात. मेट्रोच्या प्लॅटफॉर्मवर गाडीसाठी ताटकळत बसावं लागत नाही. पीक अवर्समधे दर नव्वद सेकंदाला एक गाडी

असते. मेट्रोचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे कुणीही तिकीट विचारणार नाही किंवा मुक्कामावर पोचलं की तिकिटे गोळा करायलाही कुणी चेकर नाही. नऊ फ्रँकची दहा तिकिटं एका बंचमध्ये मिळतात. ती कितीही दिवस वापरता येतात. आत जाताना एक प्रवेशबंध (Barrier) असतो. तिकीट आत सोडायला बंधापुढं स्लॉट असतो. स्लॉटपुढे तिकीट धरले की चुंबकीय प्रक्रियेने ते आंत ओढले जाते. तिकिटाच्यामागे मॅग्नेट स्ट्रिप असते. दुसऱ्या स्लॉटमधून तिकीट बाहेर येतं तेव्हा त्याचं चुंबक नष्ट झालं असतं. अन् प्रवेशबंध उघडला जातो. एकदा आत शिरलं की कुठून कुठही जाता येतं. एकदा पंच झालेलं तिकीट पुनः वापरता येत नाही. मेट्रोचे प्लॅटफॉर्मस् आणि सबवेज, एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जायचे मार्ग, विद्युत्‌दिपांनी उजळून निघालेले असतात. प्रत्येक ठिकाणी गाडी कुठून कुठे जाणार, त्या (डायरेक्शनची) मार्गावरची स्टेशनं कोणती हे दाखविणारा बोर्ड असतो. एकाच स्टेशनचे एकाहून जास्त प्लॅटफॉर्म असतील तर, 'करस्पॉन्डस' दाखविणारे बोर्ड असतात. कुठे कुठे तर एका प्लॅटफॉर्मच्या खाली थेट दुसरा प्लॅटफॉर्म असतो. रिपब्लिकसारखं मेट्रोचं स्टेशन म्हणजे वेगळयावेगळया दिशेला जाणाऱ्या गाडयांचं. अंडरग्राऊंड पांच प्लॅटफॉर्मस् आहेत. भुयारी रेल्वेनं प्रवास हा पॅरिसमधील थ्रिलिंग अनुभव आहे. ॲन्ड इट इज मोअर थ्रिलिंग व्हेन यू आर अलोन स्ट्रेंजर इन पॅरिस.

गाडया अगदी जुनाट वाटतात. *आपल्या* हारबर ब्रँचवर चालतात तशा. सोई थोडया जास्त. म्हणजे बेंचांना गाद्या वगैरे. प्रत्येक डब्यात दारावर स्टेशन्स दाखविणारा *नकाशा* असतो. गाडी सुरू व्हायच्या आधी दारं बंद होतात. प्लॅटफॉर्मवर आली की उघडतात. एकदा प्लॅटफॉर्मवर उतरलं की पुनः सोर्टी, डायरेक्शन, करस्पान्डन्स असे बोर्डस् असतात म्हणजे नवाडया माणसालाही पॅरिसमध्ये हरवायची शक्यता अगदीच कमी. सबवेवर दुकानं असतात. वर्तमानपत्रं, मासिकं, सोवेनीर्स, सिगरेट, तंबाखू, च्युईंगगम आदी वस्तू मिळू शकतात. काही ठिकाणी काही मुली वायोलीन वाजवताना दिसतात. कुठेकुठे एखादा मुलगा क्लॅरोनेट वाजवत असतो.

काही उदरनिर्वाहाकरिता; तर काही शिक्षण सुरू ठेवता यावं म्हणून. कुठेकुठे मोरोक्कोतील निग्रो मुलं, मुली हस्तकला वस्तूंचं दुकान थाटून बसलेली असतात.

'येवू शकशील ना?' तिच्या प्रश्नाला माझं निर्धाराचं उत्तर असतं, 'सर्टनली!' ऐकून ती परत हसते, 'आणि बघ, काही त्रास झाला, भटकलास तर, असशील तिथून सरळ फोन कर. मी कारनं तुला घ्यायला येईन.' तिचा आश्वासित स्वर बराच उत्कट असतो.

'खात्री असू दे तशी पाळी तुझ्यावर यायची नाही.' मी स्पष्ट सांगतो.

'आणखी एक सांगायचं राहिलं. आम्ही तुझी भेट आज एका चित्रकाराशी ठरवली आहे. दुपारी दोनला तुला त्याच्या घरी जायचं आहे. त्या चित्रकाराचा पत्ता नोट कर.'

मी डायरी काढतो–'हं! सांग.'

'ज्याँ क्लॉद मरोल. त्याचं नाव हं! त्याचा पत्ता लिही. टेन, रू डि 'ओरचॅम्प, पॅरिस अठरा...लिहलंस! शाबास! तो मोमात्रला राहतो. मेट्रोचं स्टेशन अबीस्. ॲनातोले फ्रान्सहून स लाक्षारला उतरायचं. तिथून बारा नंबरचा रूट आणि पोर्ट डि ला चॅपेल डायरेक्शन घ्यायची.'

'अग, जरा हळूहळू सांग. तुझा वेग तर मेट्रोपेक्षाही जास्त आहे. मी नवखा, परदेशी माणूस. सारं समजून घेऊ दे.'

'ओह! यू आर स्मार्ट! तुला इथं काहीच कठीण जायचं नाही. ॲबिस् स्टेशनात मेट्रोच्या बाहेर आलास की पत्ता कुणालाही विचार, आय् होप यू वील फाइंड इट ईझीली.'

'डोन्ट वरी. एक सांग! ह्या चित्रकाराला तू व्यक्तिशः ओळखतेस् कां?

'नाही! पण भेटीत माझा रेफरन्स... किंवा मिस् रिपर्टचा दे. तिच्या मैत्रिणीचा तो कझिन् आहे.''

'ओ. के. आणखी काही?'

'नेक्स्ट व्हेन वुई मीट इन् दी इव्हिनिंग!'

'मेर्सी...' मी रिसिव्हर खाली ठेवतो.

फोनवर ती चक्क दहा मिनिटं बोलत राहिली असते.

मी किचनमध्ये लुडबुड करतो. लंच आटोपायला तितका वेळ नसतो. सोबत न्यायला लंचपॅक तयार करतो. लांबोडया ब्रेडस्टिकचे चार सारखे भाग करतो. प्रत्येकाला उभा कापतो. एकात चीझ आणि लोणी गच्च भरतो. स्लाईस्ड पोर्कच्या दोन चकत्या त्यांत भरतो. छोटा प्लॅस्टिकचा डबा काढून त्यात दोन ब्रेडस्टिकचे तुकडे, दोन उकडलेली अंडी भरतो. वेफरचं पॅकेट, दोन मोसंब्या अन् प्लॅस्टिकचा डबा हॅण्डलूमच्या सुती शोल्डर हॅंगिंग बॅगमध्ये टाकतो. एक बीअरची बाटलीपण.

बाहेर येतो तेव्हा वातावरणात गारवा जाणवतो. थोडयाच वेळापूर्वी उन्ह होते. वातावरण एकदमच बदललंय्. आकाश गढूळ झालंय्. पावसाची सर यावी एखाद वेळेस! बरं झालं रेनकोट सोबत आहे म्हणून. पॅरिसमध्ये पावसाचा भरवसा नाही. नको असलेल्या पाहुण्यासारखा आहे तो. केव्हा, कुठे आणि कसा गाठील काही सांगता यायचं नाही.

घडयाळात दीड वाजलाय्. मेट्रोत गर्दी नाहीच. अख्ख्या डब्यात मोजून दहा बाया-*माणसं* आहेत. *कितीतरी जागा रिकाम्याच* आहेत.

विलीयर्स स्टेशनवर एक मुलगी माझ्या *शेजारी येऊन* बसते. तिनं शर्ट *अन्* बेलबॉटम घातलाय्. केस मोकळेच आहेत. इकडच्या फ्रेंच मुलीसारखे तिचे डोळे आकाशी रंगाचे नाहीत. तिचा वर्ण गव्हाळ आहे. तिनं उगाच मेकअपही केलेला नाही. कशी साधी आहे! येना येवून ती हातातलं पुस्तक वाचायला सुरवात करते. पुस्तक तिनं पोटाशी ओढून धरलं आहे. त्यामुळं वक्षाचा उभार जास्तच उफाळून आल्यासारखा वाटतो. आली तेव्हा अघळपघळ शर्टमुळे तिच्या ऐश्वर्यसंपन्नतेची जाणीव झाली नव्हती. माझ्या नाकात मात्र यू डि कोलोनचा वास भरून राहतो.

पुढच्या स्टेशनात एक जोडपं येतं. तारुण्यात आणि मस्तीत धुंद. डब्यात येतात तेव्हाच वाटतं, एक धबधबा–पाण्याचा खूपसा ओघ आमच्याच डब्यात आलाय्. ती एक दुसऱ्याशी खूप हसून हसून बोलत असतात. बाई गोरीपान आहे. तिनं खूपच भडक रंगाचे कपडे घातलेयत्. कपडे अंग झाकण्यापेक्षा अंग दाखवीत आहेत. तिच्या पापण्यावर मस्कारा आहे. भुवया रंगवल्या चेहऱ्यावर

फाऊंडेशन, गडद गुलाबी लिपस्टिकचा जाड थर. त्यानंही इतर फ्रेंच माणसापेक्षा कपडे जास्त व्यवस्थित पेहरले आहेत. एरव्ही जीन्स अन् जॅकेट्स् घालणारी इथली माणसं. हा मात्र अपवाद. ह्यानं सूट घातलाय्. टायपण बांधलाय्. ह्याच्या मिशा करडया लालसर कोरीव. केस मानेपर्यंत आलेले. स्टील फ्रेमचा मोठा मॉड चष्मा डोळयावर आहे. ते आलेतच मुळी एक दुसऱ्याला घट्ट खेटून.

मी त्यांच्याकडे चोरून आळीपाळीनं पाहतो हे बाजूला बसलेल्या मुलीच्या डोळयातून सुटत नाही. ती उभं बोट दाबून पुस्तक मिटते.

मी भारतीय आहे ह्याचा अदमास तिनं घेतलेला असतो.

'आर यू शॉक्ड टू सी धिस् ?' अनिमिष नेत्रानं माझ्याकडे पाहत ती हसत विचारते. आपोआपच मधल्या भिंती कोलमडून पडतात. मी डोळे भरून तिला पाहतो. भुंग्यासारखे काळेभोर मोठ्ठे डोळे. चेहराही आपल्या इकडच्यासारखा. असे डोळे—मोठ्ठे, काळेभोर ...मी या आधीही पाहिलेत. कुठे ? कुठे ? आठवतं. पुरीच्या पान्थनिवासात मीरा नावाची रिसेप्शनिस्ट होती. भरीव गालाची, भरल्या अंगाची तिच्या अंगांगांत समृद्धी दृगोचर होत होती. तिच्या पाहण्यात, बोलण्यात, आर्जवात वेगळीच आर्तता होती. सौंदर्य होतं. मग पुढे कोणारकला प्रत्येक शिल्पात मला मीराच दिसत होती. वाटत होतं त्या अनामिक कलावंतांनी कुठे मीरेलाच मॉडेल ठेवून दगडात शृंगार नायिका घडविल्या की काय ? पान्थनिवास सोडताना मी खूप काही मागे सोडून आलो होतो. सोबत होती फक्त पुरीच्या समुद्राची गाज आणि आत खोलवर पाहणारी, काळजाचा ठाव घेणारी नजर. तशीच नजर, तसेच डोळे. पॅरिसच्या मेट्रोत मला न्याहाळीत आहेत. खूपच सेन्स्युअस नजर आहे तिची. अस्वस्थ होतो मी. आकाशात वाटतं खूपसे पक्षी उडत आहेत. आत खूप लाटाच लाटा.

'धिस् इज नॉट सो अनकॉमन हीअर !' तीच प्रस्तावना देते.

'धिस इज फ्री नेशन विथ इटस् स्लोगन ऑफ लिबर्टी. व्हाय डू दे मेक देअर प्रायव्हेट अफेअर पब्लिक ?' मी विचारतो.

ती हसते खूप. 'आर यू इंडिअन ?' प्रश्न विचारून माझ्याकडे पाहते.

'आय् होप यू आर नॉट शॉक्ड टू सी इंडिअन इन पॅरिस ?'—मी.

'ओह् ! नो...'

'आर यू फ्रेंच ?'

'नाही...' मी तिच्याकडे पाहायला लागतो. माझ्या डोळयात खूप प्रश्न असतात. ती एक एक शब्द हळूहळू बोलू लागते,—'आय अॅम ऑफ ए मिक्स्ड स्टॉक !'

'.........'

'माय पपा...ही इज फ्रेंच.'

'अन् आई ?'

'पाकिस्तानी...नाऊ इट इज बांगला देश.'

तरीच ! मला तिच्या वर्णाचा, तिच्या डोळयांचा, तिच्या काळया केसांचा एकदमच उलगडा होतो.

'तुझे पपा काय करतात ?'

'ते काहीच करत नाहीत.'

'म्हणजे ?'

'ते मागेच गव्हर्मेन्टं असाईनमेंटवरून रिटायर झालेत. ते फ्रेंच गव्हर्न्मेंटचे एकॉनॉमिक अॅडव्हायसर टू अंडर डेव्हलप्ड कंट्रिज होते.' तिनं पुस्तक चक्क मिटलं असतं.'

'तू काय करतेस ?'

'नोकरी करते. तू कसा आलास फ्रान्समध्ये ? टूरिस्ट म्हणून ?'

'मी पर्स्पेक्टिव्ह आशियेनच्या सौजन्यानं आलोय. गेला महीनाभर ठिकठिकाणी हिंडतोय. फ्रेंच फॅमिलीजमध्ये गेस्ट म्हणून राहतोय.'

'आता कुठं चाललास ?'

'मोमात्रला ! एका चित्रकाराला भेटायचं आहे.'

'आर यू ऑल्सो अॅन् आर्टिस्ट ?'

तिच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावं कळत नाही. मी कलावंत नसलो तरी, जगभरचे कलावंत मला माझेच सगेसोयरे वाटतात ते मला माझेच सहधर्मी वाटतात.

'आय बिलीव्ह इन् रिलीजन ऑफ आर्ट !'

'देन यू आर इन ए प्रॉमिस्ड लॅंड.'

'तू कुठं चाललीस ?'

'ऑपिराला जातेय. तू सॅं 'लाझारला उतरणार ना ? तिथं तुला गाडी बदलावी लागेल. तुझं स्टेशन येत आहे. पॅरिसला सवड झाली तर कधी भेट,'

'थॅंक्यू, पत्ता दे की !'

मी डायरीचा कागद काढून माझा पत्ता दिला असतो. मी प्लॅटफॉर्मवर उभा आहे. तिला हात उंचावून बायबाय करतो आहे. ती बंद दाराच्या आत उभी आहे. मी प्लॅटफॉर्मवर. गाडी हलते. भुयारात नजरेआड होईपर्यंत मी हात हालवीत उभा असतो. माझ्या हातात तिनं प्रेझेंट केलेले पुस्तक आहे. बोन्झूट्रिस्टीज ( Bonjour Tristessee ) फ्रॅंकाईसी सागानचं. पुस्तकाचं. पान उघडतो. पहिल्या पानावर लिहिलं आहे—विथ लव्ह टू वन फ्रॉम ओरिएंट अॅन्ड एनशियंट लॅंड, अॅन्डे दि लॅंड ऑफ माय ड्रीम—मायाह् लॅवीशे. पुढं पत्ता, फोन नंबर आहे.

माया ! जोपर्यंत भारत, माझा भारत पाहिला नाहीस तोवर ठीक आहे. लॅन्ड ऑफ ड्रीम म्हणतेस. पाहशील तर काय म्हणशील ? माहीत नाही !

मला फ्रेंच येत नाही. अन् माझ्या हातात फ्रेंच पुस्तक असतं. एक कादंबरी. मला फ्रेंच शिकावंच लागेल. मी पुढंपुढं जात असलो तरी वाटतं तिचे डोळे पाठलाग करीत आहेत.

अॅबिस मेट्रोच्या बाहेर येतो. पाऊस पडून गेलाय. दगडी बांधून काढलेल्या सडका, मोटारी, ओल्या दिसतात पण आता पाऊस निवळलाय. आकाशही निवळलंय. वातावरणाला एक ओली सर्द झाक आहे. इथं पॅरिसमध्ये असल्यासारखं वाटत नाही. छोटी छोटी घरं. एकाला एक भिडून आहेत. रस्ते बोळागत चढणीचे. रस्त्यावरचा प्रत्येक बोर्ड मी वाचीत असतो. एक दोघांना हातातील पत्त्याचा कागद दाखवतो. तीही माणसं इथं नवीन असावीत. तोंडाचा चंबू करतात.

बऱ्याच शोधानंतर रू ओर चॅम्पमधील दहा नंबरच्या घरापुढं येतो. दोन मजली जुनाट घर. उभ्या सरळ तटासारख्या भिंती मी दारातून आत जातो. तो पॅसेज असतो. पॅसेजच्या उजव्या डाव्या बाजूला दार आहेत. ती बंद आहेत. अगदी पुढे एक दार आहे. दारावरची बेल मी वाजवतो. दार किंचित उघडं धरून एक गृहस्थ उभा असतो. मी त्याला विचारतो, 'मस्य ज्यॉं क्लॉद मरोल ?' अंगुलीनिर्देश जिन्याकडे दर्शवीत तो दोन बोट माझ्यापुढे धरीत मला दुसऱ्या माळ्या-

वर जायला सांगतो. दुसऱ्या माळ्यावर पोचतो तिथं दारावरच एक कागद डकवला असतो. त्यावर अक्षरं चित्रित केलेली मरोल. दार उघडलं जातं. सुदृढ बांध्याचा उचसा दणगट तरुण दारात उभा आहे. त्यानं जीन्स आणि तंग टी शर्ट घातलंय्. तो अँथलेटसारखा वाटतो त्याचे डोळे ओढाळ आहेत. गालांची हाडं वर आलीत. चेहरा वरून दाबल्यागत पिचका केसं अस्ताव्यस्त. त्याच्या मागे त्याच्या खांद्यावर हात ठेवून एक तरुणी उभी होती. ती अगदीच किड-किडीत आहे. केस लांब, किंचित लालसर झाक केसांना. मोकळे सोडलेले. मद्याच्या लांब गळेदार पेल्यासारखा चेहरा. कोंदणात जेड बसवल्यासारखे डोळे. धनुष्याकार कागदी ओठ. वेष अगदी साधाच. टोंघळ्या-पर्यंत पोचणारा क्रीमरंगाचा सुती फ्रॉक.

मी हात पुढ करतो, 'बोन्स्वा, आय अॅम शांताराम.'

तो माझा हात आपल्या हातात घेतो. पहाटेच्या प्रकाशासारखे हसू त्याच्या ओठा-वर फाकते. तिचे डोळे फुलपाखरासारखे हसतात.

'वेलकम होम!' माझा हात धरून तो मला आत नेतो. बायकोचा परिचय देतो.

'क्षमा करा. मला यायला उशीर झालाय. तुम्हाला मी खोळंबत ठेवलं–' मी.

'हरकत नाही! घर शोधायला त्रास पडला का?'

त्याला इंग्रजी स्पष्ट बोलता येतं.

'थोडा...'

'इट इज बाऊंट टू बी व्हेन यू डोन्ट नो. फ्रेंच.'

तो चौकशी सुरू करतो. केव्हा आलात? काय पाहिलंत? काय आवडलं? भारतात कुठं असता? काय करता?

'वुड यू लाईक टू हॅव्ह लिटल ड्रिंक?' त्याची बायको, फ्रंकाईसी म्हणते.

'मेर्सी! मी थोड्याच वेळापूर्वी बीयर घेतलीय्.'

'थोड्या वेळानंतर चालेल ना?'

मी त्यांचा फ्लॅट न्याहाळतो. तो फक्त टू–रूम फ्लॅट आहे. किचन अन् ड्रॉईंग रूम एकच आहे. एक शेल्फ तेवढ मध्ये आहे. तोही कलात्मक. त्याला दोन छोट्या फुलांच्या कुंड्या टांगलेल्या. वरच्या पाटीवर बाहेरच्या बाजूनं दिसतील अशा बाहुल्या ठेवल्या आहेत. आत चहासाखरेचे डबे. शेल्फला खालच्या भागात फोल्डिंग पार्टीशन आहे. त्यावर जपानी पद्धतीन पेंट केलेलं चित्र–झाडाची फांदी, पानं फुलं, मरोल म्हणतो,

'फ्रंकाईसीनं काढलंय!' तो बायकोकडे बोट दाखवतो.

त्यांची बसायची, झोपायची, जेवायची एकच खोली. किचनच्या पुढंच भिंतीला टेकून दोन दिवाणे आहेत. दिवसा ते सोफ्याचं काम करतात. रात्री पलंगाचं दोन्ही दिवाणांच्या मध्ये बसका सेंटर टेबल. पार्टी-शनला काटकोनातून विभागून भिंतीशी मोठा आरसा. संपूर्ण आकाराचा. त्या आरशामुळं त्या अपुऱ्या जागेला एक वेगळं डायमेन्शन मिळालंय्. मोकळी जागा (space) नसतानाही किती मोकळं मोकळं, ऐसपैस वाटतं. अशा इंटिरीअर डेकोरेशनमुळं एक नवीन सेन्स ऑफ स्पेस ज्ञात झालंय्.

दुसरी खोली दहा बाय आठची. हिला आत जायला वेगळं दार नाही. नुसतंच ओप-निंग सडकेच्या बाजूला भिंतीत विशाल खिडकी. खिडकीतून बाहेर नजर जाते, आपण बरेच उंचावर आहोत हे एकदम लक्षात येतं. खिडकीच्या बाजूला छोट टेबल आहे त्यावर पुस्तकांच शेल्फ. बाजूला रेकॉर्ड प्लेअर अन् भिंतीला लावून रेकॉर्डस्. काही कॅनव्हास, मरोलनं काढलेले, भिंतीशी टेकवून ठेवले आहेत. मरोलचा वेगळा स्टुडिओ नाही. खाली बसूनच तो चित्रं काढीत असावा. किचनच्या शेल्फवर एक फोटो तसाच ठोकून ठेवलाय्. ब्लॅक अँण्ड व्हाईट. त्याला फ्रेम नाही. फोटोग्राफिक पोर्ट्रेट. म्हाताऱ्या बाईचा बस्ट. साडी परिधान केलेला. चेहरा खूप शांत. डोळे निर्मळ एकूण इम्पॅक्ट सात्त्विक. कलावंताच्या घरात काय कुठं असेल सांगता यायचं नाही. त्यानं स्टडी म्हणूनही काढला असावा. एखाद्या भारतीय म्हाताऱ्या बाईचा.

तो सांगतो,–'फ्रंकाईसी चित्रे काढते. अन् पोएट्री इज इन इर ब्लड' पाण्याच्या पातळीवर शहारा आल्यासारखी ती थर-थरते.

'खरं! प्लीज, रिसाईट ए पोएम देन!' वाटतं ती कवितेत अंतर्बाह्य ढवळून निघते. तिचे डोळे फडफडतात. ती ज्ञान्यासारखी अवखळ हसते, म्हणते, 'फ्रेंच पोएट्री हॅज वोर्न ए कोलोक्विअल लुक इट इज डिफि-कल्ट टू ट्रान्सलेट.'

'जगभर कविता असाच फॉर्म घेत आहे. त्यामुळं कदाचित ती अनअडल्टरेटेड् असावी. तिथल्यातिथल्या मातीला जवळची होत असावी. मेझमधे मी एका शिक्षिकेला कवितेसंबंधी विचारलं होतं ती काय म्हणाली? शी गेव्ह मी ए शॉक! ती म्हणाली. पोएट्री इज नॉट दी ट्रू ओरिजनल फॉर्म ऑफ एक्स्प्रेशन इन फ्रान्स.'

'हे खरं नाही, हं!' फ्रेंच कवितेचा कैवार घेत ती म्हणते, 'शी मस्ट बी इग्नोरंट ऑफ हर हेरिटेज. स्पेशियली लिटररी हेरिटेज.'



'हो ना! जगभरच्या वर्कर्सना 'इंटरनॅशनल देणारा युनीज पोशियर, रिम्बॉ, बॉदलेयर, ह्युगो, मोलियेर, म्युसेट' ला फोंटेन–नाव तरी किती घ्यावीत? ही सारी इथल्या मातीतली माणसं. तसं पाहिलं तर काळाचा खरा स्तर इथं कवितेत रूजला, कला आणि कवितेत मूव्हमेंट इथं जन्माला आल्यात.'

माझ्या माहितीवर ते दोघेही खूष दिसतात.

'तुम्हाला बरीच माहिती दिसते?' साश्चर्य ती विचारते.

'पोएट्री इज माय फर्स्ट लव्ह.'

'डू यू ऑल्सो राईट?' तिच्या डोळ्यांत भयंकर उत्कटता आहे.

'अनफॉर्च्युनेटली नॉट! बट आय ॲम ऑफ फर्म कन्व्हिक्शन दॅट पोएट्री इज टू बी फेल्ट, फेल्ट ॲट हार्ड.'

'ओह् येस! श्युअर...' मरोल म्हणतो. 'मलाही कवितेतलं फारसं समजत नाही; पण कधी कधी माझ्या धुंदीत असलो की, वाटतं ही धुंदीच एक कविता आहे. मी चार्ज झाल्यासारखा असतो. दिवसचे दिवस. आंत काहीतरी आकार घेत असतं. रेषात, रंगात धरता येत नाही. खूपच अस्वस्थ असतो अन् जेव्हा कॅनव्हासवर रंग ओततो तेव्हा वाटतं. मी चित्र काढीत नाही. मी एक कविता रेखीत असतो.'

मला दोघांचंही कौतुक वाटतं. दोघंही शब्द, रेखा, रंग ह्यात हरवलेले आहेत. तो त्याचं एकएक चित्र काढतो. ओळीनं भिंतीशी लावतो. त्याच्या रंगाचा वापरही मोठा प्रतीकात्म आहे. कुठेही भडक रंग नाहीत. लालगर्द, दाट पिवळा–असे रंग नाहीतच. रंगात कोवळी, मुलायक झाक आहे. डोळ्यांत हलकेच उतरतील, खुपणार नाहीत असे रंग– फिक्कट जांभळा, हिरवा, निळा किंवा राखाडी.

एक चित्र मी सारखं पाहत राहतो. अंतरात उतरावं ह्या इर्षेपोटी. वर अनंत आकाश, कॅनव्हासच्या एका कडेपासून दुसऱ्या कडेपर्यंत फरसबंदी (Paved) केलेलं मैदान. पॅरिसच्या कुठल्याही सडकेचं वाटावं असं आकृतीबद्ध बांधकाम. आधुनिक यंत्रयुगाचा नीटनेटकेपणा प्रतीत व्हावा असं. व्यवस्थित सुंदर साफ. मधेच ह्या व्यवस्थीत बांधकामाला तडा गेलाय. मधूनमधून दगड उखडू पाहत आहेत. पृथ्वीच्या पोटात होणाऱ्या आंदोलनांनी (Tremours) चांगलं, सुंदर, व्यवस्थित केलेलं सारं तुटू पाहत आहे. उखडू पाहत आहे. पहाडाची दोन अणकुचीदार टोकं फरशा बाजूला सारून वर येवू पाहत आहेत.

मी कॅच करायचा प्रयत्न करतो. म्हणतो, 'ह्यात काही गूढवाद (Mysticism) प्रतीकात्म तर दाखवायचा नाही ना?'

'माझी प्रवृत्ती, मेंटल सेटअप, थोडा आध्यात्मिक आहे. चित्र रंगवताना मेटॅफिझिकल प्रतीकं घोळ घालीत होती.'

अपोआपच त्याचे रंग, त्याचे आकार, त्याचे तत्त्वज्ञान ह्यांचा मला उलगडा होत असतो. 'तुम्ही कलेचा शास्त्रशुद्ध अभ्यास केलाय् काय?'

तो थांबतो. बायकोकडे पाहतो. दोघंही हसतात.

'खरा अभ्यास हिनं केलाय. हिच्या प्रेमात पडलो अन् हिनं मला कलेची दीक्षा दिली. कलेचा धर्म दिला. तसा मी आर्किटेक्ट होतो. चार चौघासारखं चैनीत आयुष्य लोटता येईल अशी फॅट सॅलरीची नोकरी होती. एक दिवस ते सारं मी माझ्यापुरतं संपवून टाकलं. पोटापुरतं कमवायला तेच काम पुरेल ज्यासाठी माझा आत्मा तडफडत होता. मला माहीत होतं, सारं सोडायचं म्हणजे संघर्षाला तोंड द्यायचं. मी आव्हान स्वीकारलं. अन् मी खरंच फार सुखी आहे. माझ्या गरजा माझ्यपुरत्या मी मर्यादित करून टाकल्या. तुम्ही पाहता आहात, आम्ही कसे राहतो? ह्या अपार्टमेंटला कॉमन बाथरूम आहे, कॉमन टॉयलेट आहे. साधारण फ्रेंच माणसाकडे असतात तितक्याही सोई नाहीत. तरी आम्हाला त्याच पुरे आहेत.' त्याच्या शब्दांना तृप्तीचा गंध होता. तिच्या डोळ्यांत आश्वस्त भाव होते.

'पोटापुरतं कमवता येतं का? काही संघर्ष? काही विषाद!'

'येतं तर! मी अधूनमधून टी. व्हीवर आर्ट सिरीज देतो. इथला कॉमन मॅन मी रिप्रेझेंट करतो. तो बघा हा–' म्हणत एक चित्र तो माझ्या स्वाधीन करतो. माणसासारखा माणूस. पण त्याला डुकराचं तोंड 'हा मिडलक्लास इंटेलिजेन्शिया प्रस्तुत करणारा माझा प्रतिनिधी. ह्याच्याद्वारे मासिकातून, टी. व्हीतून मी माझी प्रतिक्रिया व्यक्त करीत असतो. ही स्पीक्स् ऑन कल्चर, सोसायटी, पार्टीज, आर्टस्, लिटरेचर ॲन्ड लाईफ.'

'आमच्याकडेही असा कॉमन मॅन आर. के लक्ष्मणचा आहे.'

'आय नो दॅट...' त्याच्या उद्गाराचं मला आश्चर्य वाटलं.

'गांधीच्या भाषेत म्हणायचं म्हणजे अगदी सिंपल लिव्हिंग आहे तुम्हा दोघांचंही, लाईक एनी इंडियन.'–मी.

'आय डोन्ट नो दॅट! बट आय फील... नो...बोथ ऑफ अस फील स्पिरिच्युअली अटॅच टू इंडिया.'

माझं कुतूहल जास्तच चाळवतं.

'दहा वर्षांपूर्वी आम्ही दोघंही भारतात आलो होतो. खूप हिंडलो. आमचे काही दुराग्रह गंगेच्या पाण्यात बुडवून टाकले. सोबत येताना काही श्रद्धा होवून आलोत. त्याच श्रद्धा आम्ही जगवतो आहोत, मरोल.

'म्हणजे?–'–मी.

'गुरुशीपवर तसा माझा विश्वास नाही. मला नक्की माहीत आहे की ह्या जगात कुणीही कुणाचा गुरु होवू शकत नाही. पण एक आहे. राठ उन्हात चालल्यानंतर सावलीत बसावंसं वाटतं ना? तशीच एक सावली आम्ही शोधली. ती आम्हाला भारतात मिळाली. त्या सावलीचा अंश वाटतं इथं आहे, पॅरिसमधल्या या इवल्याशा अपार्टमेंटमध्ये आशीर्वादासारखा.'

तो शेल्फवर खिळ्यानं नुसत्याच टोकलेल्या म्हाताऱ्या बाईच्या फोटोग्राफकडे पाहत असतो. बराच वेळ बोलत नाही.

'ती आहे ना? ती सावली आहे.'

मला काहीच उलगडा होत नाही. मी कितीदातरी फोटोकडे पाहतो. वाटतं कधी पाहिलाय् का हा फोटो आपण? कुठं?... कुठं?

'शी इज मा आनंदमयी–' तो म्हणतो, गार वाऱ्याची झुळुक खिडकीतून आत येते. मला आंजारून गोंजारून जाते. 'तिच्या सान्निध्यात आम्ही आलो अन् जादूची कांडी फिरावी तसं झालं. आम्ही अंतर्बाह्य बदललो– स्पिरिट मूव्हड् ऑन दी फेस ऑफ दी वॉटर. याचं सान्निध्य त्या कवितेच्या ओळीसारखं होतं.'

फ्रंकाईसी आतापर्यंत चूपच असते. ती म्हणते–' शी इज नॉट फ्लेश. शी इज स्पिरिट. ...'

'आणि गेली दहा वर्षं...आमच्या नीडस् नाहीत, ग्रीडस् नाहीत. वुई आर विदाऊट मीट ऑल्सो.'

त्याच्या शरीरसौष्ठवाकडे पाहून तसं वाटत नाही.

माझ्या पिशवीत चंदनाचं बॉलपेन आहे. अन् दुसरे आहे राजस्थानचे. लाकडावर सुवर्ण कोरल्यासारखं. मी एक त्याला अन् दुसरे तिला देतो. ती हातानं पेंट केलेली इवलीशी डबी मला देते. त्यावर एक फूल आहे.

मरोल म्हणतो, 'तुमचा मुक्काम आहे का ? सोबत चला एखाद दिवस. माझे एक परिचित आहेत. डॉ. फ्रेडरिक लेबॉय्. भारतीय परंपरा, शिशुसंगोपन पद्धतीनी ते भारले आहेत. दोन पुस्तकंही लिहिली त्यांनी, "बर्थ विदाऊट व्हॉयलन्स' आणि 'शांतला–दी ओरिएन्ट वे ऑफ मसाज' दोन्ही विवादास्पद तरीही बेस्टसेलर आहेत.' पुढे म्हणतो, 'ही सॅक्रिफाईस्ड मेनी गुड थिंग्ज टू प्रूव्ह हिज वर्डस्'

'भेटलंच पाहिजे. आय वुड लव्ह टू मीट हीम.' मी म्हणतो.

निरोप घेतो. निघतो. वाटलं एक सावली माझ्याही डोक्यावर आहे. त्याच्या चित्रातील कोवळी झाक माझ्या डोळ्यात उतरली आहे.

बाहेर मुलायम कोवळं उन्ह आहे. कवितेसारखं ! मी शब्द शोधतोय्. □

## : आठ :

मी दारावरच्या बेलचं बटन दाबतो. दार उघडलं जातं. दाराच्या चौकटीत मारी थेरेस उभी असते. तिच्या ओठावर एक प्रसन्न हसू आहे. 'यू आर सो पंक्चुअल?' ती म्हणते. मी घड्याळात पाहतो. सात वाजून पाचच मिनिटं झालेली असतात. आत तिची कुणी मैत्रीण बसलेली असते. ती ओळख करून देते,–' मॅडम शांतल फोर्जो. माय फ्रेंड.'

मॅडमनं गडद रंगाचं लिपस्टिक लावलं आहे. डोळे निळेनिळे पण भिरभिरणारे. भुवया इतक्या गडद की, वाटतं तिनं त्या रंगवल्या आहेत. कानात गोल रिंग असून त्यात निळ्या रंगाचे लोलक आहेत. घातलेला करड्या मूरम रंगाचा फ्रॉक थेट टोंघळ्याखाली पोचलाय. वक्ष भरीव आहेत. लालभडक रंगाचा पुलओव्हर तिनं घातलाय.

मी हात मिळवतो. बोन्स्वा...बोन्स्वा... ती हसते मोठी गोड. मारी माझा परिचय देते. पुढं सांगते,–' मी दुसरी मारी अन् शांतल एकाच शाळेत शिकलोत.

–' मॅडम राहते कुठं ?'–मी विचारतो.

'न्युएलीला. तू राहतोस त्याच्याही पुढं जावं लागतं. आज तिलाही मी डिनरला थांबायची प्रार्थना केलीय. पण ती नाही म्हणते'–मारी

'कां ?' मी विचारतो, 'प्लीज जॉईन अस. इट वुड बी प्लेझर.'

'मला आईला भेटायला जायचं आहे. गेला महिनाभर तिला भेटता आलं नाही. काल तिच्या शेजारणीने फोन केला. तिची तब्येत जरा अस्वस्थ आहे. ऐकल्यापासूनच मी बेचैन झालेय. केव्हा एकदा जाऊन आईला पाहते असं झालं आहे.' मॅडम शांतल म्हणते.

'आईसोबत कुणी राहतं का ?'

'मी एकटीच मुलगी आहे. ती एकटीच राहते.'

'एकटीच ?' मी आश्चर्यानं विचारतो.

'चला आपण दुसऱ्या मारीकडे जाऊ या. ती वाट पाहत असेल.'–मारी

'कुठं ? जवळच राहते का ती ?'

'नाही रे, बाबा ! बरंच लांब जायचं आहे. आपल्याला. थेट मोपार्नासच्या सिमेट्रीजवळ.' मारी थेरेस म्हणते.

मी, मारी थेरेस पुढं बसतो. कार गती घेते. साडेसात वाजलेत. पण सूर्यास्त झालेला नाही. मॅडम शांतल मागे बसून आहे. अगदी चूप, चिंतीत. आतल्या आत आपल्यातच हरवल्यासारखी निश्चल. जणु कुणा शिल्पकारानं दगडातून तिला ओतलंय. एक चैतन्य गोठवून ठेवलंय.

साल्वासोर कासीमोडोच्या कविता कधी मी वाचल्या होत्या. काहींचा अर्थ वाचताना गवसत नव्हता. संदर्भ सापडत नव्हते. आता जेव्हा मॅडम शांतलला पुतळ्यासारखं निश्चल थिजलेलं पाहतो तेव्हा कासीमोडोची कविता नुसती कविता मात्र राहत नाही तो एक अनुभव होतो. शब्द सजीव होतात.

Everyone is alone on the heart of the earth.

*pierced by a ray of sun.*

*and suddenly it is evening......*

कीव मॅडम शांतलची करावी की तिच्या असहाय म्हाताऱ्या आईची कळत नाही. माझ्या डोळ्यापुढं एक चेहरा येतो. पांढरे पिंजल्यासारखे केसं, खोल गेलेले विझत आलेले डोळे, सुरकुत्यात हरवलेलं पूर्वायुष्य, विकल थरथरणारे ओठ. दारातून दूरवर पाहणारी दृष्टी. कुणी भेटीला येईल या सुखावह आशेत गुंतलेलं मन... सगळंसगळंच कसं दयनीय–दयनीय.

कार थांबते. आम्ही उतरतो. मी मॅडम शांतलच्या बाजूचं दार उघडून धरून ठेवतो. ती 'मेर्सी' म्हणते. तिचे शब्द कसे निर्जीव वाटतात. 'मला क्षमा करा हं ! आय कान्ट जॉईन यू' ती म्हणते.

'थोडं अॅपेरेटिफ् घेऊन जा, शांतल !'–मारी थेरेस म्हणते. शांतल घड्याळात पाहते. आठ वाजत आलेत. 'माय मदर मस्ट बी वेटिंग फॉर मी.' ती म्हणते अन् जायला लागते. मी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत असतो. मनात म्हणतो–आज म्हाताऱीला थोडं सुखी होता येईल. तिच्या ओठावर हसू येईल, तिच्या क्षीण डोळ्यांत आनंद उतरेल. जा मॅडम शांतल, जा ! जरूर जा ! तुझ्या म्हाताऱ्या आईसाठी माझंही मन भरून आलंय.

'शी इज व्हेरी मच सेंटिमेंटल,' मारी थेरेस म्हणते.

अन् म्हणून महिना महिना भेटीला जात नाही ?' मी विचारतो.

'तसं नाही रे, तिला सवडच मिळत नाही. इथं सारे गतीवर स्वार आहेत. तिचा नवरा एका कमर्शिअल फर्ममध्ये आहे. ती एका इलेक्ट्रॉनिक कंपनीत आहे. ह्या शहरात, इथल्या धावपळीत, एवढ्या बर्दीत प्रत्येक जणच हरवला आहे. स्वत:संबंधीही विचार करायला उसंत मिळत नाही.'

रस्ता क्रॉस करून आम्ही चार मजली बिल्डिंगजवळ येतो. आत जायचं काचेचं दार आहे. पण ते बंद आहे. दारावर दहा पुशबटन्स् आहेत. प्रत्येकाचं नाव त्यावर लिहलंय.

' मारी थरेस रिपर्ट ' नावापुढचं बटन ती दाबते. कुणी तरी बोलल्यासारखा आवाज येतो. मारी थेरेस सांगते ' आम्ही आलोत. '

' कम...... ' बटनातून आवाज येतो. अन् दार आपोआपच उघडलं जातं.

' इंडियात अजून अशी पद्धत सुरू नाही झाली ना ? ' मारी विचारते.

' नाही अजून तरी नाही. '

' ती चवथ्या माळ्यावर राहते. आधी तिच्याशी बोलावं लागतं. मग ती लॉक रिलीज करते. तेव्हा कुठं दार उघडतं. '

' धिस इज डिस्कव्हरी फॉर मी. '

लिफ्टनं वर जातो. लिफ्ट उघडताच पहिल्या दारावरची मारी बेल वाजवते. दार उघडतं. मारी थेरेस रिपर्ट आमचं स्वागत करते. ' वेलकम '

पुढं टी. व्हो. वर इटलीत होऊन गेलेल्या भूकंपाचं चित्रण सुरू असतं. तिचा फ्लॅट छोटाच आहे. ड्रॉइंग रूम, बेडरूम, किचन आणि बाथरूम.

तिच्याकडे बसायला दोनच खुर्च्या आहेत. दोन बसके मुंडे आहेत. पुढं छोटा टीपॉय. भिंतीशी खूपशी छायाचित्रं तशीच उभी ठेवली आहेत. दोन चांगलीच मोठी आहेत. सीन नदीच्या एका पुलाचा एक एकाकी कोपरा. झाडाच्या फांद्यातून किनाऱ्यावरची घरं पुसटशी त्यात दिसतात. वातावरण खूपच स्तब्ध. रडून घेतल्यानंतर मुलीचा चेहरा दिसावा तसं पाण्यात लहरी उठल्यात. पुलावर रहदारी नाहीय. आकाश भरून आलेलं.

' तू काय पॅरिस मूड टिपते आहेस का ?' मी तिला विचारतो, ' मारी थेरेसनं मला सांगितलंय तू फोटोग्राफीच्या प्रेमात नुकतीच पडलीय म्हणून. खरं ना ?'

' फोटोग्राफी इज माय पॅशन ! माणसापेक्षा चित्रं बरी. माणसं बोलायची थांबतात. चित्रं, केव्हाही त्यांच्याकडे बघा, त्यांचा डायलॉग सुरू होतो. '

' पॅरिसमधल्या सगळ्या बायांना असं झालंय तरी काय ? एकजात सगळ्या पुरुषद्वेष्ट्या आहेत. ?'

दोन्ही मारी माझ्याकडे पाहून हसतात. नवीन खेळणं पाहून अजाण इवल्या मुलींनी हसावं तशा.

मिस रिपर्ट म्हणते, ' मिस्टर शांताराम, तू स्त्रीजन्माला फ्रान्समध्ये आला असतास ना तर तुला कळलं असतं. तो नेपोलीयन होता. ना ? अख्ख जग त्याच्यापुढे नत आहे. पण इथली स्त्री नाही. त्यानं फक्त पुरुषांसाठीच सारं केलं. आजही मानवजात एवढी प्रगत अन् सुसंस्कृत झालीय, पण माणसाचा स्त्रीकडे पाहायचा दृष्टिकोण तोच, तसाच जुना आहे. पुरुषजातीला ती अजून एक कमॉडिटीच आहे. एक भोग्यवस्तू. इथली फ्रेंच अॅकॅडेमी पाहिलीस तू ?'

' नाही. '

' जा. अवश्य बघ. ह्या देशातले चाळीस विद्वान अॅकॅडेमीत घेतले जातात. एकदा निवडलं गेलं की प्रतिनिधित्व मृत्यूपर्यंत असतं. दुर्दैवाची गोष्ट अजूनही त्या अॅकॅडेमीत स्त्रियांना प्रतिनिधित्व नाही. '

मला खरंच आश्चर्य वाटतं.

ती विचारते,...' अॅपॅरेटिफ् काय चालेल?'

' काहीही !' फ्रान्समध्ये मी स्वतःला चौकटीबाहेर काढलंय.

' त्याला स्वीट ड्रिंक आवडतं.' मारी थेरेस म्हणते. ' असं कर, तुझ्याकडे मार्टिनी आहे का ? आपण सारेच मार्टिनी घेऊ. '

मी आणखी चित्रं पाहत असतो. तिनं रोदीन्च्या कितीतरी शिल्पांचं छायांकन कलात्मक रीतीनं केलं असतं. त्याचा थिंकर, दि किस, दि क्राय, दि कॅथेड्रल, दि सिक्रेट नुसती बोटांची भाषा बोलणारी शिल्पं.

' मिस रिपर्ट, यू आर ए ग्रेट आर्टिस्ट. तुझी चित्रं पाहून माझ्या मनात एक प्रोजेक्ट घोळतंय. ' पॅरिस मूड ' नावाचं आपण दोघं मिळून एक पुस्तक तयार करू. तुझी चित्रं आणि माझं टेक्स्ट. '

' नाही रे, अजून माझाच आत्मविश्वास मला वाटत नाही. मला अजून खूप शिकायचं आहे. ही तर सुरवात आहे. माझा फोटोग्राफीचा अभ्यास गेल्या वर्षभराचा तर आहे !'

' पण लक्षात असू दे. एनी डे यू फील लाईक दॅट, प्लीज रिमेंबर मी. '

' ओह ! श्युअर. '

ती पेल्यात मार्टिनी ओतते. सोबत खायला काळे मनुके अन् बिस्किटं. मारी थेरेस पेला उंचावते,—' चिन्चिन्. ' म्हणते. पेले ओठांना लागतात.

' तुला माहीत आहे ? शांताराम, दुसऱ्या मारीची डार्करूम कुठाय ते ?'

' ह्या फ्लटमध्ये तर मी पाहिली नाही.'

' हर टॉयलेट इज हर डार्क रूम. इझन्ट सो मारी ?' ती दुसऱ्या मारीला विचारते.

मिस् रिपर्ट नुसतीच हसते तिचं हसणं उत्स्फूर्त असं नाहीच. वाटतं, एका भयंकर दडपणाखाली ती हसते आहे.

' शांताराम, ही मारी आहे ना ? मारी दी सेकंड, ही बूर्ज्वा आहे '

' तू काय प्रोलेटरियट आहेस का ? तुझ्याकडेही ते सारं आहे जे तिच्याकडे आहे. फ्रीज, टी. व्ही, फ्लॅट, कार...'

' पण तिच्या माझ्या पगारात मुळी हजार फ्रॅंकचा फरक आहे. '

' तिला एकूण पगार किती मिळतो ?'

' पाच हजार फ्रॅंक. ' मनातल्या मनात मी ' बापरे म्हणतो.

मध्येच मिस् रिपर्ट म्हणते,—' पण मला माझ्या शौकापायी—फोटोग्राफीकरिता बराच खर्च येतो. '

' हौसेला मोल नाही, मिस् रिपर्ट ! ' मी म्हणतो.

' इथं पैशालाच मोल नाही. पैसा कितीही मिळो, हातात टिकत नाही. ' म्हणतच ती पेल्यातली मार्टिनी संपवते.

माझा पेला केव्हाच रिकामा झाला असतो.

मारी थेरेस आणखी अर्धाअर्धा पेग पेल्यात ओतते.

' हाऊ डिड यू फाईंड माय पिक्चर्स ? ' मिस् रिपर्ट.

' फॅंटॅस्टिक ! ही काय तू फ्लॅशनी घेतलीस का ? अॅज फार अॅज आय नो दे डू नॉट परमिट फ्लॅश इन् मुझियम्स् इन् पॅरिस '

' नाही. साध्या कॅमेऱ्याने घेतलीत. आय् अॅम बिगिनर. '

' तसं वाटत नाही. तू तर एखाद्या मुरब्बी कलावंतासारखी वाटल्येस् '

' होप यू आर नॉट टिझिंग मी ? ' ती मंदमंद हसते.

' माय गॉड, आय् अॅप्रिशिएट् यू. '

' मारी. गिव्ह् हिम् पेग मोर...' मिस् रिपर्ट माझी फिरकी घेते.

' मेर्सी. आय नीड नो मोए...' मी हातानंच नकार व्यक्त करतो.

' का रे बा ? '

'जवताना पुन: वाईन राहीलच की ?'

'माझ्याकडे जेवणाची सोय होऊ शकली नाही. आपण डिनर रेस्टॉरंटमध्ये घेऊ! तुझी हरकत नाही ना ?' मिस रिपर्ट विचारते.

'चालेल की ? दोन घास कुठंही पोटात टाकायचेत ना ?'

'जेवण म्हणजे नुसतं दोन घास पोटात टाकणं नाहीय् हं ! इथं जेवण एक समारंभ असतो. माणसं नुसतं पोट भरायला जेवत नाहीत; तर जेवायला जगतात' ( They Live to eat. )

'ते आलंय् माझ्या लक्षात. गेला महिनाभर फ्रान्समध्ये हिंडतोय् मी. आमच्याकडे वाया तेवढचा एक एक घास बत्तीस दातावरून फिरवीत फिरवीत जगभरच्या चौकशा करीत जेवत असतात.'

दोन्ही मारी हसतात. मिस रिपर्ट म्हणते, 'खरं आहे हे ?'

'खरं ! शंभर टक्के खरं !'

'तू इतकं खरं बोलल्याबद्दल तुला एक गिफ्ट देते.' म्हणतच ती एक चित्र माझ्या हातात देते. रोदाँचं 'किस.' खरं तर मला ते पाहिलं तेव्हाच आवडलेलं असतं. तिनं तेही तेव्हाच हेरलं असावं. तिची नजर एकूण खूपच पलीकडचं पाहणारी. मी तिच्याकडे पाहतो. ओठ घट्ट दाबून ती डोळयात हसत असते. तिच्या डोळयातला आनंद अगदी वेगळा आहे, 'देणाराने देत जावे / घेणाराने घेत जावे/ अन् घेता घेता एक दिवस/देणाराचे हात घ्यावे...' ह्या ओळी आपोआपच माझ्या ओठावर येतात. मिस रिपर्टचे हात ते हात आहेत.

आम्ही खालच्या पेव्हमेंटवर येतो. मिस रिपर्ट म्हणते, 'पुढंली भिंत बघतोस ?. तिथं सिमेट्री आहे ! म्हणजे मला फार दूर जायला नको. आय् हॅव्ह ओन्ली टू क्रॉस दि रोड फायनली.'

मारी तिच्या वाक्यावर हसते. मला त्या संवादावर हसता येत नाही. हसत आयुष्याकडे पाहणारी माणसं आतून कधीकधी खूप विद्ध असतात. जगताना कितीतरी अश्रू त्यांनी लपविलेले असतात. त्यांचे शब्द हसण्यावारी नेण्यासारखे असले तरी ते फक्त धिक्कार स्पष्ट करतात.

'मिस रिपर्ट ! असं झालंय् तरी काय तुला ? आयुष्याविषयी इतकं अनासक्त होऊन बोलू नाही, गम्मत म्हणून तू बोललीस. पण आत कुठंतरी काहीतरी ठणकतं आहे. होय ना ?'

'नाही रे ! मी आपली गम्मत केली. उगीच तू संदर्भ शोधायला लागलास.'

'शांताराम, ही तुझी मिस रिपर्ट आहे ना, खरं तर इतकी कधी बोलतच नाही. तुझी वेव्हलेंथ जमलेली दिसते? खूपच मोकळी झाली. माझ्याशीही कधी बोलत नाही.' मारी थेरेस मधेच बोलते.

'त्याचं काय आहे, मारी, तुझे तिचे संबंध शब्दापुरते राहिलेच नाहीत. ते शब्दापलीकडचे झालेत.'

ती वटारल्या डोळयांनी माझ्याकडे पाहते. दुसऱ्याच क्षणी अगदी उन्मळून हसते. पोटभर. मिस रिपर्टसुशी मग फ्रेंचमध्ये बोलते. दोघीही हसतात.

मिस रिपर्ट म्हणते, 'मी गम्मत केली हं! अन् खरंच तशा प्रकारचं काही घडलं ना, तर ही माणसं मला ह्या सिमेट्रीत जागाही द्यायचे नाहीत. अरे, इथं मोठमोठी माणसं दफन केली जातात. ?'

'मोठमोठी म्हणजे ?'

'असामान्य कर्तृत्वाची, बुद्धीची. माहितेय? कोणकोण आहेत ह्या सिमेट्रीत ?'

'सांग ना !'

'गी द मोपासाँ, बॉदलेयर, रूड, बार्डोली. सिझर फ्रँक, काही लेखक, कवी, संगीतज्ञ, शिल्पकार, पेंटर, वैमानिक, गणितज्ञ, खगोल शास्त्रज्ञ.'

मी पोट धरधरून हसतो.

'का ? हसायला काय झालं ?' मारी विचारते.

'अग, एरव्ही एक दुसऱ्याच्या सावलीलाही ही माणसं उभी राहणार नाहीत. पण इथं सारी, साऱ्या क्षेत्रातली, एक दुसऱ्याचा हेवादावा, दुःस्वास न करता आनंदानं अन् गुण्यागोविंदानं राहतात.'

'तुला एक चांगलं प्रहसन लिहिता येईल हं, ह्या पार्श्वभूमीवर !'

'मारी, मी जीवंत माणसावर लिहितो. मेलेल्यावर काय लिहायचं ?'

मिस रिपर्ट म्हणते,–'कधी सवड झाली तर थोडा वेळ आत जाऊन बस. जिवंत माणसांपेक्षा ही मेलेली माणसं बरी ! कुणाचा दुराग्रह नाही, आकस नाही, अपेक्षा नाही' नो डिमांडस्.'

'तू कधी गेली आहेस ?'

'नाही. फायनली एकदाच जायचं आहे.'

'ओह ! डोन्ट टॉक रॉट...' मी आग्रही स्वरात म्हणतो, 'ॲन्ड फर्गेट अबाऊट सिमेट्री नाऊ. लेट अस एन्जॉय नाऊ...'

'ॲज लाँग ॲज वुई आर डूम्ड टू लिव्ह.' मिस रिपर्ट पुढं जोडते.

'बरं जायचं कुठं आपल्याला आता ?' मी विषय बदलायचा म्हणून विचारतो. मारी एक अन् मारी-दोन ठरवतात.

'जवळच जायचंय् आपल्याला. चालतच जाऊ या.' मिस् रिपर्ट म्हणते. आम्ही चालायला लागतो.

उजव्या हाताला वळून सुनसान सडकेनं आम्ही जात असतो. रस्त्याच्या एका बाजूला स्मशानाची उंच भिंत अन् दुसऱ्या बाजूला मोकळं पटांगण. वास्तू नावाची एकही वस्तू तिथं नाही. पेव्हमेंटवर ओळीनं झाडं आहेत. माझ्या घड्याळात अकरा वाजत आहेत. सडकेवरच्या दिव्यांचा उजेडही जसा शापित असावा. वाटलं, वातावरणाला मृत्यूची अवकळा आहे. कुणीही जाताना वा येताना दिसत नाही. वारा भयाकुल शीळ वाजवतो आहे. वाटतं, ते सारे मृतात्मे ह्या सुनसान सडकेवर भटकत तर नाहीत ना ? आमच्या बुटांचाच आवाज तेवढा भयंकर वाटतो. गजबजल्या –पॅरिसमध्ये अनपेक्षित अशी स्मशानशांतता मी अनुभवीत आहे. वाटतं, कोणत्याही क्षणी पुढ्यात पँट, कोट अन् फेल्ट हॅट घातलेला माणूस उभा राहील. डायरेक्ट फ्रॉम दि ग्रेव्ह. सरळ माझ्यापर्यंत चालत येईल. माझा हात हातात घेत म्हणेल–बरं झालं तू आलास. अरे, ह्या लोकांनी मला दगडादगडांनी मारलं. चक्क वेडयात काढलं. हं ! माझं एक चुकलं. न्यायनीतीच्या गोष्टी करणारांची भाषा मी लिहून काढली. अन् काय आश्चर्य, त्यांनाच ती जाचक वाटली. बीभत्स वाटली, अश्लील वाटली. इम्मॉरल वाटली. ऐकलं, तूही लिहतोस ? जपून हं ! वास्तवाला सामोरं जायची ह्या न्यायनीतीच्या गोष्टी करणारांची तयारी नसते. बाय द वे, माझ्या गोष्टी वाचल्यास का ? आता अख्खं जग मला डोक्यावर घेत आहे, हं ! परवा परवा त्या सामरसेट मॉमनं एक लेख लिहिला, म्हणाला, गी द मोपासाँ-

सारखा शॉर्ट स्टोरी टेलर झाला नाही. तेच कशाला सार्त्रची गोष्ट 'दि वॉल' वाचल्या-नंतर समीक्षक काय म्हणाले, माहितेय? अशी गोष्ट मोपासाँच लिहू शकला असता. असू दे. काही म्हण, आत्मश्लाघा महापाप आहे. पण ऐकायला बरं वाटतं. आपल्याच-विषयी बरं ऐकायला मला मरावं लागलं. लक्षात असू दे हं! बरं! बॉन् वी...

'शांताराम! कसा हरवल्यासारखा चालला आहेस? काही बोल की?' मारी थेरेस पाठीवर हात मारीत म्हणते.

'भीती वाटते, कुठं मृतात्मे शब्दांनीही उठतील.'

'ते कशाचे उठायला गेलेत? ते तर कधीचे झोपलेत! चिरनिद्रा.'

'यू नो एलेजी रीटन इन् कन्ट्री चर्च-यार्ड...? पाथस ऑफ ग्लोरी लीड बट टू दी ग्रेव्ह.'

'हे उलटं झालं आता, शांताराम! मी ग्रेव्हसंबंधी बोलल्ये तर अनासक्त म्हणालास. काहीतरी ठणकतं आहे म्हणालास? अन् आता तूही नेमका माझ्याच रांकेत येऊन बसलास? डेथ अलोन मेक्स ए मॅन अवेअर ऑफ रियॉलिटिज ऑफ लाईफ. बर्थ इज अॅन अॅक्सिडेंट. डेथ ए रियॉलिटी.' मिस् रिपर्ट सीरियसली म्हणते.

'मला हे बिनशर्त मान्य आहे.' मी दोन्ही हात जोडून मिस् रिपर्टला म्हणतो.

पुढं खूपसा दिव्यांचा उजेड दिसतो. रस्ता संपतो. तिथंच मेन रोड आहे. मोटारींची वर्दळ. पेव्हमेंट कॅफेत आताही खूप गर्दी आहे.

'हा मोंपार्नासचा बोहेमियन एरिया. लेखक, कवी, चित्रकार ह्यांना मॉंटमोरमध्ये स्फूर्ती मिळेनाशी झाली की ते इथं यायचे, आता सारेच येतात. ज्यांच्या पर्समध्ये पैसा आहे, त्यांच्यासाठी मोंपार्नास आहे. सांग. कसं जेवण घेणार?' मिस् रिपर्ट विचारते.

'कसं म्हणजे?'

'फ्रेंच की इटॅलियन डिशेस्?'

'प्लेझर इज माईन्. चॉईस इज युवर्स.' मी मिस् रिपर्टला म्हणतो.

ती मारीला म्हणते, 'मारी, शांतारामला पिझ्झा आवडेल न?'

'आवडायला हवा. त्याच्या देशात तशी डिश आहे.'

'ल मामात जाऊ या.'

थोडं चालावं लागत. आडगल्लीत 'ल' मामा आहे. सगळ्या वेटर्सचे ड्रेस लालभडक. भिंतींवर चित्रकारांच्या प्रदर्शनाचे पोस्टर लावलेले. बहुतेक टेबलं अक्युपाईड आहेत. सुरुवातीच्या अर्ध्या भागात भिंतीलगत फक्त एकाएका टेबलांची रांग. उरल्या अर्ध्या भागात बार. उभं राहून किंवा स्टूल्सवर बसून मद्यपान करता येतं. पुढच्या संपूर्ण भागात भिंतीशी टेबलं असून जायचा पॅसेज मधोमध आहे. वेटर्स नाचत-गात गिऱ्हाइकांशी वार्तालाप करीत आहेत. एरव्ही फ्रेंच रेस्टॉरंटमधला वेटर खूपच अदबशीर असतो. तसं इथं नाही. गिऱ्हाइका-पेक्षा वेटर्सचा आवाज अन् गोंगाट जास्त. तशात एक वेटर इटॅलियन गाणं म्हणत आहे. स्वतः-भोवतीच फिरकी घेत आहे. तालासुरात अंग-विक्षेप करतोय्.

मी अन् मिस् रिपर्ट साधा पिझ्झा घेतो. मारी थेरेस मसालेदार पिझ्झा मागवते. पिझ्झा म्हणजे आपली मक्याची भाकर. त्यावर थोडं चीझ अन् मटनच्या चकत्या. पिझ्झा काटचाकाकूनं खायचा म्हणजे एक अॅक्रोबॅट. मद्याचे पेले ठेवले जातात. एका चिनी मातीच्या जगमध्ये वाईन ठेवली असते.

एक पिझ्झा खाल्ला की ढेकर आलीच पाहिजे.

आमचं जेवण सुरू असताना एक गायक येतो. मधल्या पॅसेजमधे गिटार वाजवीत असतो. तो इटॅलियन गाणं म्हणतो. गाणं संपताच प्रत्येक टेबलाजवळ जातो. कुणी त्याला एक फ्रॅंक तर कुणी दोन फ्रॅंक देतात. मारी थेरेस म्हणते,–'तो विद्यार्थी आहे. रात्रीचा इथल्या रेस्टॉरंटस्मध्ये गाऊन पोटा-पुरतं कमावतो.'

'मला शब्द समजले नसले तरी वाटतं, त्याच्या गाण्यात दर्द होता.'

'संगीताला वेगळी भाषा कुठाय्? इट इज टू बी एन्जॉईड अॅट हार्ट.' मारी थेरेस हृदयावर उभं बोट धरते.

'शांताराम्, मारी सिंग्ज वेल.' मिस रिपर्ट.

'मग केव्हा ऐकवणार?' मी मारीला विचारतो.

'नो मॅन. शी इज टिझिंग...'

'व्हेनेव्हर यू फील लाईक. सो लॉंग अॅज आय् अॅम इन पॅरिस.'

'प्रॉमिस...' ती टाळी देते.

पिझ्झा खूपच कडक भाजला गेला असतो. आपल्या इकडच्या शेकल्या गेलेल्या भाकरीची आठवण होत. कमी फक्त लसणाच्या किंवा कांद्याच्या चटणीची. मी मारी एक अन् मारी दोनला सांगतो. मारी एकनं भारतात आली असताना पुण्याजवळच्या खेड्यात भाकरीचा अनुभव घेतला असतो.

खाणं संपताच मारी थेरेस म्हणते, 'चल तुला चांगल्या ठिकाणी नेऊ आता. इफ् यू आर लकी यू मे सी सार्त्र एण्ड सिमोन् द ब्युवा देअर.'

'अॅट धिस टाईम?'

'दे कम व्हेरी ऑफन टू ल कपोला. एवढ्यात मात्र दिसत नाहीत. सार्त्र इज एलिंग जिनीयस्. त्याला दिसतही नाही. मला वाटतं ही इज ऑन् दी बेड. लेट अस् ट्राय अवर लक.'

पॅरिसमध्ये आल्यापासूनच मी ल कपोला-विषयी ऐकून आहे. तिथं म्हणे रात्री कोण-कोण येतं! पॅरिसमधले श्रीमंत, कारखान-दार, पत्रकार, नट, नाटककार, कवी, चित्रकार, फॅशन डिझायनर्स, समाजातल्या सगळ्या थरांतील बायामाणसं.

आम्ही तिथं आईसक्रीम खाणार असतो. मारी थेरेस म्हणते–'अख्ख्या पॅरिसमध्ये सर्वांत चांगलं आईस्क्रीम कपोलात मिळतं.' साडेबारा वाजलेत. पण कपोलात गर्दी भरून आहे. ल कपोला खूप मोठं हॉटेल आहे. आत तर एखाद्या मोठ्या सभागृहासारखा लांब-रुंद हॉल आहे. इतर हॉटेलच्या तुलनेत इथं दीव्यांचा झगझगाट आहे. गर्दीही खूप आहे. बसायला जागा नाही म्हणून आम्ही काही वेळ पेव्हमेंटवर उभे असतो. वेटर येऊन अतिशय दबक्या आवाजात अदबशीरपणे सांगतो–टेबल रिकामं झालंय्. हा भाग पेव्हमेंटवरच असतो. कपोलाचा पुढचा भाग नुसता काचेच्या भिंतीचा आहे. आम्ही बाहेर बसलो तरी आतली मंडळी, बेअरर्स, त्यांची अदब, गिऱ्हाइकांचं मद्यपान, जेवण सारं सारं पाहत असतो. एकेक फॅशनेबल बाई नजरेत उतरते. कुणाची वेगळीच हेअर स्टाईल; तर कुणाचा वेगळाच नूर अन् नखरा. काहींची लांब रंगवलेली नखं, डोळ्यांवर कृत्रिम पापण्या, ओठांवरचं गडद लिपस्टिक, कप-ड्यातही किती किती प्रकार? अन् रंग? गिऱ्हाइकांच्या चेहऱ्यावर त्यांच्या पर्समधल्या पैशाची चमक आहे. माझी नजर दूरवर सारखी भिरभिरत असते. सार्त्र दिसतो का? ब्रिजिट बार्डो आहे का? रेनी चार दिसतो का? ओळखीचा एकही चेहरा नव्हता. माझं मन मला मागे घेऊन गेलं. कितीतरी वर्षे. तेव्हा ल' कपोला एवढ्या श्रीमंतीत उजळून निघालं नव्हतं. रात्रीच्या जेवणाची भ्रांत असणारा मॉडिग्लियानी इथं कोपऱ्यात बसून दारू पीत राहायचा. साऱ्या जगाला विसरून. स्वतःला विसरून......

तो पॅरिसला आला तेव्हा त्याच्या डोक्यात आफ्रिकन निग्रो शिल्पं होती. फॉर्मच्या ओरिजिनलिटीमुळं तो भाळला गेला होता

त्या शिल्पात त्याला आदिमतत्त्व गवसलं होतं. एका अनामिक सूत्रबंधानं ओढल्या-सारखा तो आपला देश इटली सोडून वयाच्या बाविसाव्या वर्षी पॅरिसमध्ये आला. मॉंटमॉरमध्ये सडकेवरच स्केचेस् काढू लागला. त्याचं अस्तित्व शापित आहे ह्याची त्याला लवकरच जाणीव झाली. छाती दाबून तो खोकत असायचा. क्षयानं त्याचं हृदय पोखरायला सुरुवात केली होती. एरव्ही मरायचंच ना ? त्यानं आयुष्य एका निरामय धुंद मस्तीत जगायचं ठरवलं. आधी तो प्याल्यात मुक्ती शोधू लागला. नंतर रमणीत. दोहींची धुंदी काही वेगळीच होती. पण ह्या धुंदीतही त्याच्या रेषांना, त्याच्या रंगांना वेगळेपण लाभलं. त्याची रेषा गर्भार झाली. त्याचे रंग मांसल झाले. त्याची चित्रं त्यातील आकारांच्या बोलकेपणासाठी चित्रकारांच्या, लेखकांच्या गप्पांतून चर्चिली जाऊ लागली. त्याच्या डोक्यातील धुंदी, मस्ती त्याच्या चित्रात दृगोचर झाली.

मॉंटमॉरहून त्याची कीर्ती मोंपार्नासाला पोचली. तिथल्या पेव्हमेंट कॅफेमध्ये बसून तो चित्रं काढायचा. पीत असायचा. आर्थिक स्थितीनं तो संपूर्ण कोलमडलेला होता. कधी मद्याच्या एका प्याल्यासाठी त्याचं चित्रं तो ओलीस ठेवायचा. त्याची चित्रं त्याच्यासाठी बँकड्राफ्ट झालीत. अख्खं पॅरिस त्याला बोळ्यात ट्रान्समध्ये तरळताना दिसायचं. तशात त्याला एक स्त्री भेटली. खऱ्या अर्थानं त्या काळाचं प्रतिनिधित्व करणारी, स्वतःच्या हक्कासाठी जागरूक, साहित्य, कला ह्यात रस घेणारी, खूप उत्साही, माणसाच्या खांद्याला खांदा मिळवून उभी राहू शकणारी. फ्री. स्वतंत्र. तिनं त्याला दोन गोष्टींची दीक्षा दिली. कविता आणि हशीश त्याला ती मद्य-पानात सोबत द्यायची, मग आपल्या कविता ऐकवायची. ती पुढे असली की त्याला वाटा-यचं, त्याच्यापुढे एक स्त्री कविता म्हणत नाहीच, ती स्त्री त्याला कविताच वाटायची. ए पोएम इन फ्लेश. त्याच्या चित्रांना एक विषय मिळाला. ए वुमन अँण्ड फ्लेश. मग त्यानं खूप चित्रं काढली. स्त्रियांची. स्त्रिया उंची कपडे घालून त्याच्या भेटीला यायच्या अन् मॉडिओग्लिनोच्या हातून आपलं चित्रं काढलं जावं म्हणून काहीही करायला तयार असायच्या. त्याच्या चित्रासाठी त्या कपडे काढून बसायच्या. स्त्री त्याच्यासाठी प्रेरणा ठरली. अन् तो पुढे बसणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या प्रेमात पडू लागला. अशा संपर्कात आलेल्या कित्येक स्त्रियांची चित्रं आज अस्तित्वात आहेत. एका चित्रासाठी त्याच्यापुढं जीन हेब्यूटनं बसली. या आधीच्या स्त्रिया त्याच्या आयुष्यात डोकावून निघून गेल्या. ही मात्र ठाण मांडून बसली. त्याच्या आयुष्यात खऱ्या अर्थानं ती सोबत द्यायला आली. त्याची बायको म्हणून राहू लागली. ती त्याला नुसतीच हाताने कवटाळू पाहत नव्हती; तर त्याच विनाशाच्या खाईकडे ओढलं जाणारं अस्तित्वच आपल्या दीनदीन दुबळ्या हातानं सावरू पाहात होती. पण फार उशीर झाला होता. नियतीनं आधीच मार्ग आखून दिला होता. क्षयानं शरीर पोखरलेलं, दारूनं आतडी आधीच गिळून टाकलेली, हशीशनं मेंदू नासवून टाकलेला, दारिद्र्यानं पराजित केलेला एक प्रतिभावंत कलाकार वयाच्या फक्त छत्तिसाव्या वर्षी अत्यंत दयनीय स्थितीत श्वासोच्छ्वास कसा तरी घेत होता. घरात खायला नाही; औषध कुठून आण-णार ? शेवटी मित्रांनी अन् बायकोनं त्याला अत्यंत साधारण इस्पितळात उपचारासाठी नेलं. शेवटच्या क्षणी त्याच्या डोळ्यापुढे त्याचा देश इटली होता. इटालिया, कारा इटालिया...म्हणत त्यानं प्राण सोडला. त्याची बायको तर त्याच्या वियोगाची कल्पनाही करू शकत नव्हती. कितीतरी वेळ वेड्यागत ती त्याच्या मृत देहाची चुंबनं घेत राहिली. तिच्या आईवडिलांनी खूप समजावून तिला घरी आणलं. तिनं खिडकी-तून उडी मारली. तीही त्याला सोबत द्यायला निघून गेली. एक पेंटरमित्र मोंपा-र्नासला साऱ्यांना सांगायला धावत सुटला– मॉडी गेला...मॉडी गेला.

पटापट सारी दुकानं, रेस्टॉरंटस् बंद झाली. त्याच्या अंत्ययात्रेला सारे कलावंत, कवी, लेखक, समीक्षक आले. त्याच्या शव-पेटिकेवर मौल्यवान फुलांच्या माळा टाकल्या जाऊ लागल्या. जिवंतपणी त्याला कुणी शब्दानंही विचारलं नव्हतं–तो काय खातो ? कसा राहतो ? ह्याची कुणी चुकूनही चौकशी केली नव्हती. खऱ्या अर्थानं मॉडी हा पॅरिस-मधला शेवटचा बोहेमिअन होता. मोपार्ना-सच्या अस्तित्वाशी, मॉडी असा बांधला गेला होता. त्याच्या आठवणीत मी हरवून गेलो होतो...

'शांताराम, तुला होतं काय ? असा एकदमच कसा हरवल्यागत वाटतोस ?' मिस रिपर्ट विचारते, तेव्हा कुठं मी वास्तवात येतो. बेअररनं मोठ्या बाऊलमधून चॉकलेट आईस्क्रीम आणून ठेवलं असतं

'मला का तर मॉडी आठवला.' माझ्या डोळ्यापुढं मॉडीच्या चित्रातील स्त्रिया असतात.

'मॉडीग्लियानी... तिथं कोपऱ्यात बसा-यचा,–' मारी थेरेस बोट दाखवते, 'शुद्ध हरवेपर्यंत पीत राहायचा. त्याला शोधीत शोधत त्याची बायको यायची. त्याचा हात आपल्या खांद्याभोवती गुंडाळून त्याला कसं-तरी सावरीत घरी न्यायची. ए व्हेरी पॅथे-टिक अफेअर.'

'आय वॉन्ट टू लिव्ह शॉर्ट बट इन्टेन्स लाईफ, असं तो म्हणाला होता.' मी म्हणतो. चॉक आईस्क्रीम जिभेवर धरतो. कडूकडू वाटतं.

'तेव्हा मॉडी इथं बसून ड्रिंक घेऊ शकत होता. आज ? ओह, इम्पॉसिबल ! आताचं ले कपोला ते राहिलं नाही. पूर्वी कलावंतांची कदर होती. आता फक्त पैशाची कदर. पैसे-वाल्यांची कदर.' मिस रिपर्ट म्हणते.

पेव्हमेंटवर दोन जोडपी उभी आहेत. सारखी आमच्याकडे पाहत. अर्थात आमच्यात त्यांना इंटरेस्ट नाही. त्यांना टेबल लवकर खाली हवंय.

'कसं वाटतं इथलं आईस्क्रीम ?'–मारी थेरेस विचारते.

काय म्हणावं कळत नाही. दोघीही जिभे-वर घोळवून घोळवून खात असतात.


'जगभरच्या स्त्रिया एकजात आईस्क्रीम मोठ्या चवीनं खातात.'

'ओह् ! यू आर स्टुपिड मॅन...' मारीची माणसासाठी वापरायची ठेवणीतली फ्रेझ ती बोलून दाखवते.

'अग, बाय गॉड ! माझ्या बायकोलाही आईस्क्रीम माझ्यापेक्षा जास्त आवडतं.' मी खटयाळपणे म्हणतो. दोघीही मनमुराद हसतात.

[ क्रमशः ]

पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ३०




पहिल्या दिवशी
हसतमुख पेश येणारा कॉन्ट्रॅक्टर पवार
दुसरे दिवशी चार एक पाहुणे आणि त्यांचे सामान
दोन भिंत घासणारे, दोन रंग कालवणारे
उरलेले पान लावणारे
सगळ्या घरांचे रंग पिऊन आलेली शिडी
आणि तिच्यावरून, दाही दिशांच्या कोपऱ्यात
कुठही बेमालूम पोहोचणारा गणा.
भिंतीच अंगन् अंग मोठ्या मायेन
घासून लख्ख करणारा म्हादबा
'ताजा' म्हणून रोज नव्यानं रंग कालवणारा
पण 'डिट्टो' शेड बनवणारा गोपाळ
तंबाखूचा बार मारून तलवारीच्या आवेशाला लाजवील असा
सफाईदार ब्रश तासन् तास चालवणारा चिमाजी
तीन हातापायी
आठवडाभर उलथे पालथे झालेले विश्व
पण त्यानंतर वर्षानुवर्ष मिळणारं
अवीट रंगदार समाधान

आणि त्यासाठी फक्त नेरोलॅक

**नेरोलॅक**

U-GNM-23

# कँपेकराईचा नरभक्षक



मूळ लेखक : केनेथ अँडरसन अनुवाद : पुरुषोत्तम गोरे

‘*कल्पना करा !* चार हजार फूट उंचीच्या दोन पर्वत रांगा समांतर जात आहेत; व त्यांच्यामध्ये ५ मैल रुंदीची घनदाट जंगल असलेली दरी आहे.’ हे आहे तामिळनाडूतील सालेम जिल्ह्यांतील जंगल. हा आहे तेथे घडलेल्या भीषण नाट्याचा रंगमंच.

ह्या पर्वतरांगा दक्षिणोत्तर वसलेल्या आहेत. त्यांतील पूर्वेकडची रांग जास्त उंच म्हणजे सुमारे पंचेचाळीसशे फूट उंच असून, त्याचे दक्षिणेकडील टोक म्हणजे गुथरायण शिखर. त्याच्या उतारावर कोडेकराईचा डाकबंगला आहे. निसर्गसौंदर्याचे भान हरपून टाकणारा एक उत्कृष्ट नमुना येथे पहावयास मिळतो.

कँपेकराई हे पश्चिमेकडील पर्वतराशीच्या कुशीत वसलेले एक छोटे खेडे. किरकोळ वस्ती, थोडीफार शेती व भोवताली घनदाट जंगल, अधूनमधून वाहणारे छोटे मोठे ओढे, असा ह्या प्रदेश.

या दरीला मी ‘कोळ्यांची दरी’ असे विशेषण लावतो. कारण येथे नेहमीपेक्षा खूपच मोठे कोळी व प्रत्येक पाऊलवाटेवर त्यांची भलीमोठी जाळी आढळून येतात. कँपेकेराईजवळून वाहणारा ओढा तेथेच मोठा झालेला आहे व तो पुढे मोरप्पूर दरीत जाऊन सोपाथीजवळ चिनार नदीला मिळतो व ही चिनार नदी पुढे दहा मैलांवर कावेरी नदीला मिळते.

ह्या छोट्या खेड्यात त्यावेळी फारच भीतीचे वातावरण पसरले होते. एक नरभक्षक वाघ अचानक प्रकट झाला होता. थोड्याच काळात बरीच माणसे त्याच्या भक्ष्यस्थानी पडली होती. पहिला बळी होता पुजारी जातीचा एक म्हातारा. अकरा मैल दूर असलेल्या मुट्टूर गावाहून कँपेकराईस येण्यास तो एके दिवशी निघाला. फिरून *त्याचा मागमूस लागेना. ह्या भागात जंगली* हत्तींचे कळप नेहमीच वावरत असल्यामुळे, *त्याला हत्तीने मारले असावे अशी लोकांची* कल्पना झाली. पण शोधावयास गेलेल्या लोकांना आढळले भलतेच ! एका झुडुपांत आढळले त्याचे धोतर व काठी आणि भोवताली एका मोठ्या वाघाच्या पंजाचे ठसे.

सुमारे दहा दिवसांनी कँपेकराईत एक बाई पाणी आणण्यासाठी गावविहीरीवर सायंकाळी गेली. ती रात्र झाली तरी परत आली नाही. तिचा नवरा व इतर लोक लाठ्या, काठ्या, मशाली घेऊन पाहावयास गेले. तेथे दिसला त्या बाईने नेलेला हंडा— अर्धवट सांपडलेला व वाकडा पडलेला. रात्री काही करणे शक्य नव्हते. दुसरे दिवशी परत तपास सुरू झाला. जंगलात एका झुडुपांत तिची साडी, थोड्या अंतरावर पायांतील साखळी, हाताचे पंजे व डोके सापडले. धडाचा पत्ता नव्हता. *यानंतर एक महिना गेला—* काही घडले नाही. पण खेड्यात भीतीचे *वातावरण मात्र पसरले.* दिवस चांगला वर येईपर्यंत बाहेर पडण्यास कोणी धजेना. रात्र पडली की प्रत्येकजण झोपडीत स्वतःस बंद करून घेई. रात्री नैसर्गिक विधीसुद्धा झोपडीत होऊ लागले. भीती व घाण यांचे जणू तेथे साम्राज्यच पसरले.

माझा जुना शिकारी मित्र बैरा याचा जांवई मारा त्या खेड्यात राहत असे. झोपडीत होणाऱ्या घाणीची किळस येऊन बायको नको-नको म्हणत असताना एक दिवस रात्री तो बाहेर लघवीस जावून आला. काहीच न झाल्याने धीर वाढून तो रोजच बाहेर जाऊ लागला. पण एक दिवस त्याची फक्त घुसमटती किंकाळी ऐकू आली व नंतर सर्व शांत ! माराच्या बायकोने खूप आरडा करून मदतीची याचना केली. पण येणार कोण ?

*जांवई बळी पडल्यामुळे बैरा तेथून पेन्नाग्रामपर्यंत* अठरा मैल चालत व नंतर बसने *बंगलोरला आला. येताना* पेन्नाग्रामहून *आमचा* दुसरा शिकारी रंगा यालाही घेऊन आला. *त्या दोघांना अचानक आलेले पाहून मला* आश्चर्य वाटले व आनंदही झाला. ‘*जावयाच्या हत्येचा बदला घेण्यास तुम्हीच चला*’ हा आग्रह मला मोडता आला नाही. प्रेम आणि विश्वास *या पोटी केलेली मागणी* नाकारणे कसे शक्य आहे. ?

सर्व *तयारी करून तीन दिवसांनी आम्ही* माझ्या मोटारीने पेन्नाग्रामपर्यंत व नंतर चालत कँपेकराईस आलो. कँपेकराईपासून सुमारे दोन मैलांवर एका वाघाच्या पंजाचे ठसे *आम्हाला आढळले. या ठशांची मी नीट* मापे घेतली. त्यावरून असे दिसले की, हा वाघ पूर्ण वाढीचा नर असून तो नुकताच त्या रस्त्यावरून गेला होता. तो नरभक्षक आहे किंवा कसे हे *कळण्यास अर्थातच वाव नव्हता.*

कँपेकराईचे रहिवासी बैराने दिलेल्या माहितीपेक्षा फार काहीच सांगू शकले नाहीत. प्रश्न असा होता की पुढे काय करावयाचे ? *या वाघाने आजपर्यंत* एकाही पाळीव प्राण्यांवर हल्ला केला नव्हता. *त्यामुळे आमिष म्हणून पाडे बांधले तर हा* मारील कां ? हा फक्त मानवावरच हल्ले करत असल्यामुळे *मानवच जर आमिष ठेवावयाचे असेल तर स्वतःखेरीज दुसरा* कोण ठेवणार ? खूप विचार करून असे ठरविले की पाडेही बांधावयाचे व स्वतःही निरनिराळे *प्रयत्न करावयाचे.*

कँपेकराईत म्हशी नसल्यामुळे बैलांचाच उपयोग करावयाचे ठरविले. एवढे येताना रस्त्यावर ज्या ठिकाणी पंजांचे ठसे मिळाले होते तेथे एक व ज्या ओढ्यातून त्याची सरावाची वाट होती त्या ठिकाणी दुसरा

असे दोन बैल बांधले. मचाण बांधावयास जवळच योग्य झाडे आहेत याची आम्ही अर्थातच काळजी घेतली. जनावर पडेपर्यंत काही करणे शक्य नसल्यामुळे दिवस वाया घालवण्यापेक्षा त्या रात्री मी गाव विहिरीवर बसण्याचे ठरविले.

विहिरीच्या गडगड्याच्या खांबाला टेकून मी बसलो. सोबतीला माझी विश्वासू 'विंचेस्टर' रायफल व टॉर्च होताच. शिवाय पाणी काढण्यासाठी दोरी व एक लोटाही घेतला होता. विहिरीच्या भोवताली सुमारे पन्नास यार्डांवर जंगल सुरू होते. तेथे भोवताली कोणीतरी पपईची झाडे लावली होती. त्यांच्या तळांत लहान मोठी झुडुपे उगवली होती. दिवसा ही झुडुपे अगदीच किरकोळ वाटतात पण अंधार पडला की, हीच झुडुपे फार मोठी रूपे धारण करतात आणि भोवतालच्या भितीदायक वातावरणांत भयानकतेची भर घालतात. नशिबाने पौर्णिमा जवळ आली असल्याने चंद्र लवकर उगवणार होता. सूर्यास्तानंतर सर्वत्र भयावह शांतता पसरली. काही वटवाघळे आली व विहिरीचे पाणी पिऊन गेली. आपण एकटे आहोत ही कल्पना भीतीत भर घालते. मन भरकटू लागते. सर्वत्र वाघ दबा धरून बसल्याचा भास होतो. मनावर तावा ठेवणे अतिशय जरुरीचे असते.

रात्रीचे अकरा वाजले. ओढ्याकाठी बैल बांधला होता तिकडून एक सांबर अचानक ओरडले. निश्चितच त्याला वाघाचा वास आला असला पाहिजे. ते परत परत ओरडत डोंगरावर जात होते. हळूहळू त्या ओरडण्याचा आवाज लहान होत गेला व थांबला परत शांतता पसरली. बराच काळ गेला. एव्हाना वाघ थांबवयास पाहिजे होता पण त्याचा पत्ता नव्हता. कंटाळून मीच हालचाल करण्याचे ठरविले. लोटा घेऊन, दोरीला बांधून तो विहिरीत सोडला. विहिरीत जाताना गडगडगडगड असा व वर येताना चाकाच्या कुरकुरण्याचा आवाज वातावरणात घुमला. वाटले हा आवाज ऐकून तरी वाघाला विहिरीवर कोणी माणूस आहे असे समजेल व तो येईल. पाणी काढले; गुळण्या केल्या; खांकटे काढले पण काही उपयोग झाला नाही. तीच नीरव शांतता परत सुरू झाली. हळूहळू पहाट झाली. मला पेंग येऊ लागली. पण झोपून कसे चालेल! त्या क्षणी झोप म्हणजे कदाचित स्वर्गात जागे होण्याचा सोपा मार्ग.

सकाळ झाली. थकल्या शरिराने व तारवटलेल्या डोळ्यांनी कँपवर परत आलो. चहा, नाश्टा करून साडेदहापर्यंत झोप काढली व ताजातवाना होऊन, रंगा व बैराला बरोबर घेऊन बैलांची हालचाल पाहण्यास गेलो. ओढ्याकाढचा बैल जिवंत होता. वाघ सुमारे पंधरा यार्डावर येऊन पाहणी करून गेला होता. काल रात्री सांबराला येथेच वाघाचा वास आला असला पाहिजे.

दुसरा बैल पाहण्यास गेलो. आणि आश्चर्य तो मारला होता. भोवतालच्या पंज्यांची मापे घेतली ती पूर्वीच्या मापाबरोबर जुळली. आता प्रश्न असा आला की येथे एक वाघ आहे की दोन वाघ आहेत? एक जर असेल तर त्याने पहिला बैल का मारला नाही व दुसरा का मारला? बैल नरभक्षकानेच मारला का दुसऱ्या वाघाने? मला वाटत होते की येथे दोन वाघ आहेत व बैल पाहून निघून घेलेला नरभक्षक असावा. बैरा व रंगाचे मत असे पडले की पहिला बैल पांढरा असल्यामुळे वाघाने तो सोडला. दुसरा बैल गर्द बांडा असल्यामुळे तो मारला. जनावराच्या रंगाचा वाघावर काय परिणाम होतो हा मताचा प्रश्न आहे. काही असो त्या वळी गेलेल्या बैलावर बसावयाचे मी ठरविले रंगा व बैरा मचाण उभारण्यात निष्णात आहेत. ती आणलेली. घडीची कॅन्व्हसची खुर्चीच मचाण म्हणून बांधून घेतली. बाजले किंवा इतर मचाणापेक्षा खुर्चीला जागाही कमी लागते व मुख्य ती पटकन बांधून होते.

सायंकाळी पांच वाजता मी मचाणांत चढलो. रात्री आठपर्यंत सर्व शांत होते. अचानक वाघ माझ्या झाडाखाली येऊन उभा राहिल्याची मला जाणीव झाली. वाघ मी अपेक्षा केलेल्या वाटेने निश्चितच आला नव्हता. तो खाली येऊन झाडाला अंग घासू लागल्यावर मला ती जाणीव झाली. अंग घासता घासता वाघाने वर पाहिले व झाडावर माणूस आहे हे त्याने हेरले.

अन् मग त्वरित हालचाली घडू लागल्या. वाघ माझ्या उजव्या बाजूने झाडावर चढू लागला. त्याचे पंजे चुकविण्यासाठी मी पाय वर घेऊन शक्यतो दुसरीकडे सरकलो. आता उजव्या खांद्याला बंदूक लावून गोळी मारणे शक्य नव्हते. त्यामुळे डाव्या खांद्याला बंदूक लावून गोळी मारण्याची वेळ झाली. मी गडबडीने फिरून सरळ होण्याचा प्रयत्न केला. ह्या भानगडीत मी किंवा माझी बंदूक खाली कसे पडलो नाही हे एक परमेश्वरालाच माहीत.

नीट ध्यानात घ्या. मी सुमारे पंधरा फूट उंचीवर होतो. सर्वसाधारण वाघाची लांबी शेपटासह नऊ ते साडेनऊ फूट असते. शेपूट वजा केले तर वाघाचे पंजे सुमारे सात फूट उंचीवर येतील. म्हणजेच या वाघाला मला पकडण्यासाठी आठ फूट चढावे लागणार होते. विश्वास ठेवा एवढे अंतर तो चढला व त्याने पंजा मारला. वाघाची नखे किती तीक्ष्ण असतात याची सामान्य माणसाला कल्पना येणार नाही. खुर्चीचे जाड कॅन्व्हस, माझी खाकी पँट हे फाडून त्या नखांनी माझ्या कुल्याना ओरबाडले. तोल न सावरल्याने तो वाघ खाली पडला व क्षणात मला सांवरून गोळी मिळण्याची संधीही न देतां नाहीसा झाला.

कांही माणसांना हे वाचून ग्रामीण म्हणीची आठवण येऊन गुदगुल्या होतील. पण ध्यानात घ्या की वाघाच्या नखांत अडकलेले मांसाचे बारीक कण सडून ती अतिशय विषारी झालेली असतात. त्यामुळे या जखमा सेप्टिक होतात. त्यावर त्वरित उपचार होणे जरुरीचे असते. माझी प्रथमोपचाराची पेटी होती कॅंपवर. वाघ कदाचित जवळच लपून बसलेला असण्याची किंवा कित्येक मैल लांब गेलेला असण्याची शक्यता होती. निश्चिती कशाचीच नाही. वाघाच्या हल्ल्याची शक्यता किंवा आजारपणाची शक्यता यापैकी वाघाच्या हल्ल्याला तोंड देण्याची तयारी करून झाडावरून खाली उतरलो व सावधपणे कॅंपवर आलो.

रंगा व बैरा जागेच होते. त्यांना झालेली हकिगत सांगून औषधाची पेटी काढली; स्वतःला पेनिसिलीनचे इंजेक्शन घेतले व ड्रेसिंग करून झोपी गेलो.

जाग्रणे व कष्ट यामुळे इतकी गाढ झोप लागली की, दुसरे दिवशी सकाळी नऊ वाजता जागा झालो. जखमा विशेष त्रास देत नव्हत्या ही आनंदाची गोष्ट. परत एक

इंजेक्शन घेऊन, ड्रेसिंग करून नाष्टा केला व रात्रीच्या ठिकाणी गेलो. वाघ परत आल्याचे कोणतेही चिन्ह दिसले नाही. तेथील पंजाच्या खुणांची मापे मात्र मूळ मापांशी तंतोतंत जुळली.

आता समस्या उभी राहिली की पुढे काय करावयाचे? एकतर फिरून एकदा माणूस बळी पडेपर्यंत वाट पहावयाची किंवा बांधलेला बैल पडेपर्यंत थांबावयाचे. पहिली गोष्ट माणुसकीला सोडून म्हणून वर्ज्य व बैलाच्या मांसाची वाघाला एवढी ओढ दिसत नव्हती म्हणून खात्री वाटेना. अचानक या समस्येवरचा तोडगा सुचला.

केंपेकेराईकडे येणाऱ्या नाले-ओढ्यांपैकी एकावर या वाघाचा नेहमी वावर होता हे आम्ही हेरले होते. या नाल्यात एक सुमारे चार फूट व्यासाचा खड्डा खणावयाचा, आपण आत बसावयाचे व वर बैलगाडीचे चाक ठेवून त्यावर मोठे गोटे ठेवून व झाडेझुडुपे लावून झाकावयाचे. समोर माणसाच्या आकाराचा कापडाचा पुतळा ठेवावयाचा. माणूस समजून वाघ त्यावर हल्ला करील व त्याला मारण्याचा मोका मिळेल.

अशी सर्व व्यवस्था करण्यात तो पूर्ण दिवस गेला. दुसऱ्या दिवशी दुपारी साडेचार वाजता मी खड्ड्यात उतरलो. चाक जमिनीपासून सहा इंच वर ठेवल्याने मला सर्व बाजूंनी दिसत होते व नेमही घेता येत होता. खड्ड्यापासून सुमारे पंधरा यार्डांवर तो पुतळा झाडाला टेकवून ठेवून लोक निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत कोणीही घराबाहेर पडावयाचे नाही अशी सक्त ताकीद मी सर्वांना दिली होती.

सायंकाळ झाली. त्या बाहुल्याच्या पाठीमागे काही हालचाल दिसली. पाहतो तो एक पूर्ण वाढीचा सुरेख चितळ उभा होता. पण तो घाबरलेला दिसत नव्हता. पुतळ्याची काहीच हालचाल न झाल्याने त्याला भीती वाटली नाही. जंगलात हालचाल हीच जिवंतपणाची खूण असते. त्या जागी जर जिवंत माणूस असता व त्याने नुसती पापणी जरी फडफडवली असती तरी, तो चितळ क्षणात नाहीसा झाला असता. त्यावेळी मात्र तो शांतपणे निघून गेला.

नंतर मोरांची एक जोडी आली. तीही शांतपणे निघून गेली. माझी लपण्याची जागा त्यांच्या ध्यानात न आल्याने मीही खुशीत होतो. अंधार पडला. चंद्र वर येईपर्यंत दहा तरी वाजणार होते. समोरचा पुतळासुद्धा अंधुक दिसत होता. हळूहळू नऊ वाजले. मला पाठीमागून अस्वल येत असल्याची जाणीव झाली. अस्वल हा काही निःशब्द हिंडणारा प्राणी नव्हे, त्यामुळे त्याची चाहूल लवकर लागते. वाटेत असलेला कृत्रिम ढीग पाहून काहीतरी मेजवानी मिळणार अशा कल्पनेने हुंकार देत ते जवळ आले. वाटेत वाघाची चाहूल लागावी म्हणून मी मुद्दाम पसरलेल्या वाळक्या पाल्याचा आवाज झाला. पुढे येऊन ते चाकावर चढले. अस्वलाला जंगलाचा विदूषक म्हणतात. मी 'शूऽऽ' म्हणून हलक्या आवाजात फिस्कारलो. 'गुर्र्' त्याचे उत्तर. शेवटी तेथे दुष्ट माणूस आहे अशी खात्री झाल्यावर 'गुर्ऽगुर्ऽ' आवाज करत ते लुटुलुटू पळून गेले.

सुमारे दहा मिनिटांनी मला वाघ आल्याची जाणीव झाली. मी अत्यंत सावध होऊन पुतळ्यावर नजर लावून बसलो. पाच मिनिटे झाली. एक बारीक खडा व थोडी माती माझ्या पाठीवर पडली. वाघ माझ्या पाठीकडून येईल अशी मी कधीच अपेक्षा केली नव्हती. त्या अस्वलाच्या भानगडीमुळे बहुधा त्या वाघास तेथे माणूस असल्याची जाणीव झाली असावी. वाघ चाकावर येत असल्याची भावना होत असतानाच त्याच्या श्वासाचा आवाज कानावर आला. खड्डा लहान असल्यामुळे मागे आवाज टाकण्यासाठी मला मागे वळणे जरूर होते. पण कठीणही होते. वाघाच्या पंजापासून लांब होण्यासाठी पाठ जमिनीला लावून कसाबसा वळलो. पण वाघाला आत माणूस आहे हे आधीच कळल्यामुळे त्याने आत पंजा घालून मला ओढण्याची शिकस्त केली. तो पंजा त्यावेळी अक्षरशः माझ्यापासून काही इंचांवर होता. माझी बंदूक वाघाच्या खांद्याला टेकवून मी चाप ओढला.

त्या एवढ्याशा खड्ड्यात बंदुकीच्या आवाजाने कानठळ्या बसल्या. त्या हबक्याने वाघ उलटून मागे पडला व जखमेने चिडून त्याने आसपासचे दगडगोटे कडाकडा फोडले. डरकाळ्यावर डरकाळ्या सुमारे अर्धा मिनीट चालू होत्या आणि नंतर तो वाघ मागील जंगलात नाहीसा झाला.

क्षणापूर्वी जेथे त्या डरकाळ्यांनी जमीनसुद्धा थरथरत होती तेथे क्षणात निःशब्द शांतता पसरली. रातकिडेसुद्धा अगदी गप्प झाले होते. मला कँपवर जाता येणे शक्यच नव्हते. कारण ते चाक व त्यावरचे दगड कोणीतरी काढल्याखेरीज माझी सुटकाच होणे अशक्य. सुमारे एक वाजता गार वारे सुरू झाले. आकाश ढगांनी भरून गेले. चंद्रही ढगाआड नाहीसा झाला. दूर डोंगरावर पाऊस पडू लागल्याचा आवाज आला. हळूहळू पावसाचे थेंब पडू लागले. पाऊस सडसडून आला माझ्या अंगावर पाण्याच्या धारा पडू लागल्या. आता जर ओढ्याला पूर आला तर मला जिवंत समाधीच मिळणार होती. होती नव्हती ती ताकद लावून मी चाक दूर करण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. वाघापासून बचाव व्हावा म्हणून लोकांनी इतका बंदोबस्त केला होता की, त्यापायीच माझे प्राण धोक्यात येण्याची आली. सकाळपर्यंत मदतीची आशा नव्हती. मी एका बाजूने हातांनी माती उकरू लागलो. पाण्यामुळे मऊ झालेली ती वाळूमिश्रित माती निघू लागली. थोडी फट होताच मी माझे शरीर ओरबाडून बाहेर काढले. किनाऱ्यावर येऊन पुतळा उचलला व रस्त्यावर आलो. पाणी येत असल्याचा आवाज आला. मागे पाहतो तो एक लाल फेसाळलेल्या पाण्याची भिंतच रोरावत येत होती. क्षणात झाडे, झुडुपे, चाक, त्या पाण्याखाली नाहीसे झाले. दुरून कंदिलाचा प्रकाश दिसला. मदतीला लोक येत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी चक्क ऊन पडले होते. कालच्या प्रसंगाची खूणही मागे उठली नव्हती. रंगा व बैरा यांना तो वाघ जिवंत राहणे शक्य नाही याची खात्री वाटत होती. पण माझे मन त्यावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते.

माझी रजा संपत आली असल्याने रंगा व बैरा यांना मागे ठेऊन मी बंगलोरला निघून गेलो. काही घडल्यास त्यांनी मला तारेने कळवावयाचे होते. दहा दिवसांनी अपेक्षित तार आली. कोडेकराईच्या गाईचे तट्टू वाघाने मारले होते. सहा दिवसांनी दुसरी तार आली की, एका वाघाने मोरप्पुट्टहून सोपाथीकडे जाणाऱ्या बैलगाड्यांच्या तांड्यावर हल्ला केला होता. मी लगेच तिकडे जाण्यास निघालो.

मला असे सांगण्यात आले की, वाघाने हल्ला केल्यावर तो गाडीवान दोन बैलांच्या मधे उतरला. इतर गाडीवानांनीही खूप आरडाओरडा केला. पायाच निकामी झाला असल्यामुळे वाघाला नीट उडी मारता आली नसली पाहिजे म्हणूनच तो गाडीवान वाचला असावा.

रंगा व बैराला घेऊन मी सोपाथीला आलो. तेथे चिनार नदीतून वाघाचा पायरव आल्याची बातमी मी पारखून खरी असल्याची खात्री करून घेतली. आता पुढील डावपेच ठरवावयाचे होते.

चिनार नदीत या ठिकाणी सुमारे चाळीस फूट लांब व आठ फूट रुंद असा एक खडक आहे. या खडकावरून सर्व बाजूंना लक्ष ठेवता येत होते. वाघ त्याच्या नेहमीच्या रस्त्यावरून आल्यास दूर असतानाच दिसला असता व सावधगिरी पाळता आली असती.

रंगाचा कोट, धोतर, व पागोटे मी माझ्या कपड्यावरून घातले व खेडवळ माणसाचे सोंग घेतले. माझी ४०५ विंचस्टर रायफल व 'जेफ्रिस' बाराबोअर दुबारी बंदूक अशी दोन हत्यारे क्लॅंपने विजेच्या लावून शेजारी ठेवली व खडकाच्या मध्यभागी बसून राहिलो. या ठिकाणी चिनार सुमारे शंभर यार्ड रुंद आहे. वाळू राखाडी रंगाची असल्यामुळे धूसर प्रकाशातसुद्धा कोठलाही प्राणी सुमारे पन्नास यार्डावरून दिसण्यास अडथळा आला नसता.

नऊच्या सुमारास एक मोठा हत्ती पाण्यात उतरला. हत्तींना पाण्याची फार ओढ असते. तासन तास ते जलक्रीडा करण्यात घालवतात. हा हत्तीही काही अडथळा आला नसता तर पाण्यात बसून राहिला असता. पण वारा माझ्या अंगावरून त्याच्याकडे वाहात होता. या वाऱ्यावरोबर माझा वास त्याला जाताच सोंड उभारून त्याने एक कर्कश्य तुतारी दिली व घाईघाईने जंगलात नाहीसा झाला. जंगली हत्तीसुद्धा माणसाला टाळावयाचा प्रयत्न करतात. अपवाद असतो तो पिसाळलेल्या हत्तीचा.

मी सावधपणे सर्वत्र दृष्टी ठेऊन बसलो होतो. वाघाच्या दृष्टीस पडावे हाच उद्देश उघड्यावर बसण्यात असल्यामुळे लपावयाची गरजच नव्हती. अकरा वाजता माझ्या डावीकडे नदीच्या पात्रात काहीतरी बदल झाल्याची जाणीव मला झाली. 'एकाएकी वाळूत हा नवीनच छोटासा खडक कुठून आला बुवा ? मी स्वतःलाच प्रश्न विचारला. उत्तरही माझे मीच दिले. 'हा बहुधा वाघ असावा व पोटावर सरपटत हा येतो आहे.' आता दुसरीकडे लक्ष देण्याची गरज नव्हती. हळूच रायफल मांडीवर घेतली व जणू काही मला काही कळलेच नाही असे समजून स्वस्थ बसलो. समोर वीस यार्डावर वाघ येताच विजेरी पेटवून बंदूक खांद्याला लावली. वाघाने तोंड फिस्कारून हल्ला करण्याची तयारी केली. माझी पहिली गोळी लागूनसुद्धा तो पुढे येऊ लागला. दुसरी गोळी घातली तोपर्यंत तो खडकापर्यंत आला होता. पण शरिराचो चाळण झाल्याने तो खडकावर चढू शकला नाही. तिसरी गोळी त्याच्या वासलेल्या जबड्याजवळ बंदूक धरून तोंडातच घातली. वाघ शांत झाला होता.

रंगा व बैरा यांना धोका नको म्हणून उंच मुथी झाडावर बसवून ठेवले होते. शिळेच्या खुणेने त्यांना बोलावले व आनंदाने कॅंपवर गेलो.

हा वाघ नरभक्षक का झाला. प्रत्येक शिकारी या प्रश्नाचे उत्तर शोधावयाचा प्रयत्न करीत असतो. बहुधा मानवच त्याला कारणीभूत असतो. त्या वाघाचे कातडे काढताना असे दिसले की त्याच्या उजव्या पायाच्या खुब्यांत बंदूकीची एक गोळी अडकून बसली होती. उजवा पंजा महत्त्वाचा असतो व तो निकामी झाल्याने त्या वाघाला नेहमीचे खाद्य मिळविणे अशक्य झाले. वाघाला निसर्गानेच मांसभक्षक बनविले आहे. मांस–मग ते प्राण्याचे असो वा मानवाचे ते अन्नच. मानव हत्या हा त्याचा अन्न मिळविण्याचा सोपा मार्ग. खरा गुन्हेगार असतो तो मानवच. □

[ केनेथ अँडरसन यांच्या 'Marauder of Kempekerai' या शिकारकथेचा स्वैर अनुवाद. ]

## The Mystery of Atlantis

By Charles Berlitz
New edition Avon Books
Pages 206, Dollars 1·75.

अगदी प्लेटोच्या वेळेपासून 'अॅटलांटिस' हा आठवा खंड खरोखरच पृथ्वीवर अस्तित्वात होता का या विषयावर बरीच चर्चा चालू आहे. आणि याच विषयावर ४७ इतर वाचनीय पुस्तके लिहिली गेली आहेत, ते वाचल्यावर स्तिमितच झालो ! या ४७ पुस्तकांची यादी पुस्तकाच्या शेवटी दिली आहे. या परीक्षणाखाली असलेल्या पुस्तकाच्या पान नं. १६९ मध्ये बर्लिझ तर म्हणतो की, अटलांटिस खंडाचे अस्तित्व होते किंवा नाही या विषयावर अनादिकालापासून हजारो पुस्तके लिहिली गेली आहेत ! आता मागे एका बर्लिझच्या पुस्तकाच्या (Bermuda Triangle) परीक्षणात मीच लिहिले आहे की, या लेखकाला ३० भाषा अवगत आहेत. त्यांनी बऱ्याच संस्कृतींच्या, जुन्या हस्तलिखितांचा व शिलालेखांचा अभ्यास केला आहे. अॅटलांटिस खंडाची संस्कृती फारच सुधारलेली व संघटित होती. त्या खंडावर फार फार वर्षांपूर्वी सर्व काही रामराज्यासारखे होते. आणि एके दिवशी (११,५०० वर्षांपूर्वी) सीतेसारखा तो खंडच्या खंडच जणू पृथ्वीने गिळला. ग्रीक भाषेत अॅटलांटिस म्हणजे अॅटलासची मुलगी. ग्रीक आख्यायिकेमध्ये अॅटलासनी सर्व आकाशाला आधार दिला होता.

काही लोकांचा समज असा आहे की, अॅटलांटिस खंड म्हणजे प्लेटोनी आपल्या संवादासाठी शोधलेली एक आख्यायिका. जगातील बहुतेक Encyclopaedia मध्ये अॅटलांटिस म्हणजे एक आख्यायिकाच म्हटली आहे.

एडगर केसी या प्रसिद्ध 'ज्योतिषा'ची बरीच भाकिते खरी ठरली होती व खरी ठरू पाहत आहेत. त्याने १९४० मध्ये असे भाकित केले होते की, सन १९६८ व १९६९ मध्ये बहामाच्या बिमिनीशेजारी

Atlantean मंदिरे सापडतील. आणि त्याच परिसरात पुरातन काळची बरीच बांधकामे सापडली व अजूनही कधी कधी सापडत आहेत. एडगर कॅसी यांनी १९२३ ते १९४४ या दरम्यान ॲटलांटिसविषयी बरीच चर्चा केली होती. कॅसी यांनी अतींद्रिय ज्ञान संपादन केले होते. ॲटलांटिसवरील जीवन वगैरे कसे होते याचेही तो वर्णन करी. कॅसी एकदा असे म्हणाला होता की, सध्याचे बहामाज म्हणजे बुडून गेलेल्या पॉसिडिया बेटाचे शिखर. (पॉसिडिया हा ॲटलांटिसचा पश्चिमेकडील भाग होता.) बर्लिझ तर म्हणतो की, 'ॲटलांटिस'ची आख्यायिका ही 'फिनिक्स' पक्ष्याइतकीच सातत्याने चर्चिली जात आहे !

ॲरिस्टॉटलने eels (सर्पाकृती मासे) कुठे आणि कसे अंडी घालतात त्याविषयी अभ्यास केला होता. ते कुठेही नदीत, झऱ्यांत वगैरे असले तरी समुद्रातच अंडी घालतील. जवळ जवळ २००० वर्षांपूर्वी ईल्सबद्दल एवढीच माहिती उपलब्ध होती. पण गेल्या वीसएक वर्षांत ईल्स समुद्रात कोणत्या भागात अंडी घालतात ते ठिकाण मिळाले आहे. शतकानुशतके हे ईल्स युरोप व इतर ठिकाणाहून बर्मुडाजवळच्या सार्गासो समुद्रात अंडी घालण्यासाठी येतात. अंडी घालून झाल्यावर माद्या मरून पडतात व पिल्ले परत माद्या जिकडून आल्या होत्या तिकडे जातात ! ( genetic transplantation of memory ? ) आता सार्गासो समुद्राखाली ॲटलांटिस गेला आहे असा एका समज आहे. ॲटलांटिस खंडात भरपूर झाडे व वनस्पती होती. तो खंड त्या वनस्पतीसह एक दिवसात सार्गासो समुद्राखाली गेला व म्हणूनच सार्गासो समुद्र वनस्पतीने संपन्न आहे. बर्लिझचे असे म्हणणे आहे की, ॲटलांटिस जेव्हा अस्तित्वात होता तेव्हा त्या खंडाच्या एखाद्या मोठ्या नदीत हे ईल्स अंडी घालण्यासाठी येत असावेत. आणि जेव्हा ॲटलांटिस खाली गेला तेव्हासुद्धा त्या नदीच्या पात्रात ईल्स अंडी घालण्यास येत असावेत ! अलास्काचा salmon मासासुद्धा पाण्याच्या विरुद्ध दिशेला वरवर जात असतो. (धरणे आडवी आली तरी सुद्धा ! ) ईल्स ज्यावेळेला ॲटलांटिक महासागराच्या पैलतीराला जातात तेव्हा त्यांच्यावर समुद्रपक्ष्यांचे (Gulls) मोठे टोळके उडत असते. ईल्सना खात खात शार्क मासेसुद्धा त्यांना मुक्कामापर्यंत साथ देतात ! सन १९५७ मध्ये सार्गासो समुद्राच्या दोन मैल आत गाळाखाली गोड्या पाण्यात वनस्पती होत्या तशी वनस्पती सापडली.

ॲटलांटिक महासागराच्या तळाशी पर्वतांच्या बऱ्याच रांगा आहेत. त्यात सर्वांत मोठी रांग म्हणजे मध्य ॲटलांटिक रांग. ॲटलांटिकचे तळ हे पुष्कळ जमिनीच्या दोषांनी भरलेले आहे. तेथे कुठे न कुठे सारखे भूकंपाचे धक्के बसत असतात. सार्गासो समुद्र हा ॲटलांटिक समुद्राचाच एक भाग आहे. कधी कधी पृथ्वीवर भयंकर उलथापालथी होतात. त्याचे एक उदाहरण म्हणजे आताचे सहारा वाळवंट. येथे पूर्वी समुद्र होता हे सहारामध्ये सापडलेल्या अवशेषापासून सिद्ध होते. आल्पस् व इतर पर्वतांवर माश्यांचे अवशेष सापडले आहेत. अशा भयंकर उलथापालथीतच ॲटलांटिस खंड सार्गासो समुद्राखाली गाडला गेला असावा.

विल्यम् ग्लॅडस्टन हा १९ व्या शतकामध्ये काही काळ ब्रिटनचा पंतप्रधान होता. त्याने ॲटलांटिक खंडाचे संशोधन करण्यासाठी पार्लमेंटमध्ये एक बिल आणले होते. पार्लमेंटने ते पास होऊ दिले नाही.

बऱ्याच तत्त्वज्ञानी व लेखकांनी ॲटलांटिक खंडाबद्दल आपापली मते दिली आहेत. फ्रान्सीस बेकनने तर असे म्हटले होते की, प्लेटोचा ॲटलांटिस म्हणजे अमेरिकाच होती ! ( प्लेटोच्या Timaeus व Critias या संवादात ॲटलांटिक खंडाचा वारंवार उल्लेख केला आहे. ) शेक्सपिअरचे 'द टेंपेस्ट' हे ॲटलांटिस बेटाच्या पार्श्वभूमीवर आहे. इग्नेशिअस डॉनेली नावाच्या एका लेखकाने १८८२ मध्ये ॲटलांटिसवर एक पुस्तक लिहिले होते. त्याचे असे म्हणणे होते की, ॲटलांटीसची संस्कृती म्हणजे पृथ्वीवरची सर्वांत पहिली व जुनी संस्कृती होय. या पुस्तकाच्या ५० आवृत्त्या निघाल्या व आणखी ही निघत आहेत. या विषयावर हे पुस्तक सर्वांत वाचनीय समजले जाते. जमिनीचे अवाढव्य भाग भूकंप झाल्यामुळे समुद्राखाली आत्तापर्यंत गेले आहेत असे बर्लिझ म्हणतो. जावा, सुमात्रा, सिसिलीमध्ये असे पुष्कळ वेळा झाले आहे. सिंधू नदीच्या जवळचा २००० चौरस मैलांचा टापू पण पाण्याखाली गेला होता.

डॉनेली असेसुद्धा म्हणतो की, ॲटलांटिक महासागराखाली जे दोष आहेत ते पृथ्वीवर सर्वांत मोठे आहेत. सर्व ग्रीक आख्यायिकांना डॉनेली इतिहास मानतो. याच भागात सर्वांत मोठ्या उलथापालथी झाल्या आहेत व होतील असे तो म्हणतो. त्याने हे भाकित सन १८८२ च्या पूर्वी केले होते व त्यानंतर पेली ज्वालामुखी १९०१ मध्ये जागृत झाला होता. त्यावेळी प्रचंड प्रमाणात प्राणहानीही झाली होती. ह्याच भागात त्यानंतर इतर ठिकाणीही कमी जास्त प्रमाणात उलथापालथी झाल्या आहेत. डॉनेलीसुद्धा सध्याच्या अझोर्सना (बहामाज) ॲटलांटिस खंडाची शिखरे म्हणतो. सन १८०८ मध्ये सॅन जोर्जमधला ज्वालामुखी सतत सहा दिवस जागृत झाला होता. सन १८११ मध्ये सॅन मीग्युॲलजवळ तर पाण्यातूनच एक ज्वालामुखी बाहेर आला. त्याचे पुढे ३०० फूट उंचीचे बेट झाले होते. पाँपेइ शहर हे सन ७९ मध्ये ज्वालामुखिच्या राखेत १५ ते ३० फूटाखाली गाडले गेले होते. त्याचा शोध १७ शतकांनंतर लागला !

या अफाट विश्वात इतक्या प्रचंड उलथापालथी होत असतात की, ॲटलांटिक खंड पाण्याखाली गाडला जावा म्हणजे एखाद्या तरुण माणसाचा एकच केस गळून पडल्यासारखे आहे. म्हणजे त्यात अशक्य असं काहीच नाही !

— जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

# टेम्सच्या लाल लहरी : पृष्ठ ८ वरून

'सदू ! दोन चहा सांग आणि लायब्ररियनना पाठवून दे' मग ते मित्राकडे वळून म्हणाले, 'मी ते लीफलेट् वाचलं, सुंदर अभिप्राय आहेत !'

मित्रानं पुस्तक पुढे केले, त्यांनी चाळले, तेवढ्यात ग्रंथपाल आले, मुख्याध्यापकांनी सरळ विचारलं,

'काहो ? आपल्या लायब्ररीत ही कादंबरी नाही ना ?'

'नाहीय सर !'

'मग एक प्रत घेऊन टाका ! इट इज् ए गुड् बुक ! ते रेकॉर्डवर घ्या, आणि मग मला प्रथम वाचायला द्या !'

चहा हे वास्तविक मित्राचं नावडतं पेय, पण त्या शाळेतला त्या दिवशीचा चहा त्याला फारच हवासा वाटला.

तिथून मित्र दुसऱ्या शाळेत गेला, मुख्याध्यापकांना भेटला

'येस्–येस् ! अबाऊट दॅड बुक !' तुम्ही लायब्ररिअनना भेटा, मी त्यांना घ्यायला सांगून ठेवलं आहे !'

अरेच्या ! भलतंच सोप काम ! एरवी त्या चिल्लर विक्रेत्यांकडचे खेटे, वाट पाहणं, किंचित गरजूपणा, लाचारी ! इथे तसं कांहीच नाही. अगदी सन्माननीय वागणूक, झटपट काम, पैसे रोख !

तिसरी शाळा–

मुख्याध्यापकांचा चेहरा गंभीर होता.

'पुस्तकांची प्रत मी घेणारच आहे, पण एक रिक्वेस्ट आहे.'

'काय ?'

'तुम्ही स्वतः या कादंबरीची माहिती विद्यार्थ्यांना द्यायची !' किंचित थांबून ते पुढे म्हणाले, 'अस असतं की, मुलांना आम्ही नेहमीचेच असतो. शिक्षकांनी माहिती सांगणं आणि इतर तुमच्यासारख्या सन्मान्य पाहुण्यानं माहिती देणं यांत तुमची इम्प्रेशन्स् जास्त पडतात ! मुलं ह्या ऐतिहासिक कादंबरीची माहिती जास्त मन लावून ऐकतील !

मित्राला भलताच संकोच वाटला, लाजल्यासारखं झालं. हेडमास्तरांची विनंती ? सन्मान्य पाहुणा ? विद्यार्थ्यांना माहिती देणं ? परिचय ?

छे ! छे ! गेल्या दीड दोन वर्षांच्या अनुभवानंतर हे उबदार कपडे मित्राला अस्वस्थ करू लागले. मुख्याध्यापक सांगतच होते,

'बोलायची सवय नसली तर टेप करूं या ! तुम्ही नुसते उपस्थित रहा ! दॅट ईव्हन् हॅज ए वेट !!'

'पुन्हा आठ दहा दिवसांनी भेटायचं आश्वासन देऊन मित्र पुढे निघाला. पुढच्या शाळेत त्यानं मागचे मुख्याध्यापक आपलं भाषण टेप करणार असल्याचं सांगितलं.

'व्हेरी गुड ! तशी टेप केली तर जरूर सांगा ! आमच्या शाळेतही वापरेन. ए गुड आयडिआ–बॉईज विल हॅव समथिंग न्यू अँड इंटरेस्टिंग !'

सातारा शहरात बारा प्रती गेल्या ! एका वर्षात चाळीस प्रती कुठे आणि एका दिवसात बारा प्रती कुठे ! या व्यस्त गणितानं त्याला आनंदाचा धक्का दिला होता; पुन्हा अजीजी नाही, उधारी नाही, सन्माननीय वागणूक ! त्या रात्री आनंदातिरेकानं त्याला बराच वेळ झोप आली नाही.

त्याची 'सेल्स् ऑर्गनायझेशन' त्यानंच उभी केली होती.

–एरवी रद्दीत जमा होणाऱ्या कागदांना त्यानं मोल आणलं होतं !

एक प्रत विकली की त्याला एक सहस्रांश भार उतरल्याचं समाधान वाटे; लोक इंच इंच भूमी लढवतात, माझ्या मित्रानं एक एक प्रत विकायचा निर्धार केला आणि कराडमध्ये प्रवेश केला, तिथे सहा सहस्रांश भार उतरला, मग सांगली !

तो श्रीमहालक्ष्मीच्या दर्शनाला गेला तेव्हा त्याच्या खिशात पाचशे रुपये खुळखुळत होते ! आता दौरा संपवून परत आल्यावर त्यानं माझ्यासमोर हिशोब केला–

वीस दिवसांत ७९ प्रती विकल्या होत्या !!

आम्ही तसेच उठलो आणि विजयी मुद्रेनं वितरकाकडे गेलो. हिशोब सांगितला; पण 'शनिवारवाड्यापुढे सत्कार' तर राहोच पण साधं अभिनंदन करायची दानतही त्याजवळ नव्हती ! पैज जिंकल्याचा दावा आम्ही करणार या कल्पनेचं तो अनुदारपणानं पुटपुटला,

'पण या प्रती तुम्ही विकल्या कशावरून ? पैज जिंकली हे दाखवयासाठी तुम्ही त्या माझ्याकडून उचलून दुसरीकडे–

मी मनातल्या मनांत दोन श्रीमुखांत भडकावल्या–माझ्या मित्राच्या ! असा हिणकस मनाचा 'इसम' त्यानं वितरक नेमला होता !

मात्र या ७९ वीरांनी माझ्या मित्राला मार्ग दाखविला होता. पुढे वर्ष सव्वावर्ष–दोनही सीझन्स तो असाच दौरे काढत राहिला, अधून मधून आमची भेट होई तेव्हां खुशीनं सारं वृत्त सांगत राही ! आता त्याच्या अंगांत भलताच उत्साह संचारला होता.

जिथे कुठे प्रवासाला जायचं तिथल्या आणि वाटेवरच्या मोठ्या शहरातल्या शाळा कॉलेजेसची नांवं काढायची. अगोदर माहितीपत्रक पाठवायचं आणि मजल दर मजल करीत ठरवलेलं अखेरचं ठिकाण गाठायचं हा त्याच्या पुढचा मार्ग होता !

एक सोपं गणित त्यानं मांडून ठेवलं.

तो विक्रेत्यांना ३०% कमिशन द्यायला तयार होता. त्याऐवजी या संस्थांना १५% कमिशन पुरतं ! हा फरक या पुस्तकाच्या किंमतीवर दोन रुपये येत होता; म्हणजेच ज्या ठिकाणी भाडेखर्च दहा रुपये येई त्या दौऱ्यात पांच प्रती गेल्या की भाडेखर्च निघाला शिवाय रक्कम रोख मिळाली ! अर्थात बहुधा पांचपेक्षा (भाडेखर्च निघण्याच्या रकमेपेक्षाही अधिक.) प्रती विकल्या जात; त्यामुळे वरच्या अधिक प्रतीवरचे प्रत्येकी दोन रुपये त्याचा अनपेक्षित नफा असे आणि मुख्य म्हणजे–.

### 'गठ्ठा हलल्या'चे समाधान मिळे !

अशा भेटीतला संवाद बहुधा ठरलेलाच असे (पण दरवेळी आपण अनपेक्षित प्रश्नांना उत्तरं देतो आहोत असा भाव मुद्रेवर बाळगावा लागे.)

'हे टेम्सच्या लाल लहरी' नाव–! 'लाल' म्हणजे?'

'तसं काही नाही सर! कम्युनिझमचा काही संबंध नाहीय त्यात! राणीनं राजाविरुद्ध बंड केलं, पुष्कळ रक्तपात झाला म्हणून 'लाल'!–

'मग ठीक आहे! मी म्हटलं, कम्युनिस्ट वाङमय आहे की काय? कारण कव्हरवर लाल कलर आहे.'

'ती माझी चूक झालीय सर! नावातल्या 'लाल' शब्दानं मला फार त्रास दिलाय. प्रत्येकाला रशिअन वाङमयच वाटतं.'

मग दोघंही एकमेकाकडे पाहत मनमोकळे हसत. हेडमास्तर हसले की ओळखायचं–एक सहस्रांश भार उतरणार.

दुसऱ्या कुणी विचारावं,

'हे भाषांतर आहे का?'

'नाही! मी नऊ महिने अभ्यास केलाय.'

'गुड्! पण मग ब्रिटिश हिस्टरी का निवडलीत?'

'कारण एक तर तिथलं लाइफ आपल्यापेक्षा जास्त मोकळं असतं; त्यामुळे तिथल्या इतिहासात आपल्यापेक्षा जास्त ड्रॅमॅटिक् ईव्हेंट्स् मिळतात आणि तसं आपल्याकडच्या इतिहासावर खूप लेखन झालंय.'

'खरंय्! आणि आता आपल्याकडच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा एक साचाच बनून गेलाय;

एखादे मुख्याध्यापक म्हणत,

'किंमत पावणे तेरा रुपये?'

'होय सर! साडेबावीस फॉर्म्सचं पुस्तक झालं.'

'तरी पण किंमत जरा–'

मित्रानं वाक्य मधेच तोडावं, 'पण मी १५ टक्के डिस्काउंट देतो ना! एकून दहा पंचाऐंशीच होतात.'

डिस्काउंटची ऑफर ऐकून त्यांना थोडं बरं वाटे.

'दहा पंचाऐंशी म्हणजे बाटाच्या किंमती सारखं की काय? बाटाच्या किंमती म्हणजे तेरा पंचाण्णव, अकरा नव्वद, एकोणीस पंचाण्णव'–

'तसं नाही सर! पंधरा टक्के वर्क्स टु वन् नाइंटी! ते वजा केले की–'

त्यांनी क्लार्कला बोलावलं की, मित्रानं त्यांना दिलासा देणारा विषय काढावा.

'गावची वस्ती किती आहे हो?'

'सव्वा लाख.'

'तरी म्युनिसिपालिटीनं फारशी चांगली व्यवस्था ठेवलेली दिसत नाही.'

त्यांनी उसळून म्हणावं,

'मग पैसे कोण खाईल? सगळा चोरांचा बाजार हो–'

मग त्यांनी चोरबाजारातली एखादी चीज पेश करावी!

सारंच सुख होतं असंही नाही–

कधी कुणी अपमानास्पद वागणूकही देई. ती सोसावी. गठ्ठे उचलून हात काचत–लाल होत. उन्हाळ्यात तर हातात गठ्ठे घेऊन फिरणं जीवावर येई. तहानेनं जीव व्याकुळ होई.

एखाद्या ठिकाणी योगायोगानं विक्रीच होत नसे, फक्त उन्हातली पायपीटच पदरी पडे. मग वैताग येई. मधेच एखादी नदी लागली की, पुलावरून जाताना वाटे, 'हे सारे गठ्ठे नदीत फेकावेत आणि घरी जावं.' पण कर्जाच्या आणि गुंतवलेल्या भांडवलाच्या पराणीनं गरज ओळखून त्यानं सहनशक्ती वाढवावी. आणि योग असा की, पूल ओलांडून पलीकडच्या संस्थेत जावं तर तिथे एकदम दोन प्रती जाव्यात, मग श्रमपरिहार होई!

मार्च, ७४ अखेर त्याच्या साडेसातशे प्रती संपल्या. त्याचं सारं कर्ज फिटलं (माझी सारी रक्कम त्यानं अर्थातच दिली!) भांडवलही सुटलं. अशा सुखद क्षणी आम्ही दोघे फिरायला जात असताना समोरून नासिकचे आमचे एक मित्र प्रभाकर वारे भेटले. त्यांना हे प्रकरण माहीत होतं. त्यांनी मित्राला सरळच विचारलं,

'किती गठ्ठे हलले!'

मित्रानं अभिमानानं म्हटलं,

'वारेसाहेब! भांडवलही परत आलंय. आता कुणी लॉटनं उरलेल्या प्रती घ्यायला तयार असेल तर, आपलं पावणेतेराचं पुस्तक आपण पाच रुपयांत द्यायला तयार आहोत.'

वारेसाहेब उखडलेच.

'काय खुळे आहात काय? एवढे श्रम काय फक्त भांडवल परत मिळवायसाठी केलेत?'

'म्हणजे?'

त्यांनी समजावून सांगितलं,

'तुम्ही इतके श्रम घेतलेत, भांडवल परत आलं, पण आता तर तुमच्या नफ्याची वेळ आली आहे उरलेल्या प्रती हाच तर तुमचा फायदा आहे. हा काय असा फुंकून टाकणार? तुम्हाला सेल्सचं तंत्र जमलं आहे प्रवासाची सवय झाली आहे. आता माघार घेऊ नका. प्रत्येक प्रतीचे पैसे वाजवून घ्या. इतके श्रम काय उगीच केलेत? शेवटची प्रत विकताना काय समाधान वाटेल त्याची कल्पना करा आणि मग घ्या निर्णय–'

खरोखरीच! मित्रानं (अन् थोडेफार मी) श्रम घेतले ते काय म्हणून? पैसे फिटायचेत म्हणून? की त्याची कादंबरी सुशिक्षिताकडे जावी म्हणून? की आपल्या कादंबरीत शेवचिवडा बांधलेला पाहण्याचा मानहानीचा प्रसंग पाहावा लागू नये म्हणून?

कशासाठी का असेना, एक खरं–की उरलेला मित्राचा नफा होता आणि कष्ट केले तर तो त्याला निश्चित प्राप्त होणार होता. मग दोन अडीच हजार वाऱ्यावर सोडायचे?

मीही मित्राला उत्तेजन दिलं, भर घातली, हिंमत वाढवली, त्याच्या काचऱ्या हातांचं आणि उपाशीतापाशी फिरण्याचं कौतुक केलं, प्रसंगोपात्त अपमान सोसल्याबद्दल सहानुभूती दाखवली. पण—

त्याच्या मनावर हे बिंबवलं की, त्यानं शेवटची प्रत विकण्याचा आनंद मिळवावाच!

मित्राची परिक्रमा पुन्हा सुरू झाली. तीन, चार, महिन्यांनी–मार्च, ७५ मधे केव्हातरी तो मला घेऊन भर उन्हात पुणे विद्यार्थिगृहात आला. तिथे प्रत विकून तो राममंदिरात आला आणि भरल्या डोळ्यांनी मला म्हणाला,

'ही आता विकली ना, ही शेवटची प्रत होती!'

त्याचा आवाज गद्गदला होता, मी त्याला मिठी मारली वन् मग आम्ही रामाला दंडवत घातलं! त्यावेळी त्याच्या मनात देवाविषयी कृतज्ञता होती की शेवटच्या प्रतीचा आनंद अधिक होता नक्की मला समजलं नाही! एक मात्र जाणवलं.

'त्याचे गठ्ठे हलले आहेत. आवृत्ती संपली आहे!'

आता जेव्हा कधी ते सारं आठवतं, तेव्हा मनात येतं.

या चार वर्षांच्या परिश्रमांनी मित्राला काय लाभ झाला?

अर्थप्राप्ती झालीच; एक कादंबरी नावावर जमा झाली, आत्मविश्वास वाढला, प्रकाशनाचा धंदा बराचसा उमगला ( हेही उमगलं की हा 'आपला' धंदा नाही ) काही सज्जन धंदेवाइकांशी परिचय झाला, सारा महाराष्ट्र पाहून झाला, कुठेकुठे चाहतेही भेटले ( तुमची ती अमकी कथा फारच आवडली हं ! ' ) हे सारं मी जाणलंय् तर मित्राला समजलं नसेल असं कसं होईल ? पण सारं आठवूनही हा विषय काढला की तो उदास होतो, किंचित खिन्न मुद्रेनं म्हणतो,

'ते सारं खरं. पण एक महत्त्वाची गोष्ट हातून निसटली. या चार वर्षांत एरवी जे थोडंफार सकस लिखाण मी आनंदानं केलं असतं, ते या गुंतवणुकीनं आणि प्रवासानं काही घडलं तर नाहीच; उलट ग्रंथनिर्मितीतला अर्थप्रधान व्यवहार पाहून, नाही म्हटलं तरी मन थोडंसं उडालंच ! पूर्वी कथालेखन ही माझ्यापुरती एक आनंदातून उगम पावणारी आणि मला आनंद देत रिझवून जाणारी प्रक्रिया होती.' टेम्स्च्या ' तटावर विसावली तोही याच आनंदाच्या नशेमध्ये. पण अर्थप्रधानतेचा संपर्क आल्यापासून ते मुलायमी सुख मी गमावलं आहे ! '

हे सारं ऐकलं–आणखी इतरही उदाहरणं पाहिली–अन् म्हणूनच कुणी लेखकानं (–खरा लेखक कलेसाठीच लिहितो. ) या प्रकाशनाच्या भानगडीत पडू नये असं माझं मत झालं आहे. ज्याला अन्नाचा स्वाद हवा, त्यानं भटारखान्याकडे पाठ करून जेवावं, एरवी स्वाद बिघडेल. कलावंत बाजारात आला की या कमिशन अन् डिस्काऊंटच्या बेरजा वजावाक्यांत तो आपलं कलानिर्मिताचं सुख हरवून बसेल.

कारण ग्रंथनिर्मितीचं एक वेगळंच भयानक तंत्र आहे.

काय आहे हे तंत्र ?

ललित वाङ्मय निर्मितीमध्ये वितरणव्यवस्था फार महत्त्वाची आहे. पुस्तक छापणं, त्यासाठी भांडवल देणं, हे एका परीनं सोय आहे, पण ती पुस्तकं खपली पाहिजेत; घातलेलं भांडवल (तरी) परत आलं पाहिजे.

इथेच विक्रेते आणि ग्रंथपाल येतात आणि कमिशन आणि डिस्काउंटच्या भरमसाठ आकड्यांनी गरजवंताला गुदमरवून टाकतात !

अर्थात प्रत्येकाची वेगळी भूमिका असते; प्रत्येकाचा स्वार्थ असतो म्हणूनच सर्वांत अधिक गरज असणाऱ्याची गळचेपी होत असते !

मुळात आपल्याकडे 'पुस्तकं' ही गरजेची वस्तू नाही ! त्यामुळे इतर गरजांच्या वस्तूंपेक्षा याची स्थिती वेगळी असते; बजेटच्या आधी सिगरेट्स् दाबून ठेवल्या तर नफा वाढतो, उलट पुस्तकांच्या बाजारात 'उशीर झाला' की गणित गडगडतं ! पुस्तकांचे गठ्ठे लवकरात लवकर हलले पाहिजेत ! नाहीतर त्या निर्मितीमागचं अर्थशास्त्रीय गणित चुकतं !

एकदा अर्थप्रधान चौकटीत कलेला जखडलं की प्रत्येकाचं वैयक्तिक अर्थकारण सुरू होतं–

मोठ्या अन् अन् अनुभवी प्रकाशकांनी आपलं गणित जमवलं आहे. निर्मितीसाठी येणाऱ्या खर्चाच्या तीन ते साडेतीन पट किंमत चापायची म्हणजे विक्रेत्यांनी अगदी ३५% कमिशन मागितलं तरी खर्चाच्या दुप्पट रक्कम हाती येते. सुमारे चार पाचशे प्रती एका वर्षात जातात; म्हणजेच भांडवल वसूल झालं, बहुतेक रॉयल्टीही भागली; मग पुढे हळूहळू यादीतल्या इतर पुस्तकांबरोबर एक एक प्रत केव्हा का जाईना, तो तर साराच नफा ( अर्थात मोठे प्रकाशक ३५% कमिशन क्वचितच देतात हे वेगळं–) ! मग तो नफा सावकाश का मिळेना ?

लेखकाला कसलं आहे अर्थकारण ? प्रकाशक देईल तो मोबदला घ्यायचा, देईल तसा घ्यायचा ! आणि मग आपल्या मिळालेल्या पाच पंचवीस प्रतीतून मित्रमैत्रिणींना प्रती वाटून 'गोडवा' उपभोगत रहायचं ! संपला लेखक !

विक्रेते हे मुख्य सूत्र. लेखक–प्रकाशक आणि ग्राहक ( मुख्यतः ग्रंथालय ) यांच्यामधला हा दुवा शक्यतो स्वतःचं भांडवल न गुंतवता उधारीवर आणि विशेषतः ऑन सेल ठेवायला तयार असणाऱ्या प्रकाशकावर यांची मेहेरबानी ! एखादं महत्त्वाचं नवीन पुस्तक याच्याकडे मागा. तो ताबडतोब पोऱ्याला गोडाऊनमधून आणायला पिटाळेल आणि प्रत आणून देईल. त्याचं गोडाऊन म्हणजे प्रकाशकाचं दुकान ! प्रकाशकाकडून एक प्रत आणेल अन् उभ्या असलेल्या गिऱ्हाइकाला देईल. प्रकाशकानं दिलेलं कमिशन हा रोख फायदा ! कॉलेजेस्कडून किंवा ग्रंथालयामधून जुलै किंवा फेब्रुवारीमध्ये मागणीच्या याद्या आल्या की हव्या तेवढ्याच मोजक्या प्रती हा गोळा करेल. ( अगतिक म्हणून तेवढे भांडवल गुंतवेल ) कॉलेजमधून आलेले पैसे परस्पर प्रकाशकाला न देता थोडे दिवस वापरून मग देईल. या व्यवहारातलं कमिशन हा याचा फायदा !

विचित्र स्वार्थ दिसतो खरा–पण विक्रेत्याला ही समजावून घ्यायला हवं.

एक विक्रेता किती पुस्तकं ठेवील ? दरवर्षी शेकडो पुस्तकं प्रकाशित होतात यानं किती खरेदी करावी ? प्रत्येय प्रकाशकाला वाटतं, आपली पुस्तकं प्रत्येक शोकेसमध्ये असावीत; पण हे विक्रेत्याला कसं शक्य आहे ? निदान त्यासाठी जलद मिळणारं खेळतं भांडवल हवं. ते तरी कुठे मिळतं ? शाळा कॉलेजेस्ची उधारी वसूल करता करता हा कंटाळतो. एका विक्रेत्यानं एका कॉलेजवर दहा हजार रुपये भांडवल गुंतून पडल्यावर हा धंदा करणार कसा ?

प्रकाशकाकडून ( विशेषतः गरजू नवोदितांकडून ) अधिकाधिक कमिशन मागणं हा याचा छंद असतो. पण इथेही त्याची अडचण उभी आहे ती ग्रंथालयांची–जो जास्तीत जास्त कमिशन देईल त्यांच्या दुकानात जायचं हे ग्रंथपालांनी ठरवल्यावर विक्रेत्यानं काय करावं ?

डिस्काउंट ही कल्पना साधी आहे. सर्वच व्यापारात प्रचारात आहे. आपण एक केळे मागितल्यास १० पैसे पडतात, एक डझन घेतल्यास एक रुपयात मिळतात. आपण एकदम बारा केळी घेतली याबद्दल दुकानदाराने आपल्याला २० पैसे डिस्काउंट दिला !

पण या पद्धतीने या व्यवसायात आत्मघातकी स्वरूप धारण केले आहे. नुकतीच झालेली सरकारी खरेदी ३१ टक्के डिस्काउंटने झाली असे मी ऐकले आहे. बऱ्याच मोठ्या ग्रंथालयांना २५ टक्के डिस्काउंट नेहमीच मिळतो. एका जिल्हा परिषदेने स्वीकारलेले टेंडर २७॥ टक्के दराचे होते !

हे डिस्काउंट्स विक्रेता काही आपल्या खिशातून देत नाही. तो प्रकाशकाकडून मागतो; प्रकाशकही आपल्या खिशातून देत नाही, त्याला याची आधीच कल्पना असते. तो छापील किंमतीच वाढवून ठेवतो ! पुस्तकांच्या किंमती वाढतात त्या अशा ! म्हणूनच सामान्य जनांना परवडेनाशी होतात.

एकही प्रत छापील किंमतीला जात नाही. जी किंमत छापली जाते ती फक्त किती रकमेवर डिस्काउंट मागायचा, किती रकमेवर रॉयल्टी द्यायची, किती रकमेवर कमिशन द्यायचे या हिशोबासाठी. आहे की नाही मौज ?

इतकेच कशाला, प्रकाशनपूर्व सवलतीमध्ये २० रुपयांचे पुस्तक ५ रुपयाला आणि १२ रुपयांचे पुस्तक ३ रुपयाला मिळण्याची दवंडी आपण वेळोवेळी ऐकतो. याचाच अर्थ असाही आहे की, २० रुपयांचे पुस्तक खरे म्हणजे प्रकाशकाला फक्त (अधिकाधिक) ५ रुपयांना पडलेले असते! अर्थात वरची असते पुढे पुढे पसरली जाणारी दलाली.

डिस्काउंट पद्धत बंद करायचा ठराव एकदा पुण्याच्या ग्रंथ विक्रेता संघाने केला होता असे आमच्या वितरकाने सांगितले. 'खाजगी गिऱ्हाइकांना मुळीच कमिशन (डिस्काउंट) द्यायचे नाही आणि ग्रंथालयांना अधिकाधिक ६ टक्के डिस्काउंट द्यायचा' असा तो ठराव होता. पण याचे पालन कुणीच केले नाही, कारण याला सुरुंग लावला तो एका ख्यातनाम विक्रेत्याने! तो पडला बडा असामी. त्याच्याविना प्रकाशन क्षेत्रातले पानही हलणे शक्य नाही. त्याची अडवणूकही होणार नव्हती. मग काय? एका सुरुंगातच ठरावाच्या ठिकऱ्या झाल्या.

ग्रंथालयांची (विशेषत: छोटया शहरातल्या) स्थिती काय मोठी समाधानाची आहे म्हणता? मुळीच नाही! त्यांना ग्रॅन्ट मिळते हजार पांचशे रुपये, तेवढीच रक्कम त्यांनी गोळा करावी अशी सरकारची अपेक्षा. छोटया गावात एवढे वाचक कुठले? पण समजा वर्गणी किंवा देणग्या म्हणून रक्कम जमविली तरी आजकाल हजार दोन हजारांत जागेचे भाडे, ग्रंथपालाचा पगार आणि दैनिके अन् मासिके यांची वर्गणी एवढ्या खर्चानंतर पुस्तकांना कितीशी रक्कम उपलब्ध राहणार? त्यांत पुन्हा सरकारी यादीचे बंधन! शिवाय गावात सर्वच वाचक 'अर्नाळकर' 'काकोडकर' सांप्रदायी असले तर ठीक (स्वस्तातली पुस्तके ती हीच.) नाहीतर कुणी पोस्टमास्तरची एसेस्सी झालेली (स्मार्ट) मुलगी येऊन विचारते.

'श्रीमान योगी' आहे का हो? 'परवा' महाराष्ट्र टाइम्समध्ये रिव्ह्यू आला होता ते साधल्यांचे 'सोन्याचं पान' नाहीतर 'जानकी हरण' आणा की!'

तो ग्रंथपाल बिचारा मान हलवून रंजीला येतो.

गावात असे सुशिक्षित मूठभर; त्यांच्यासाठी ही पंचवीस पन्नास रुपयांची पुस्तके आणणं त्याला कसे परवडणार?

मग काही दिवसांनी 'भिक्कार आहे तुमची लायब्ररी' असे भाव व्यक्त करून ती मुलगी मेंबरशिप बंद करते. म्हणजे वर्गणीत घट आणि पुन्हा ग्रंथालयाची बदनामी. तीन रुपये वर्गणीत 'श्रीमान योगी' मागणं गैर नाही, पण या मागणीसाठी आपण वीस मेंबर्सची वर्गणी ॲबसॉर्ब करत असतो हे त्या सुंदरीच्या ध्यानी येत नाही.

याबाबत कोल्हापूरच्या एका खाजगी लायब्ररीवाल्याचा उद्बोधक किस्सा माझ्या मित्राने मला सांगितला; त्याने 'टेम्सच्या लाल लहरी' चाळलं अन् म्हणाला,

'तुमचं पुस्तक चांगलं आहे. मी एक प्रत घेणार आहे, पण तुम्ही इथे काउंटरच्या टोकाला पांच मिनिटे शांतपणे उभं रहा अन् ऑब्झर्व्ह करा.'

'काय ऑब्झर्व्ह करू?'

'वाचक काय म्हणतात ते! ९० टक्के वाचक अर्नाळकर, नाईक, आणि काकोडकर मागतील. उच्च अभिरुचीचे वाचक फार नसतात.'

मित्राला ओशाळल्यासारखे झाले, ग्रंथपाल पुढे म्हणाला,

'दुसरं असं की आम्ही डिपॉझिट घेतो पांच रुपये, तुमच्या पुस्तकाची किंमत दहा रुपये, कुणी लंपास केले की आमचा पांच रुपये तोटाच की! पांच रुपये डिपॉझिटमधे 'श्रीमान योगी' कसं देऊं?'

मित्रानं चेहरा टाकला असणार तरी ग्रंथपालाने पुढे म्हटलं,

'शिवाय असे की काकोडकरांची अन् अर्नाळकरांची किंमत असते तीन रुपये. एका दहा रुपयाच्या नोटेत आम्ही तीन वाचक भागवू शकतो; उलट तुमचं एकच पुस्तक येते; म्हणजे एकच वाचक भागला!'

'ग्रंथपालाने एक प्रत घेतली खरी,' मित्र मला म्हणाला, 'पण ती त्याने—दया धर्मका मूल है—या सिद्धान्तानंच घेतली असावी खरे तर ती मी त्याला फुकटच द्यायला हवी होती.'

अशी आहे या सामान्य ग्रंथालयांची अवस्था!

एवंच प्रकाशक विक्रेते आणि ग्रंथपाल तिघेही आपल्याला अडचणीतून मार्ग काढण्यासाठी एकच मार्ग अनुसरतात—तो म्हणजे 'चलनवाढ'!

'ग्रंथाली' सारख्या संस्था ही वाढ रोखण्याचा यत्न करताना दिसतात; पण त्यांचे हात फार फार लहान आहेत, आणि दुर्दैवाने आपला स्वार्थ सोडून अशा संस्थांचा अभ्युदय व्हावा यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कुणी प्रकाशक आपला 'भाववाढी'चा धोपटमार्ग सोडून त्यांच्या साहाय्याला येईल असा संभव नाही!

मार्ग एकच दिसतो—

*या भाववाढीचे कारण मुख्यत: आहे या 'डिस्काउंट' प्रकरणात!* ग्रंथालयांना 'डिस्काउंट' देऊन गिऱ्हाइके गटवण्यासाठी जी जीवघेणी स्पर्धा चालते ती थांबायला हवी आहे. मुख्य सुरुवात सरकारी आणि जिल्हा पातळीवरच्या ग्रंथखरेदीपासून झाली तरच हे पाणी उफराटं फिरेल!

म्हणजे काय?

एकतर अशा मोठ्या खरेदीदारांनी परस्पर विविध प्रकाशकांकडून *याद्या मागवून* पुस्तके *निवडावीत आणि* परस्पर प्रकाशकांकडून हे ग्रंथ छापील किंमतीत एक पैसाही डिस्काउंट न मागता विकत घ्यावेत; म्हणजे मध्यस्थांचे कमिशनही वाचेल आणि प्रकाशकांना छापील किंमत सध्याच्या किंमतीच्या ६ टक्के ठेवता येईल. (नाहीतरी हल्लीचे 'डिस्काउंट' प्रकरण म्हणजे सरकारला फायदा *आहे असे थोडेच आहे? छापील* किंमत वाढवून सजावट दिली काय आणि छापील किंमतीतच कमी केली काय अर्थ तोच!) *किंमती उतरल्या की, त्यामुळे खाजगी व्यक्तींनाही ग्रंथ खरेदी शक्य* होईल.

*अर्थात यामुळे* दलालांच्या पोटावर पाय येईल हे खरे. पण सुमारे एक दोन वर्षांत ती सर्व गाडी मार्गावर येईल!

नाहीतर सरकारने पृष्ठसंख्येच्या प्रमाणातच छापील किंमत ठेवण्याची सक्ती करावी. निदान सरकारने, जिल्हा परिषदांनी खरेदी करताना छापील किंमत काहीही असली तरी, त्याचे बिल सरकारने ठरवून दिलेल्या फॉर्मच्या विशिष्ट दरानुसारच दिले जाईल असा नियम करून तो पाळावा.

असे काही केले, तरच छापील किंमती खाली येतील; मग खाजगी गिऱ्हाईकही ग्रंथखरेदी सुरू करेल; म्हणजेच मग 'गिऱ्हाईक' कमी *म्हणून किंमत जास्त आणि किंमत जास्त म्हणून* गिऱ्हाईक कमी *या* दुष्टचक्राचा भेद होईल आणि रसिकांच्या आवडीचे साधे समंजस हौशी खरेदीचे चक्र सुव्यवस्थित सुरू होईल!

हे होणं कठीण खरेच. कारण एका यंत्रणेची क्रांतिकारक उलथापालथ यात अनुस्यूत आहे! म्हणजेच किंमती, अभिरुची, दलाल आणि ग्रंथालयांची हालाखी या चक्रव्यूहांचा भेद करणारा वीर अजून जन्माला यायचा आहे!

तोपर्यंत—?

सामान्य मराठी लेखकाने ललित वाङमयाच्या ग्रंथनिर्मितीच्या *यंत्रणेत शिरून तंत्रज्ञ होण्याचा यत्न करू नये—ते त्याला जमणार* तर नाहीच, उलट निरपेक्ष रीतीने केवळ आनंदासाठी कला निर्माण **करण्यामागचं समाधान मात्र तो गमावून बसेल!!** □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २।१०।७६ ते ८।१०।७६

**मेष : संसारात असमाधान**

रवी सहावा आहे, तर मंगळ सातवा झाला आहे. तूळ या राशीत सध्या राहू, हर्शल हे ग्रहदेखील आहेत. मंगळ त्यांच्या कोंडाळयात बसल्यामुळे सांसारिक जीवनात थोडेफार असमाधान राहणार आहे. प्रामुख्याने नवरा-बायकोने कोणतेही मतभेद फारसे ताणू नयेत. नवविवाहितांनी अधिक सहानुभूतीपर धोरण ठेवावे. आर्थिक परिस्थिती भक्कम नसली तरी, गरजेसाठी कुणाकडे काही मागावे लागणार नाही. एरवी कौटुंबिक संबंध सुधारतील. नोकरी, व्यवसाय कुशलतेने करण्यात यश मिळेल. वरिष्ठांची मर्जी राहील. शुभ दिनांक ३–६.

**महिलांना :** संसारात भांडणाची भूमिका ठेवू नका. खर्च वाढवू नका.

**विद्यार्थ्यांना :** प्रेम करा, पण फसू नका व फसवू नका.

**वृषभ : यश वृद्धिंगत होईल**

तुम्ही तत्त्वासाठी जर लढा देत असाल, तर त्यात तुम्हाला मोठे यश येणार आहे. कारण रवी आत्मविश्वास वाढवणार आहे, तर मंगळ विरोध कमी करणार आहे. स्थावर व इतर तंटे यावेळी मिटतील किंवा तडजोडीचा मार्ग खुला होईल. प्रवासाचा त्रास कमी होईल. धंद्याच्या क्षेत्रात विशेष योजना आखा व त्या कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करा. अनेकांचे सहकार्य मिळेल. कला व संशोधन क्षेत्रांत प्रगतीची पावले पडतील. नोकरीत कायम व्हाल व जबाबदारीची कामे स्वीकारावी लागतील. आजपर्यंतच्या कामाचे चीज होईल व वरिष्ठांच्या मर्जीचा चांगला अनुभव येईल. शुभ दिनांक २–४.

**महिलांना :** प्रसिद्धीचा योग आहे. लेखन व गायन क्षेत्रांत नाव चमकेल.

**विद्यार्थ्यांना :** आशाआकांक्षा सफल होतील.

**मिथुन : अडचणी ओसरतील**

तिसरा रवी सहकार्याचे क्षेत्र व औद्योगिक प्रगतीचे क्षेत्र व्यापक करणार असून समाधानकारक फल पदरी पडण्यासारखी परिस्थिती निर्माण करणार आहे. सुखस्थानी मंगळ आला आहे, ही मानसिक स्वास्थ्य मिळण्याच्या दृष्टीने फारशी अनुकूल गोष्ट नाही तरी, स्थावर, घर, जंगम वगैरे बाबतीत निर्माण झालेल्या अडचणी कमी करण्यास तो मदत करणार आहे. कोंडी फुटून नवा मार्ग सापडेल. अनेक कामे पुढे सरकतील. नोकरी अडचणीवर मात करून कायम होणार आहे. ज्या वरिष्ठांनी अवकृपा केली होती तेच कृपा करणार आहेत. आर्थिक बाजू अजून तरी पक्की सुधारली असे समजणे चुकीचे होईल. अनुकूल घडेल पण फार आशावादी राहू नका. शुभ दिनांक ३–६.

**महिलांना :** नोकरीच्या प्रयत्नात मोठे यश मिळेल. आवडत्या वस्तू खरेदी कराल.

**विद्यार्थ्यांना :** समाधान मिळेल. लेखनात नाव मिळेल.

**कर्क : उद्योग सुधारेल**

राशीत शनी आहे ही काही तशी वाईट स्थिती मानू नका. तरी पण फार मोठ्या आकांक्षा मनात बाळगण्यास तूर्त तरी वाव नाही. मात्र दुसरा रवी मनातील योजनांना चालना देणार आहे, तर तिसरा मंगळ उत्साह व कर्तबगारी अशी सांगड घालणार आहे. यावेळी बेकारांनी नोकरीपेक्षा स्वतंत्र उद्योग उभारण्याची महत्त्वाकांक्षा धरावी. त्यांचे मनोरथ पूर्ण होऊ शकतील. आर्थिक मदत मिळेल व अनेकांचे सहकार्य मिळेल. मान मिळेल. व्यापार सुधारेल. नोकरीत परदेशगमनाचा योग आहे. उच्च पदावर अचानक बदली होऊ शकेल. लेखन व नाटक यांत गती उत्तम चालेल. नाट्यप्रयोग यशस्वी होईल. राजकारण व सेवाकार्यात मोठा मान मिळेल. शुभ दिनांक ३–७.

**महिलांना :** शिक्षणाच्या नोकरीत बढती मिळेल. नोकरीच्या निमित्ताने वरिष्ठांची मर्जी राहील.

**विद्यार्थ्यांना :** पैशाची कामे होतील. सिनेक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

**सिंह : बदल संभवनीय**

धनस्थानांवर रविबरोबर
त्याने तुम्ही पुरेसे समाधानी
रवी हा राशीस्वामी अस
सामर्थ्याचे योग्य ते फळ
पडणार आहे. तुमच्या वि
चाटीत स्वस्थ बसावे लागणा
वेळेची विशेष घटना हो
श्रेष्ठता वाढेल व लोकांत अ
फोफावेल. नोकरीत वरिष्ठांच्
प्रत्यय येऊं लागणार असून
वाढणार आहे. बेकारांना या
निश्चित मिळणार आहे. अ
मात्र धाडसीपणाने करू
व्यापारी वायदे जपून करा
४–६

**महिलांना :** नोकरीत ब
करावयास हरकत नाही.

**विद्यार्थ्यांना :** वाया गेलेल
काढता येईल.

**कन्या : अनुकूलता आहे**

राशीत रवी आहे. मंगळ
गेल्या आठवड्यापेक्षा हा अ
बाजू अधिक भक्कम कर
वाढला तरी पैसे मिळतील.
काही नवे प्रश्न निर्माण हं
आहे. मात्र घरगुती आजारा
मांडलेले थैमान कमी होणार
एकंदरीत फार चांगले न
नाही. मागण्या मान्य होतील
वरिष्ठांचा त्रास मात्र कमी
सुधारेल. दुय्यम धंद्यात विशे
व तो सुधारून काही नवे
अपेक्षित पत्रव्यवहार होईल
पालवून मन उत्साही राही
३–५

**महिलांना :** आनंदाचा
असल्याचा प्रत्यय येईल.

**विद्यार्थ्यांना :** कर्तबगारी

**तूळ : थोडे समाधान**

मंगळ राशीत आला आ
तुमच्या पदरात काही घाल
नुकसान मात्र बरेच कमी क

काही थोडे समाधान नव्हे. तूळ राशीच्या गायक वादकांना मिळकत बऱ्यापैकी होणार आहे. नोकरदारांना नवी संधी मिळणार आहे. आकाशवाणी व दूर चित्रवाणी यांत काम करणाऱ्या लोकांना पगार अगर भत्ता वाढीचे फायदे मिळणार आहेत. बेकारीचे संकट टळले असल्याचे प्रत्ययाला येईल. तब्येत सुधारेल व नवे काही तरी करण्याची उमेद निर्माण होईल. चालू नोकरीत बढती; बदली होऊ शकेल. एकंदरीत सुधारणा व प्रगतीचे पाऊल पडेल. शुभ दिनांक ५–६

**महिलांना :** खूप दिवस मनांत असलेले स्वप्न साकार होईल.

**विद्यार्थ्यांना :** चाकोरीच्या बाहेरचे जीवन अनुभवण्याची संधी मिळेल.

## वृश्चिक : नोकरीत दक्ष राहावे

मंगळ हा तुमचा राशिस्वामी असला तरी त्याचे व्ययस्थानी आगमन ही काही तशी आत्यंतिक अनुकूलता नव्हे. प्रामुख्याने नोकरी करणाऱ्या लोकांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. 'हात ओले होऊं शकतात.' अशा सर्व संबंधीत नोकरदारांनी या मोहापासून स्वतःला सावरले पाहिजे असा इशारा मला मुद्दाम द्यावासा वाटतो. एरवी हा आठवडा समाधानकारक आहे. शेती व व्यापार सुधारेल. जुने येणे वसूल होणे थोडे लांबणीवर पडेल. तरीपण पैसा कमी पडणार नाही. आशाआकांक्षा रखडत का होईना पण पुढे जातील. मन उत्साही राहील. शुभ दिनांक ४–६

**महिलांना :** नोकरीत बढती मिळू शकेल. बेकारांना काम मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** वृत्ती संयमित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

## धनु : खर्च कमी होईल

मंगळाचे तूळ राशीत आगमन झाल्यापासून खरे म्हणजे तुमची आर्थिक बाजू भक्कम होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यावेळी तुम्ही रेस व लॉटरीत लक्ष घालायला मुळीच हरकत नाही. मात्र राहू तेवढा ठीक नसल्यामुळे रेसच्या आहारी जाऊ नका. आध्यात्मिक आकांक्षा काही प्रमाणात पुऱ्या होतील. सांस्कृतिक बाजू सुधारेल. घरात आजार असेल तर त्यातून मोकळे व्हाल. अनाठायी खर्च कमी करण्यास यश मिळेल. नोकरीत जैसे थे राहाणार आहे. बदल मात्र यावेळी करू नका. दुय्यम धंदा सुधारेल. मानसिक उत्साह टिकून राहील. अपेक्षित व्यवहार फलदायी होईल. शुभ दिनांक ६–७

**महिलांना :** धंद्यात बरकत असेल. व्रतवैकल्ये सफल होईल.

**विद्यार्थ्यांना :** आठवणीवर विशेष भर देऊ नका.

## मकर : नोकरीत अनुकुलता

राशिस्वामी शनी चंद्रासमोर आहे ही तशी प्रतिकुल अवस्था नसली तरी फारशी अनुकुल मात्र खचितच नव्हे. मंगळ दहावा झाला आहे ही खरी तुमच्या बाबतीत सध्यातरी जमेची बाब होय. कारण तो तुम्हाला बराच उपकारक ठरणार आहे. विशेषकरून सत्ता व नोकरी यात तुमचा दबदबा जास्त वाढणार आहे. पकड ढिली झाली असेल तर ती पुन्हा पक्की बसवू शकाल. विशेषतः अमलबजावणी यंत्रणेत जे काम करतात त्यांना हा आठवडा अधिक अनुकूल आहे. बेघरांचा वनवास संपला आहे असे मानायला हरकत नाही धंद्याकडे विशेष लक्ष द्या. शुभ दिनांक ६–७

**महिलांना :** आता काळजी करू नका. आनंद लाभावा असे ग्रहमान आहे.

**विद्यार्थ्यांना :** फायदेशीर घटना घडणार आहेत.

## कुंभ : भाग्याची चाहूल

कुंभ राशीच्या व्यक्तीच्या मनाचा कोंडमारा आता संपत आलेला आहे. त्याने बराच मोठा मानसिक त्रास सहन केला आहे. पण आता भाग्यस्थानी आलेला मंगळ त्याचे सर्व लाड पुरवणार आहे. राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्यांना अनपेक्षित मोठी संधी मिळणार आहे. यशाचा मोठा मुकुट त्याच्या डोक्यावर येणार आहे. ही संधी फार मोठी असेल ! नोकरीधंद्याची एकूण परिस्थिती बरीच समाधान कारक राहील. नोकरीत वरिष्ठ पातळीवर फार मोठी जबाबदारी स्वीकारावी लागेल. हातून कर्तबगारी पार पडेल. धंद्याचे बस्तान उत्तम तऱ्हेने बसेल. शुभ दिनांक ५–६

**महिलांना :** नोकरीत आजवरच्या कामाचे चीज होऊन बरेच काही पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनाची संधी मिळणार आहे.

## मीन : अनपेक्षित अर्थप्राप्ती

माणसाला पैसा लागतो त्याशिवाय आजच्या काळात त्याचे जमणारच नाही. मित्रहो, तुम्ही रेस–लॉटरीत भाग घेत असाल तर यावेळी तुमचे भाग्य बहरून येणार आहे हे लिहायला मला आनंद वाटतो. जन्मस्थ ग्रह उच्चीचे असले तर, हे अवश्य घडू शकेल. प्रवासाचा बेत जमून येणार आहे. परदेशी पर्यटनांचा योग मोठा आहे. सरकारी स्तरावर ही इच्छा पुरी होणार आहे. नोकरीत स्थलांतर घडून येईल. मात्र ते लाभदायक होईल. लेखनसाहित्य लोकप्रिय होईल. वाचकांची प्रतिक्रिया मनाला समाधान देईल. लेखक, प्रकाशक, पत्रकार यांना हा आठवडा प्रगतीचा आहे.

**महिलांना :** मनोरथ पूर्ण होतील. अंतर्भूत गुणांना प्रोत्साहन मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणानिमित्त स्थानंतराची शक्यता आहे. □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# पॅपिलॉन पुस्तक योजना

## पांचवे पुस्तक

‘ लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी ’ ही श्री. पु. ल. इनामदारांची माणूसमधून बहुत गाजलेली लेखमाला ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. पॅपिलॉन योजनेतील ग्राहकांना एकूण पाच पुस्तके द्यायची ठरले आहे. पाचवे पुस्तक ‘ सिनेकलावंतांची चरित्रे ’ हे योजले होते. परंतु अद्याप या पुस्तकाचे हस्तलिखित, करार वगैरे सर्व सोपस्कार व्यवस्थित होऊनसुद्धा हाती आलेले नाही. योजनेतील पुस्तक नाहीतर एव्हाना ग्राहकांना मिळालेही असते. या पुस्तकाची अंदाजे किमत वीस रुपये झाली असती. या पुस्तकाऐवजी श्री. इनामदार यांचे चालू आठवड्यात प्रसिद्ध होणारे पुस्तक पॅपिलॉन योजनेतील ग्राहकांना देऊन योजनेची पूर्तता करण्यात येणार आहे. इनामदारांच्या पुस्तकाची किमतही वीस रुपयेच राहणार आहे.

ज्यांना ‘ सिनेकलावंतांची चरित्रे ’ हेच पुस्तक हवे असेल त्यांना आणखी काही काळ थांबावे लागेल. हस्तलिखित हाती आल्यावर दोन-तीन महिन्यात पुस्तक नक्कीच प्रसिद्ध होईल. परंतु हस्तलिखिताचाच भरवसा नाही– सिनेकलावंतांच्या लहरीची त्यालाही झळ पोचल्याशिवाय कशी राहणार ? पॅपिलॉन योजनेतील पाच पुस्तकांपैकी तीन पुस्तकांचे वाटप पूर्ण झाले आहे. चवथे पुस्तकही काही ग्राहकांना रवाना झाले आहे. पाचवे व चौथे एकदम पाठवून पोस्टखर्च वाचवावा म्हणून चवथे सरसकट सर्वांना पाठविले नव्हते. आता दिवाळीच्या आगेमागे चवथ्या व पाचव्यापुस्तकाचे वाटप पूर्ण होईल. ज्यांना ‘ सिने कलावंतांची चरित्रे ’ या पुस्तकाऐवजी इनामदारांचे पुस्तक नको असेल त्यांनी मात्र ताबडतोब तसे कळवावे. नाहीतर सरसकट हा पुस्तक बदल ग्राहकांना सोयीस्कर आहे असे गृहीत धरून पूर्वीच्या तीन पुस्तकांप्रमाणे पोस्ट इत्यादी खर्चाची व्ही. पी. करून ही पुस्तके ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून रवाना होतील.

समक्ष नेणाऱ्यांनी माणूस कचेरीच्या वेळात पावती दाखवून पूर्वीप्रमाणेच पुस्तके न्यावीत.
५ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर पर्यंत. व्यवस्थापक, **राजहंस प्रकाशन**


# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी

१९४८ – ४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**किमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ पुणे ३०.